ऑक्टोबर २०१८/पाने ६८/किंमत ₹१०

# लोकराज्य


वर्षे महात्माजींच्या स्मृतीची

## | महाराष्ट्राच्या परिवर्तन कथा |



"स्वत:त
बदल घडवा
जग बदलेल"


– महात्मा गांधी






Telegram Join » https://t.me/Mpscrockers88

# अंतरंग



### युगपुरुषाचा आदर्श ६

२ ऑक्टोबर १८६९ हा दिवस, जागतिक इतिहासातील एक सोनेरी दिवस... 'मोहनदास करमचंद गांधी' या महामानवाचा जन्म, भारतभूमीत झाला. दक्षिण आफ्रिकेत गांधी भाई, देशबांधवांचे लाडके बापूजी ते महात्मा ते राष्ट्रपिता असा त्यांचा प्रवास होत असतानाच, देशाचाही पारतंत्र्याकडून स्वातंत्र्याकडे झालेला प्रवास त्यांनी अनुभवला.

### गतिमानता आणि विश्वासार्हता १०

सार्वजनिक वितरण, अन्न व औषध प्रशासन, ग्राहक संरक्षण किंवा वैधमापन या विभागाच्या कामकाजात पारदर्शकता आणून, लोकाभिमुख निर्णयांची गतिमान अंमलबजावणी केल्याने विश्वासार्हता वाढली आहे. जनतेच्या फसवणुकीस आळा बसला आहे.



### ज्येष्ठांना दिलासा... ६४

ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांना वृद्धापकाळ चांगल्या तऱ्हेने घालविता यावा, समाजामध्ये त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, शारीरिक/मानसिक आरोग्य सुस्थितीत राहावे, वृद्धापकाळामध्ये ते आर्थिकदृष्ट्या सक्षम राहावे, यासाठी राज्य शासनाने ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर केले आहे.



### सर्वांसाठी पाणी, टंचाईमुक्त महाराष्ट्र १७

जलयुक्त शिवार अभियानाला नागरिकांनी चळवळ म्हणून स्वीकारले आहे. नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग या अभियानाला लाभल्यामुळे या अभियानाची यशस्वी अंमलबजावणी केली जात आहे. यामुळे आता गाव व शिवार जलयुक्त आणि हिरवेगार होऊ लागले आहे.



### उन्नत शेती, तंत्रकुशल शेतकरी ३३

कृषी विभागामार्फत 'उन्नत शेती–समृद्ध शेतकरी अभियान' राबवण्यात येत आहे. या अंतर्गत कृषी यांत्रिकीकरणास मोठ्या प्रमाणात चालना देण्यात आली आहे. यामुळे शेतीच्या उत्पादनात व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.

### नवा चेहरा, नवी मुद्रा... ४९

मुद्रा योजनेचा लाभ घेऊन कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातील निवडे–साळवण येथील अमित आणि किरण भोसले या तरुणांनी परंपरागत केश कर्तनालय व्यवसायाला न्यू लूक दिला आहे.


| | |
|---|---|
| युगपुरुषाचा आदर्श | ६ |
| गतिमानता आणि विश्वासार्हता | १० |
| केरोसीनमुक्ती | १४ |
| सर्वांसाठी पाणी, टंचाईमुक्त महाराष्ट्र | १७ |
| समृद्धीचा 'रेशीम' मार्ग | २६ |
| शेततळ्यांनी आणली समृद्धी | ३० |
| उन्नत शेती, तंत्रकुशल शेतकरी | ३३ |
| समृद्धीची दिशा | ३५ |
| सुंदर अपुले घर... | ३९ |
| स्वच्छ इंधन, उत्तम जीवन | ४२ |
| आधुनिक देवदूत | ४३ |
| मिळाले नवजीवन | ४४ |
| दिव्यांग शक्ती | ४५ |
| मेळघाटातील विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी | ४६ |
| मी मालक गॅरेजचा... | ४७ |
| कौशल्यातून उन्नती / दुग्ध भरारी | ४८ |
| नवा चेहरा, नवी मुद्रा... | ४९ |
| आत्मविश्वास मिळाला... | ५३ |
| स्त्री शक्ती : ऊर्जा शक्ती | ५६ |
| हमी सेवेची, हमी समाधानाची | ५८ |
| व्यवसाय कौशल्य | ५९ |
| थेट विक्री, भरघोस नफा | ६१ |
| शिवण्याची कला, जगण्याची कला | ६२ |
| वाड्या उजळल्या... | ६३ |
| ज्येष्ठांना दिलासा... | ६४ |




Telegram Join » https://t.me/Mpscrockers88

वर्ष ७० वे | अंक ४ | ऑक्टोबर २०१८

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन — मीनल जोगळेकर
- वितरण — मनीषा पिंगळे, मंगेश वरकड, अश्विनी पुजारी
- साहाय्य — स्वप्नाली जाधव, भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# आयुष्यमान भारत, आयुष्यमान महाराष्ट्र...

'सर्वांसाठी आरोग्य' ह्या उद्दिष्टपूर्तीसाठी 'आयुष्मान भारत' योजना महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ही योजना राज्यातील दुर्गम, आदिवासी भागातील लाखो नागरिकांसाठी विकासाची पहाट ठरेल. महाराष्ट्रात या योजनेसोबतच महात्मा फुले जनआरोग्य योजनाही एकत्रित राबवली जाणार असल्याने राज्यातील ९० टक्के लोकसंख्येला आरोग्य विम्याचे कवच मिळणार आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात आरोग्य क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण संशोधन झाले. आयुर्मानात वाढ होऊन ते ३२ वरून ७० पर्यंत आले. माता आणि अर्भक मृत्युदरातही कमालीची घट झाली आहे. त्याच्याच पुढे जाऊन 'आयुष्मान भारत' योजनाही सर्वांसाठी आरोग्य या संकल्पनेच्या पूर्तीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या योजनेंतर्गत दीड लाख वेलनेस सेंटर संपूर्ण देशात सुरू करण्यात येणार आहेत. महाराष्ट्रातदेखील नुकत्याच ४ वेलनेस सेंटर्सचा शुभारंभ करण्यात आला आहे.

या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे लाभार्थ्याला कुठलाही अर्ज भरावा लागणार नाही. सहज सुलभपणे रुग्णालयात जाऊन उपचार घेण्याची सुविधा या योजनेत उपलब्ध करून देण्यात आली आहे. महाराष्ट्रात आधीपासूनच 'महात्मा फुले जनआरोग्य योजना' राबवली जात आहे. या सोबतच 'आयुष्मान भारत' योजना एकत्रितपणे राबवण्यात येणार असल्याने त्याचा फायदा ९० टक्के लोकसंख्येला होईल.

'आयुष्मान भारत' योजनेमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील ५० कोटी नागरिकांचा विचार केला आहे. त्यामुळे ही जगातील ही सर्वात मोठी योजना ठरेल. या योजनेमुळे ग्रामीण भागात आरोग्य क्षेत्रात गुंतवणूक होण्यास मदत मिळेल. शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातही खासगी आरोग्य सुविधा उपलब्ध होईल.



**झारखंडमधील रांची येथून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना'चा राष्ट्रव्यापी शुभारंभ २३ सप्टेंबर २०१८ रोजी केला. मुंबईतील सह्याद्री अतिथिगृहात या योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत, मुंबई शहराचे पालकमंत्री तथा उद्योगमंत्री सुभाष देसाई, मुंबई उपनगराचे पालकमंत्री तथा शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते झाला. या वेळी राज्यपालांच्या हस्ते राज्यातील १६ लाभार्थ्यांना ई-कार्डचे वाटप करण्यात आले.**



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88

# परिवर्तन पर्व



**गिरीश बापट**
अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री

ऑक्टोबर महिन्यात आमचे सरकार सत्तेवर येऊन चार वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्राच्या जनतेने मोठ्या विश्वासाने ही सत्ता आमच्या हाती दिली. या चार वर्षात महाराष्ट्राच्या नवनिर्मितीची आम्ही पायाभरणी केली. आज महाराष्ट्र विविध क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती करत आहे.

परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्राने पहिला क्रमांक राखला आहे. जलयुक्त शिवारच्या माध्यमातून सिंचनाच्या मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे टँकरच्या संख्येत लक्षणीयरीत्या घट झाली आहे. आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. स्मार्ट सिटी, स्वच्छता अभियान, मेट्रोची उभारणी, कौशल्य शिक्षणास प्राधान्य, विद्यार्थ्यांना दिलासा देणाऱ्या शिष्यवृत्ती योजना, आपले सरकार, माझी कन्या भाग्यश्री आदी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे राज्यातील सर्व घटकांना विकास, प्रगती आणि समृद्धीच्या विपुल संधी निर्माण झाल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मार्गदर्शन आणि नेतृत्वाखाली महाराष्ट्राने विकासाच्या दिशेने अतिशय उंच झेप घेतली असून, त्यामुळे राज्याच्या संपन्नेत भर पडणार आहे.

केवळ योजना आखून वा निर्णय घेऊन चालत नाही. त्याची प्रभावी, प्रामाणिक आणि पारदर्शक अंमलबजावणी आवश्यक असते. अशी अंमलबजावणी केल्यानेच समाजातील विविध घटकांना शासनाच्या योजनांचा लाभ घेता येणे शक्य झाले आहे. त्यामुळे या नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून, त्यांच्या जीवनमानातही बदल झाला आहे. अशा बदलांना टिपणारा लोकराज्यचा ऑक्टोबर महिन्याचा हा अंक आहे. या अंकात वेगवेगळ्या योजनांचा लाभ घेऊन, स्वतःच्या आयुष्यात परिवर्तन घडवून आणणाऱ्या राज्यातील विविध भागातील नागरिकांच्या यशकथांचा समावेश केला आहे. आर्थिक उन्नतीचा मार्ग दाखवणाऱ्या या यशकथा इतरांसाठी प्रेरणादायी व उत्साह वाढवणाऱ्या आहेत. या यशकथा कृषी, सिंचन, व्यवसाय, कौशल्य, शिक्षण, घरकूल, स्वयंरोजगार आदी क्षेत्रातील आहे. एका नव्या परिवर्तन पर्वाचे साक्षीदार झालेले हे सर्व लाभार्थी विविध योजनांच्या यशस्वितेचे खरेखुरे 'ब्रँड ॲम्बेसेडर' आहेत.




गेल्या चार वर्षात अन्न व नागरी पुरवठा विभागाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. या विभागात पारदर्शकता आणून विविध निर्णयांची अंमलबजावणी केली. त्यामुळे नागरिकांच्या फसवणुकीला आळा बसला. आधार नोंदणीद्वारे शिधापत्रिकांच्या वाटपावर लक्ष केंद्रित केल्याने, १० लाखांहून अधिक बनावट शिधापत्रिका आढळल्या. त्या रद्द करण्यात आल्याने अन्नधान्याची बचत झाली. यामुळे दरमहा खात्रीशीर व योग्य दराने धान्य मिळू लागले आहे. 'ई-पॉस' प्रणालीमुळे योग्य लाभार्थ्याला धान्य मिळू लागले आहे. अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत नवीन ९९ लाख नागरिकांना लाभ देण्यात आला. नवीन गोदामांमुळे धान्य साठवणूक क्षमतेत ३६ टक्के वाढ झाली. औषधी परवाने व विविध दाखले मिळवण्याची क्लिष्ट व किचकट पद्धती दूर करण्यात यश आले. वैधमापनशास्त्र यंत्रणेचे संपूर्णपणे संगणकीकरण झाल्याने व्यावसायिकांना व्यवसाय करणे सुलभ झाले आहे. ग्राहक धोरण तयार करण्यासाठी तज्ज्ञ समितीची स्थापना प्रथमच करण्यात आली. पेट्रोल, डिझेलची चोरी रोखण्यासाठी विविध उपाय योजण्यात आले. सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी अपिलांच्या सुनावणीचे काम विभागीय स्तरावर घेण्याची पद्धत सुरू केली. यापद्धतीने २०३२ प्रकरणांचा निपटारा केला. मंत्रालयातील माझ्या कार्यालयाने 'आयएसओ २०१७' प्रमाणपत्र मिळवून दर्जा आणि गुणवत्तेवर शिक्कामोर्तब केले.

२ ऑक्टोबर, २०१८ पासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे १५० वे जयंती वर्ष उत्साहाने साजरे केले जाणार आहे. या अनुषंगाने महाराष्ट्रात विविध उपक्रम राबवण्यात येतील. महात्मा गांधी आणि महाराष्ट्राचे अतूट नाते होते. त्यांनी बांद्यापासून चांद्यापर्यंत महाराष्ट्र पिंजून काढला होता. कोकणातल्या रत्नागिरीपासून चंद्रपूर जिल्ह्यातील सावली या अतिदूरच्या भागापर्यंत प्रवास व मुक्काम केला. मुंबई, पुणे आणि सेवाग्राम या तीन ठिकाणांना त्यांच्या जीवनात मोठे महत्त्व होते. महाराष्ट्र आणि महात्मा गांधी यांच्या या वैशिष्ट्यपूर्ण संबंधाचा आढावा घेणाऱ्या 'महाराष्ट्र आणि महात्मा गांधी' या ग्रंथाची, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने निर्मिती केली आहे. हा ग्रंथ म्हणजे महात्मा गांधीजींना वाहिलेली आदरांजली होय. महात्मा गांधी यांना त्यांच्या जयंतीनिमित्त शासनातर्फे मन:पूर्वक अभिवादन. येणाऱ्या सणासुदीच्या दिवसांसाठी आपणास मन:पूर्वक शुभेच्छा.

हा अंक आपणास आवडेल अशी खात्री आहे.

**गिरीश बापट**
**(अतिथी संपादक)**



# युगपुरुषाचा आदर्श

**२ ऑक्टोबर १८६९ हा दिवस, जागतिक इतिहासातील एक सोनेरी दिवस... 'मोहनदास करमचंद गांधी' या महामानवाचा जन्म, भारतभूमीत झाला. वकिलीच्या शिक्षणानंतर उपजीविकेसाठी दक्षिण आफ्रिकेसारख्या परदेशात उमेदीची २१ वर्षे व्यतीत करून; हा उच्चशिक्षित तरुण ब्रिटिशांच्या पारतंत्र्याने ग्रासलेल्या मायभूमीत परतला. सत्य-अहिंसा-सत्याग्रह यासारखी नवी आश्वासक शब्दावली देशबांधवांना देत, त्यांचे पारतंत्र्याविरुद्ध जनजागरण करू लागला. स्वत:च्या उक्तीनुसार कृती करून, त्याने साऱ्या देशाचे लक्ष स्वत:कडे वेधून घेतले, त्याच्या एका शब्दासाठी लोक घरादाराचाच नव्हे तर अगदी बंदुकीची गोळी झेलत प्राणांचा त्याग करायला सरसावू लागले. प्रांतोप्रांती, जात-धर्म-पंथ यात विखुरलेल्या आसेतुहिमाचल भारतभूमीतील लहानथोरांच्या गळ्यातील ताईत झाला. त्यांनी सामाजिक व राजकीय कार्याची सांगड घालण्याचे महत्त्वाचे काम केले. दक्षिण आफ्रिकेत गांधी भाई, देशबांधवांचे लाडके बापूजी ते महात्मा ते राष्ट्रपिता असा त्यांचा प्रवास होत असतानाच, देशाचाही पारतंत्र्याकडून स्वातंत्र्याकडे झालेला प्रवास त्यांनी अनुभवला.**

**देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

शुद्ध भारतीयत्वाचे प्रतीक म्हणजे गांधीजी. सामाजिक व राजकीय कार्याची सांगड घालणारा कृतिशील नेता म्हणजे गांधीजी. साधेपणात सामावलेली महानता म्हणजे गांधीजी, आत्मबलाची ताकद कुठल्याही शस्त्रापेक्षा जास्त असते, हे जगाला दाखवून देणारा अहिंसेचा पुजारी म्हणजे गांधीजी. मृत्यूनंतर ७० वर्षांनीही सहस्त्रकांतील जागतिक प्रभावशाली नेत्यांमध्ये त्यांचे नाव आजही गौरवाने घेतले जाते. जागतिक तत्त्वज्ञानात त्याच्या 'गांधीवादा'ला मानाचे स्थान आहे, आईनस्टाईन ते मार्टिन ल्यूथर किंग ते बराक ओबामा अशा जागतिक नेत्यांचे ते प्रेरणास्रोत आहेत.

### महाराष्ट्राशी नाते

ज्या भारतमातेच्या पोटी या हिमालयाएवढ्या उंचीच्या व्यक्तीने जन्म घेतला, त्याच भारतभूमीवर जन्म घेण्याचे भाग्य आपल्याला लाभले आहे. महाराष्ट्रासाठी खास बाब म्हणजे गांधीजी केवळ विचारांच्या रूपात महाराष्ट्राला लाभले असे नाही, तर अनेक वर्षे त्यांच्या वास्तव्याचा लाभ महाराष्ट्राला मिळाला. त्यांच्या कार्यकर्तृत्वातील महत्त्वाच्या घटना-प्रसंगांचा महाराष्ट्र साक्षीदार आहे.



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88

गांधीजींची गुरु-शिष्य परंपरा या महाराष्ट्रभूमीतच आहे. त्यांचे गुरू नामदार गोपाळकृष्ण गोखले आणि शिष्योत्तम विनोबा भावे, याच भूमीतले. त्यांचे परदेशगमन आणि देशवापसी मुंबई बंदरातून झाली. त्यांनी मुंबईत काही काळ वकिली केली. मुंबई शहराला त्यांच्या मनात विशेष स्थान होते. पुण्यानेही गांधीजींच्या आयुष्यातील तुरुंगावासासारखे महत्त्वाचे प्रसंग बघितले. विदर्भातील सावली येथे गांधीजींनी काही दिवस वास्तव्य करून चरखा संघाची स्थापना केली. वर्धा जिल्हा हा तर त्यांच्या उत्तर आयुष्यातील दीर्घकाळ वास्तव्याने पावन झालेला. मूळ नाव सेगाव असलेल्या गावाचे गांधीजींच्या वास्तव्याने 'सेवाग्राम' हे नाव जगभरात दुमदुमले. 'भारत छोडो' आंदोलनाच्या पहिल्या सभेसह, कित्येक रोमांचकारी क्षण इथल्या मातीने अनुभवले. गांधीजींमुळे जगभरातील महनीय व्यक्तींचे पाय इथल्या मातीला लागले. आधुनिक तीर्थस्थळाचा मान सेवाग्रामला गांधीजींमुळे मिळाला. राष्ट्रासाठी सर्वस्वाचा त्याग करू इच्छणारे शेकडो ध्येयवादी तरुण आणि अनेक सेवाभावी संस्था त्यांच्या प्रेरणेतून विदर्भात आणि एकूणच महाराष्ट्रात उभ्या राहिल्या. स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व गांधीजींपूर्वी महाराष्ट्राकडे होतेच, गांधीजींमुळे लढ्याचा केंद्रबिंदू महाराष्ट्र झाला. शिरीषकुमार सारखा कोवळा तरुण, बाबू गेनू सारखा गिरणी कामगार गांधीजींच्या प्रेरणेतून ब्रिटिशांविरुद्धच्या चळवळीत हसत-हसत मृत्यूला सामोरे गेले, जमनालाल बजाज यांच्यासारखे उद्योगपती राष्ट्र उभारणीसाठी पुढे आले. महाराष्ट्रातील शिक्षित, बुद्धिजीवी वर्गाची साथ त्यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी त्यांना मोठ्या प्रमाणात मिळाली. अद्भुत म्हणून नावाजले गेलेले सूतकताई, निसर्गोपचार, सर्वोदय, नई तालीम सारखे शेकडो प्रयोग गांधीजींनी इथे सुरू केले. महाराष्ट्राने आजही गांधी विचारांच्या प्रचार व प्रसाराचा वसा जपला असून, तो अधिक व्यापक करण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे.

### सुवर्णसंधी

२०१९ मध्ये त्यांची १५० वी जयंती साजरी करत असताना गांधीजींच्या स्वप्नातील भारत निर्माण करून, त्यांना खरी आदरांजली अर्पण करायची संधी आपल्याला लाभली आहे. आपल्या देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये पद स्वीकारल्यानंतर हीच बाब अधोरेखित केली. प्रारंभीच त्यांनी बापूजींच्या नावाचा, त्यांच्या जीवनशैलीतील प्राधान्यक्रमाचा, अर्थात स्वच्छतेचा कार्यक्रम दिला. बापूजींच्या १५० व्या जयंतीदिनी त्यांना 'स्वच्छ भारत' रूपी मानवंदना देण्याचे आवाहन देशातील जनतेला त्यांनी केले. महात्मा गांधींनी आरोग्य आणि स्वच्छतेला सर्वाधिक प्राधान्य दिले होते. 'स्वच्छता ही राजकीय स्वातंत्र्यापेक्षा अधिक महत्त्वाची आहे', हे त्यांचे शब्द पारतंत्र्याच्या काळात जितके मोलाचे होते, तितकेच स्वातंत्र्याच्या ७ दशकांनंतरही आहेत.



### स्वच्छतेचा आग्रह

दक्षिण आफ्रिकेत ते असताना तेथील भारतीय समाजाची स्वच्छतेबाबतची उदासीनता बघून कानउघडणी केली. पुढे भारतात परतल्यानंतर येथील अस्वच्छता बघून ते उद्विग्न झाले. त्यानंतर त्यांनी स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य दिले आणि त्यासाठी स्वत:च हाती झाडू घेतला. त्यांनी सातत्याने आपल्या भाषणांतून, लेखांतून, संभाषणातून स्वच्छतेचा आग्रह धरला होता. त्यांची स्वच्छता फक्त परिसर सुंदर दिसण्याशी संबंधित नव्हती, तर आरोग्य, स्त्रियांचा व स्वच्छकांचा आत्मसन्मान याच्याशी जोडली होती. ते फक्त बोलून थांबत नसत, तर स्वत: स्वच्छकांच्या वस्तीत जाऊन त्यांच्यासोबत सफाईचे काम करीत असत, त्याचा मोठा परिणाम समाजमनावर होत असे. धार्मिक स्थळांच्या परिसरातील अस्वच्छता, नदी-तलावांतील अस्वच्छता याविषयीही ते वेळोवेळी नाराजी व चिंता व्यक्त करीत असत. अस्वच्छतेच्या दुष्परिणामांबद्दल लोकांना जागरूक करत असत. डोक्यावरून मैला वाहून नेण्याची अमानुष प्रथा बंद करून त्या स्वच्छकांना, माणूस म्हणून जगण्याचा सन्मान त्यांनी मिळवून दिला, हे त्यांचे कार्य ऐतिहासिक आहे. दुर्दैवाने प्रथा-परंपरा-चालीरीती, अशिक्षितपणा, जातींची उतरंड यांच्या जोखडात अडकलेल्या आपल्या समाजाने त्यांच्या मृत्यूनंतर आज सुमारे ७ दशकांनंतरही स्वच्छतेच्या बाबतीत ठोस पावले उचलली नव्हती.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाला 'एक पाऊल स्वच्छतेकडे' हा संदेश देऊन महात्माजींच्या या कार्याला खरी मानवंदना, त्यांचे स्वच्छतेचे कार्य पुढे नेऊनच देता येऊ शकेल, हे दाखवून दिले आहे.

### वंचित घटक केंद्रस्थानी

स्त्रिया समाजाच्या सांस्कृतिक कणा आहेत. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणं, हे त्यांच्या व समाजाच्या स्वास्थ्यासाठी आवश्यक आहे, असे ते सांगत. म्हणूनच गांधीजींनी कुटीरोद्योग व सूतकताई याला प्रोत्साहन देणे, त्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण देणे महत्त्वाचे मानले. निरनिराळे विधायक कार्यक्रम आखताना, त्यांनी स्त्रिया व समाजातील वंचित मानलेल्या घटकांना केंद्रस्थानी मानले.

'जोपर्यंत कायदेशीर रितीने स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने हक्क मिळत नाही, जोपर्यंत मुलीचा जन्मप्रसंग हा मुलाच्या जन्मप्रसंगाइतकाच आनंदाचा समजला जात नाही; तोपर्यंत आपण अशी खूणगाठ बांधली पाहिजे की, हिंदुस्थानाला अर्धांगवायू झाला आहे. म्हणून प्रत्येक ग्रामसेवकाने प्रत्येक स्त्रीला, आई, बहीण अथवा मुलगी मानले पाहिजे आणि त्यांचा आदर केला पाहिजे' असे त्यांचे मत होते. स्त्रियांना पाळाव्या लागणाऱ्या पडदा प्रथेपासून त्या मुक्त झाल्या पाहिजेत, त्यासाठी स्त्री-पुरुष दोघांचीही मानसिकता बदलली पाहिजे, कार्यकर्त्यांनी त्यासाठी झटले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता.

स्त्रियांना स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेण्यास त्यांनी प्रेरणा दिली. इतकेच नव्हे, तर गांधीजींच्या नेतृत्वातील



अहिंसक राष्ट्रचळवळीत मोठ्या प्रमाणात स्त्रिया सहभागी झाल्या. त्यात काही शिक्षित होत्या; तशाच अशिक्षित स्त्रियाही मोठ्या प्रमाणात होत्या. 'तीन तलाक'च्या सक्तीपासून महिलांना मुक्ती देण्याचा केंद्र सरकारने घेतलेला निर्णय म्हणजे, महात्माजींच्या स्त्री सक्षमीकरणाच्या विचारांना प्रत्यक्षात आणणे आहे; असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाची प्रक्रिया गांधीजींच्या पुढाकाराने सुरू झाली होती याबद्दल दुमत नाही.

### सखोल चिंतन

व्यक्तिगत जीवनासोबतच समूह जीवनाबाबत सखोल चिंतनातून आलेले विचार मार्गदर्शक होते. खेड्याकडे चला, स्वयंपूर्ण खेडी, ग्रामकेंद्रित अर्थव्यवस्था, गावांमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणे, त्यांना आत्मनिर्भर करणे आणि शेतीला अधिक भक्कम करणे या विषयांवर गांधीजींचा विशेष भर होता. 'सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून विकास व्हावा', 'जो समाजाच्या शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहचतो, तो खरा विकास,' हे त्यांचे सांगणे असे. 'प्रत्येक ग्राम म्हणजे सर्वसत्ताधीश असे एक लोकसत्ताक किंवा पंचायत झाले पाहिजे, प्रत्येक ग्राम हे स्वयंपूर्ण आणि आपला सर्व कारभार चालविण्यास समर्थ असले पाहिजे', यावर त्यांचा कटाक्ष असे. 'खरा भारत खेड्यांमध्ये वसतो' याचे भान महात्माजींनी साऱ्यांना दिले. स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्यासाठी, देशाच्या विकासाचा आर्थिक कणा असलेला ग्रामीण भाग पूर्णपणे स्वावलंबी व्हायला हवा, असा त्यांचा आग्रह होता. गाव आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होण्यासाठी सूतकताई, कुटीरोद्योग, सहकारी पशुपालन यांसारख्या आर्थिकदृष्ट्या निर्भर करणाऱ्या बाबी अंगीकारायला ते सांगत. स्वतंत्र भारतातील पंचायती कशा प्रकारे असायला हव्यात, याचे सविस्तर विवेचन त्यांनी केले होते. पंचायतराज प्रणाली गांधीजींनी ग्रामस्वराजमध्ये सांगितली आहे. गावातील गरजांच्या आधारे नियोजन करा, ग्रामोद्योगांचे पुनरुज्जीवन करून श्रमाला प्रतिष्ठा दिली पाहिजे हा त्यांचा आग्रह होता.

आज एकीकडे झपाट्याने शहरीकरण होताना, दुसरीकडे तंत्रज्ञानाने शहर-गाव असा भेद मिटवून टाकला असताना आणि 'ग्लोबल व्हिलेज' ही संकल्पना नव्याने मांडली जात असताना; गांधीजींचे ग्रामविकासाचे विचार किती दूरदृष्टीचे होते, हे जाणवून अचंबित व्हायला होते.

### शेतकऱ्यांचे हित

ग्रामीण जीवनातील महत्त्वाचा घटक असलेल्या शेतकऱ्याच्या बाजूने गांधीजी प्रथमपासूनच होते. गांधीजींनी भारतातील त्यांचा पहिला सत्याग्रह हा चंपारण्य येथील नीळ उत्पादकांसाठी केला होता. याच सत्याग्रहाने गांधीजींची कीर्ती देशभर पोहोचवली होती, शेतकरी वर्ग गांधीजींशी आणि पर्यायाने स्वातंत्र्य चळवळीशी जोडला जाण्याची ती सुरुवात होती. त्यानंतर खेडा आणि बार्डोली सत्याग्रहातून गांधीजींनी शेतकऱ्यांवर ब्रिटिशांनी लादलेल्या जाचक कायद्यांना माघारी परतवले होते. शेतकऱ्यांची संघटित शक्ती गांधीजींनी प्रथम जागवली होती. भारतातील हजारो वर्षांपासून सुरू असलेल्या, निसर्गपूरक शेतीचा त्यांना अभिमान होता. ते म्हणत, 'भारतातील प्रत्येक शेत ही एक प्रयोगशाळा आहे व प्रत्येक शेतकरी हा शास्त्रज्ञ'.

शेतकऱ्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या गोवंशाचे संरक्षण व वृद्धी हेदेखील गांधीजींनी महत्त्वाचे मानले होते. गोसेवेचे व्रत त्यांनी घेतले होते. आज शेतकऱ्यांना नैसर्गिक, मानवनिर्मित संकटांचा सामना करताना बळ देण्यासाठी; जलयुक्त शिवार योजना, कृषी सिंचाई योजना, मृदा कार्ड, कर्जमाफी, सूक्ष्म सिंचन कृषी संजीवनी इ.विविध रूपाने प्रयत्न करण्यात येत आहेत.

देशातील अंतिम माणसाच्या उत्थानासाठी न्यायाचे सरकार असण्यावर गांधीजींचा भर होता. अंत्योदयाची संकल्पना त्यांनी मांडली होती. १९१५ मध्ये आपल्या आश्रमात उपेक्षित आणि वंचित घटकातील परिवाराला प्रवेश देण्यापासून, गांधीजींचे अस्पृश्यता निवारणाचे काम सुरू झाले होते. वधुवरांपैकी एक सवर्ण आणि एक अस्पृश्य असणाऱ्या विवाह समारंभांनाच उपस्थित राहण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली होती. अस्पृश्यता निवारणाचा प्रचार-प्रसार अधिक प्रभावीपणे करण्यासाठी इंग्रजीत 'हरिजन', हिंदीत 'हरिजन सेवक' तर गुजरातीत 'हरिजन बंधू'ही साप्ताहिके त्यांनी सुरू केली होती. अंत्योदयातून समाजातल्या तळागाळातील घटकांना न्याय देण्याची ही संकल्पना होती.

### युगप्रवर्तक

गांधीजींचे शिक्षणविषयक विचारही असेच युगप्रवर्तक होते. त्यांनी सुरू केलेली 'नई तालीम' ही शिक्षणपद्धती देशाला दिलेली सर्वोत्तम देणगी आहे. शिक्षणापासून वंचित व उपेक्षित समाजासाठी त्यांनी खास मूल्याधारित शिक्षण पद्धती सुरू केली. गांधी आश्रमातून व त्या धर्तीवर चालणाऱ्या आश्रमातून याच पद्धतीने शिक्षण दिले जाण्याची व्यवस्था केली. स्वहित, समाजहित व राष्ट्रहित याचा एकत्रित विचार ही शिक्षण पद्धती करते. ज्ञानार्जनासोबतच प्रत्यक्ष कार्यानुभावातून आनंददायी शिक्षण म्हणजे 'नई तालीम'. शिक्षणातून स्वत:च्या पायावर उभे राहण्याची पात्रता 'नई तालीम' मध्ये अपेक्षित आहे. शैक्षणिक विषयांबरोबरच स्वावलंबन, अर्थशास्त्र, हस्तोद्योग कला, नागरिकत्वाचे धडे देत शरीर, मन व बुद्धी यांच्या विकासातून राष्ट्रीय वृत्तीचे नागरिक घडविणे महात्माजींनी महत्त्वाचे मानले होते. शिक्षणासोबतच सुतारकाम, शिल्पकला, बागकाम इ. कौशल्य विकासाला यात चालना दिली जात असे. परंतु स्वातंत्र्यानंतर ७ दशकांच्या काळात शिक्षणाचे बाजारीकरण होत गुणाधारित,



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88

परीक्षाधारित शिक्षण महत्त्वाचे मानले जाऊ लागले. त्यामुळे निम्नआर्थिक स्तरातील, सोयी–सुविधांचा अभाव असलेले तसेच पारंपरिक कला–कौशल्य अंगी असलेले विद्यार्थी हे स्पर्धेत मागे पडत असलेले आपण बघतो. गांधीजींच्या 'नई तालिम' पासून प्रेरणा घेत कौशल्य विकासावर आम्ही भर दिला असून, युवकांच्या इच्छेनुसार परिणामकारक कौशल्य प्रशिक्षण देणे व त्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्यास मदत करणे हा उद्देश त्यामागे आहे. 'स्वदेशी' हा गांधीजींनी दिलेला नारा रोजगार निर्मितीसोबतच राष्ट्रीय आर्थिक उन्नतीसाठी तेव्हाही महत्त्वाचा होता आणि आजही आहे. स्वदेशीचा फार व्यापक आणि देशाच्या प्रगतीसाठी समर्पक असा अर्थ गांधीजींनी सांगितला होता. 'स्वदेशीची ढोबळ परिभाषा ही आहे की, देशी उद्योगांना संरक्षण देण्याकरिता विदेशी वस्तूंचा त्याग करून देशी वस्तू वापरणे. ही गोष्ट त्या उद्योगांना विशेषत्वाने लागू होते, ज्यांच्या विनाशामुळे भारत दारिद्र्यावस्थेत पोहोचला.' गांधीजींचे हे तळमळीचे बोल किती दूरदृष्टीचे होते, हे आज लक्षात येते.

## प्रेरणास्रोत



जीवनाचे कोणतेही क्षेत्र घ्या, त्या क्षेत्रात गांधीजींनी आपल्या चिंतनशीलतेने भरच घातली आहे. म्हणूनच ते भारतीयांसोबतच जगातील कोट्यवधींचे प्रेरणास्रोत आहेत. ८० पेक्षा जास्त देशांनी त्यांच्यावर पोस्टाची तिकिटे काढली आहेत. ज्या ब्रिटिश राजसत्तेला उलथवून लावण्यात त्यांची मोलाची भूमिका होती, त्या ब्रिटिनचादेखील त्यात समावेश आहे. संयुक्त राष्ट्रसंघानेही त्यांच्यावर तिकिट काढून, त्यांच्या कार्याला मानवंदना दिली आहे. त्यांच्यावर सर्वोत्तम चित्रपट तयार केला, तोही एका ब्रिटिश व्यक्तीने. त्यांची जयंती जगभर 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' म्हणून पाळण्यात येते. जगभरात ठिकठिकाणी त्यांची स्मारके उभारण्यात आली आहेत. रस्त्यांना त्यांचे नाव देण्यात आले आहे, विद्यापीठांमध्ये त्यांच्या नावाची अध्यासने आहेत, त्यांच्या विचारांवर आधारित अभ्यासक्रम आहेत, जीवनाची सर्व क्षेत्रे व्यापूनही 'गांधीविचार' चार दशांगुळे वर शिल्लक राहतोच. जगभरात भारताची ओळख 'गांधीजींचा देश' अशी झाली आहे.

## वारसा जपताना

गांधीजींच्या १५० व्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या सेवाग्रामचा विकास व्हावा; त्यांच्या विचारांचे पाईक असलेल्या जगभरातील त्यांच्या अनुयायांना मार्गदर्शनाचे एक उत्कृष्ट केंद्र या माध्यमातून विकसित व्हावे, या दृष्टीने सेवाग्राम विकासासाठी शासनाने २६६ कोटी ५३ लाख ७५ हजार रुपयांच्या –विकास आराखड्यास मान्यता दिली आहे. सेवाग्राम परिसरामध्ये अंगुरीबागेजवळ १ हजार व्यक्तींकरिता सभागृह, अभ्यासकेंद्र, सुसज्ज ग्रंथालय, यात्री निवास, परिसरात निवासी कॉटेजचे बांधकाम, यात्री निवास येथे ४ हजार लीटर क्षमतेची पाण्याची टाकी, कस्तुरबा चौक ते आश्रम या रस्त्याची सुधारणा, कंपाऊंड वॉल, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची कामे, माहिती केंद्र, बुटी बोरी जंक्शन ते वर्धा व सेवाग्राम या मार्गावर वृक्षलागवड, सेवाग्राम, वर्धा आणि पवनार विभागातील सांस्कृतिक आणि ऐतिहासिक स्थळांचा विकास, हेरिटेज ट्रेलची उभारणी, पवनार येथील दिल्ली गेट आणि परिसराचे संवर्धन अशा विविध कामांचा यात समावेश आहे.

ब्रिटिश सत्तेविरुद्ध गांधीजींच्या नेतृत्वाखाली ज्या अंतिम लढ्याची सुरुवात मुंबईत १९४२ मध्ये झाली, त्या 'भारत छोडो' चळवळीला ९ ऑगस्ट २०१८ रोजी ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने या चळवळीच्या सुवर्णस्मृतींचा जागर करण्याची संधी आपल्याला मिळाली. ते औचित्य साधून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'संकल्प ते सिद्धी' हा नारा दिला. अस्वच्छता, गरिबी, भ्रष्टाचार, दहशतवाद, जातिवाद, संप्रदायवाद दूर करून नव भारताच्या निर्मितीसाठी देशवासीयांना साद घातली आहे. राज्यानेही दुष्काळापासून मुक्ती, शेतकऱ्यांना कर्जापासून मुक्ती, प्रदूषणापासून मुक्ती, भ्रष्टाचारापासून मुक्ती, करजंजाळातून मुक्ती, अस्वच्छतेपासून मुक्ती, बिल्डरांच्या मनमानीपासून मुक्ती असा सप्तमुक्तीचा संकल्प केला आहे.

'गांधीविचार' ही फक्त तत्त्वप्रणाली नसून युगप्रवर्तक विचारमाला आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह, अंगमेहनत, अस्वाद, अभय, सर्वधर्मसमभाव, स्वदेशी, अस्पृश्यता निवारण ही एकादश व्रते गांधीजींची शक्तिस्रोतरूपे होती. त्यांच्या एकादश तत्त्वांवर आधारित जीवनप्रणाली ही तेव्हाही प्रासंगिक होती, आजही आहे आणि उद्याही राहील, याची जाणीव ठेवून; कारभार करण्याचा आमचा प्रयत्न आहे. महात्माजींची १५० वी जयंती म्हणजे त्यांच्या विचारांचा, कार्याचा जागर करण्यासोबतच ते प्रत्यक्ष आचरणात आणण्याची संधी आहे, असे आम्ही मानतो. महात्माजींच्या स्वप्नातील 'रामराज्याची' संकल्पना साकार करण्यासाठी प्रत्येकाने तन–मन–धनाने झटणे ही त्यांना खऱ्या अर्थाने आदरांजली ठरेल.


**शब्दांकन : मीनल जोगळेकर,**
वरिष्ठ सहायक संचालक



मंत्रालयातील अन्न व नागरी पुरवठा कार्यालयाला आयएसओ २०१७ हे नामांकन मिळाले. त्याचे प्रमाणपत्र महसूल मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या हस्ते अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट यांना देण्यात आले.

**सार्वजनिक वितरण, अन्न व औषध प्रशासन, ग्राहक संरक्षण किंवा वैधमापन या विभागांच्या कामकाजात पारदर्शकता आणून, लोकाभिमुख निर्णयांची गतिमान अंमलबजावणी केल्याने विश्वासार्हता वाढली शिवाय जनतेच्या फसवणुकीस आळा बसला आहे.**

# गतिमानता आणि विश्वासार्हता

**गिरीश बापट,** अन्न व नागरी पुरवठा मंत्री

लोकांच्या दैनंदिन जीवनमानाशी संबधित असा हा माझा विभाग आहे. सार्वजनिक वितरण, अन्न व औषध प्रशासन, ग्राहक संरक्षण किंवा वैधमापन या विभागातील निर्णयांचा परिणाम हा सामान्यांच्या जीवनावर होत असतो. यासाठी सर्वप्रथम मी या सर्व यंत्रणेच्या बळकटीकरणावर भर दिला. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपुर्ण संगणकीकरण करण्यात आले. या अंतर्गत राज्यात सार्वजनिक वितरणाच्या डाटा बेसमध्ये ९५ टक्क्यांपेक्षा अधिक आधार नोंदणी (सिडिंग) शिधापत्रिकांमध्ये करण्यात आली. यामुळे कामकाजात सुसूत्रता येऊन राज्यातील सुमारे १० लक्ष शिधापत्रिका या बनावट किंवा चुकीच्या आढळून आल्याने रद्द करण्यात आल्या. यामुळे अन्न धान्याची बचत तर झालीच, त्याशिवाय लाभार्थ्यांना या नवीन प्रणालीमुळे दरमहा खात्रीशीर व योग्य दराने धान्य मिळण्याची हमी मिळाली आहे.

### आधार सक्षम सार्वजनिक वितरण

डेटाच्या संगणकीकरणाबरोबरच १ मे, २०१८ पासून आधार सक्षम सार्वजनिक वितरणचा वापर करून ई-पॉसद्वारे धान्य वितरण सुरू करण्यात आले. या प्रणालीमुळे योग्य लाभार्थ्याला धान्य मिळणे तर सोपे झालेच पण या प्रणालीमुळे लाभार्थ्यांना कोणत्याही दुकानात धान्य घेण्याची सुविधा सुवाह्यतेमुळे (पोर्टेबिलिटी) शक्य झाली आहे. त्याचबरोबर ई-पॉस मशीनमधून धान्य वितरणामुळे एकूण धान्य उचलीमध्ये सुमारे ३,६४,८०० मे. टन एवढी घट २०१७-१८ मध्ये झाली आहे. ई-पॉसद्वारे केरोसीन व तूरडाळ विक्रीचीही सुविधा आपण देऊ केली आहे. ई-पॉसवर केरोसीन वाटप केल्याने मोठ्या प्रमाणावर अपात्र लोक वगळले जात असून, त्यामुळे मोठी बचत होताना दिसून येत आहे.

आधार सक्षम सार्वजनिक वितरणमधील ई-पॉसद्वारे अन्नधान्य विक्री व्यवहारामध्ये पारदर्शकता आली आहे. यावर चालणारे विक्री व्यवहार आता सामान्य जनतेलाही http://mahaepos.gov.in/ या संकेतस्थळावर बघता येतात.

### अन्नसुरक्षेचा लाभ

अन्न सुरक्षा कायदा लागू झाल्यानंतर ऑक्टोबर २०१६ मध्ये शासनाने नव्याने ३० सप्टेंबर २०१६ अखेर पात्र ९२ लाख



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88

लाभार्थ्यांचा समावेश करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर पुन्हा एप्रिल २०१८ मध्ये आधार सिडींग झाल्यावर पुन्हा ९९ लाख लाभार्थ्यांचा समावेश करणे शक्य झाले. संगणकीकरणामुळेच अशा प्रकारचे अपात्र लाभार्थी कमी होऊन पात्र लाभार्थ्यांचा समावेश करण्यात यश आले आहे.

औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा अशा एकूण १४ जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) मधील सर्व शेतकऱ्यांना १५ ऑगस्ट, २०१५ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांप्रमाणे प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो या परिमाणात गहू २ रुपये प्रतिकिलो व तांदूळ ३ रुपये प्रतिकिलो या दराने अन्नधान्याचा लाभ देण्यात आला आहे. (दरमहा ६८ कोटी) यासाठी, याच शासन निर्णयानुसार एपीएल (केशरी) मधील सर्व शेतकरी लाभार्थ्यांकरिता आवश्यक असलेल्या २७,२३६मे. टन अन्नधान्याची (१७,२७२ मे. टन गहू व ९,१६४ मे.

## अन्न व औषध प्रशासन विभाग

औषधी परवाने व विविध दाखले मिळवण्यासाठी क्लिष्ट अर्ज व वेळकाढू पद्धती होती. सर्वसामान्यांची दलालांकडून पिळवणूक होत होती. प्रत्येक अर्जासोबत किमान १००-१५० पृष्ठांची माहिती असल्याने हाताळण्यासाठी कठीण होते त्याशिवाय रेकॉर्ड ठेवण्यासाठी जागा अपुरी पडत होती. संपूर्ण कार्यालय संगणकीकृत व पेपरलेस करण्यात आली. यासाठी टोल फ्री क्रमांक: १८००२२२३६५ असा आहे. अखाद्य बर्फामध्ये शासनाने निळा रंग घालण्याचा अन्न सुरक्षा व मानके अधिनियम अंतर्गत नियम केला. तो केंद्र शासनानेही तत्काळ अंगीकृत केला आहे. अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत अन्नछत्रे, मंगल कार्यालये, रस्त्यावरील पदार्थ विक्री करणारे अशा लोकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबवून राज्यातील २३६ प्रमुख मंदिरांमध्ये बदलाच्या शस्त्रक्रियांसाठी सुमारे २.७५ ते ६.० लक्ष खर्च यायचा. केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला आणि स्टेन्टच्या किंमतीमध्ये लक्षणीय घट होऊन ७२६० ते २९००० इतक्या अल्प किंमतीत स्टेन्ट उपलब्ध झाले आहेत. गुडघे बदलाच्या सामग्रीच्या किंमती ६५ टक्क्ने घटल्याने ६२७७० ते १.५८ लक्ष इतक्या अल्प किंमतीत उपचार आता शक्य आहे. वैद्यकीय उपकरणांचा



**सुरक्षित अन्नपदार्थांबाबतच्या कार्यशाळेत भित्तिपत्रिकेचे प्रकाशन करताना अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट आदी मान्यवर.**



**वैद्यकीय उपकरणांचा पुनर्वापर व अस्थिव्यंग प्रत्यारोपणासंबंधी रुग्ण व रुग्णालयास भेट देताना अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट.**

आल्यामुळे कागद विरहित पारदर्शक पद्धती अंगीकारणारे महाराष्ट्र हे संपूर्ण देशामध्ये पहिले राज्य ठरले आहे. औषधी परवाने व विविध दाखले आधारजोडणी, डिजिटल स्वाक्षरीद्वारे ऑनलाइन उपलब्ध झाले आहेत. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत औषधे निर्यात करण्यासाठीचे प्रमाणपत्र संगणकीय पद्धतीने देण्यात येते.

अन्न औषध प्रशासनाच्या विविध कायद्यांतर्गतच्या कामकाजासंबंधी जनतेला माहिती अथवा आपत्कालीन कामाकरिता नोव्हेंबर २०१४ पासून राज्य नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. त्याचा लाभ ३५०० हून अधिक लोकांनी घेतला. याव्यतिरिक्त राज्यातील हॉटेल व्यवसायिकांसाठी प्रशिक्षण आयोजित करून १५,१९९ जणांना प्रशिक्षित केले आहे.

### स्टेन्ट व गुडघे बदल

हृदय शस्त्रक्रियेमध्ये वापरात येणाऱ्या स्टेन्ट व गुडघे बदलमधील सामग्रीच्या किंमती कमी करण्यात यश मिळाले आहे. कार्डिॲक स्टेन्टच्या किंमती सुमारे १.५० लक्ष ते ३ लक्ष होत्या, तर गुडघे पुनर्वापर व अस्थिव्यंग प्रत्यारोपणाचे विनापरवाना साठे, इ. करिता रुग्णालयांवरील धाडींचे प्रमाण वाढवले. हा विषय दुर्लक्षित असल्याने जनतेची पिळवणूक होत होती. रुग्णांकडून संमती न घेता वैद्यकीय उपकरणांचा (बलून कॅथेटर्स, गाईडींग कॅथेटर्स) पुनर्वापर करणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्यात येते. अस्थिव्यंग प्रत्यारोपणाचा विनापरवाना साठा करणाऱ्या सुमारे ३९ पेढ्यांवर कारवाई करून एकूण रु.६,५९,६४,०४८ किमतीचा अवैध साठा जप्त करण्यात आला.



join us 》》 https://t.me/Mpscrockers88

टन तांदूळ) केंद्र शासनाकडून नियंत्रित दराने खरेदी करण्यात येत आहे. त्याकरिता आजपर्यंत २१०० कोटी एवढा खर्च झाला आहे.

## विकेंद्रित खरेदी योजना

केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत राज्य शासनाकडून हंगाम २०१६-१७ पासून विकेंद्रीत खरेदी योजना राबवण्यात येते. या योजनेमध्ये पूर्वी भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्यात येणारे धान्य आता थेट राज्य शासनाकडून लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये वितरित करण्यात येते. त्यामुळे धान उत्पादक जिल्ह्यांतील तयार होणाऱ्या तांदळाची तत्काळ विल्हेवाट लावता येणे राज्य शासनास शक्य झाले आहे. परिणामी यापूर्वी योजना राबवताना होणारा कालापव्यय टाळता आला आहे. तत्काळ खरेदी केलेल्या धान्याची भरडाई करून त्या-त्या व लगतच्या जिल्ह्यात तांदुळाचे वाटप केल्याने होणारे साठवणुकीचे नुकसान टळले. गतवर्षी धानाची २६,७१,२२५.६९ मेट्रिक टन इतकी उच्चांकी खरेदी झाली. ९२.७० टक्के इतकी भरडाई झाली आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल रु.२०० इतका बोनसही देण्यात येत आहे.

## नवीन गोदामे

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत सर्व योजनांचे मासिक नियतन ३.८३ लक्ष मे.टन आहे. केंद्र शासनाच्या सुचनानुसार मासिक नियतनाच्या तीन पट साठवणूक क्षमता शासनाकडे असणे अपेक्षित आहे. २०१४ पूर्वी शासनाच्या मालकीच्या गोदामांची क्षमता ४.८३ लक्ष मे.टन इतकी होती. नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत हाती घेतलेल्या कार्यक्रमांतर्गत मागील ४ वर्षात आणखी १.७४ लक्ष मे.टन क्षमतेच्या ११२ गोदामांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. साठवणूक क्षमतेत ३६ टक्के इतकी वाढ झाली आहे. त्यामुळे धान्यसाठवणुकीत मोठ्या प्रमाणात (६० टक्के) स्वयंपूर्णता आली. आणखी १.२३ लक्ष मे.टन क्षमतेच्या ६९ गोदामांच्या बांधकामाबाबत कार्यवाही सुरू आहे. सध्या राज्य शासनाच्या मालकीच्या गोदामाची क्षमता ६.५८ लक्ष मे.टन इतकी आहे.

## द्वारपोहोच शासन

द्वारपोच योजना अमलात येण्यापूर्वी भारतीय खाद्य महामंडळाच्या बस डेपोपासून शासकीय गोदामापर्यंतची वाहतूक कंत्राटदारामार्फत करण्यात येत होती. शासकीय धान्य गोदामापासून शिधावाटप दुकानांपर्यंतची वाहतूक आदिवासी क्षेत्रामध्ये आदिवासी विकास महामंडळामार्फत, अवर्षणप्रवण क्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्य पणन महामंडळामार्फत केंद्र शासनाकडून उपलब्ध झालेल्या निधीतून खरेदी केलेल्या वाहनांद्वारे द्वारवितरण योजनेंतर्गत करण्यात येत होती. अन्य जिल्ह्यांमध्ये दुसऱ्या टप्प्यासाठीची वाहतूक रास्त भाव दुकानदारांमार्फत करण्यात येत होती. द्वारवितरण योजनेंतर्गत आदिवासी विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य पणन महामंडळ यांना शासनाने विहित केलेल्या प्रतिक्विंटल दराने तर, शिधावाटप दुकानदारांना वाहतूक रिबेट प्रतिक्विंटल दराने अदा केली जात होती.

या कार्यपद्धतीमध्ये सुसूत्रता नसल्याने लाभार्थ्यांचे हक्काचे धान्य



त्यांच्यापर्यंत पोहोचण्यामध्ये अनेक अडचणी येत होत्या. धान्याचा मोठ्या प्रमाणावर अपहार होत होता. यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत निर्धारित दराने व योग्य दर्जाचे धान्य शिधापत्रिकाधारकांना खात्रीशीररीत्या उपलब्ध होण्याच्या उद्देशाने सुधारित धान्य वितरण प्रणाली शासनाने अमलात आणली. या प्रणालींतर्गत, भारतीय अन्न महामंडळ ते शासकीय गोदाम व शासकीय गोदाम ते रास्त भाव दुकानापर्यंत अन्नधान्याची वाहतूक, खुल्या निविदा प्रक्रियेद्वारे जिल्हास्तरावर नियुक्त करण्यात येणाऱ्या एकाच वाहतूक कंत्राटदारामार्फत करावयाची आहे. त्यानुसार राज्यातील १७ जिल्ह्यांमध्ये दोन्ही टप्प्यातील वाहतूक सुरू करण्यात आली. मात्र काही अडचणींमुळे उर्वरित जिल्ह्यात वाहतूक कंत्राट निश्चितीसाठी नव्याने शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

या शासन निर्णयानुसार प्रतिक्विंटल आधारभूत दर, मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र येथे निश्चित करण्यात आली. परिमंडळनिहाय निविदा प्रक्रिया, मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र व पुणे येथे पूर्ण करण्यात आली. नागपूर, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर येथील मनपा क्षेत्रामध्ये तसेच भारतीय खाद्य निगम यांचे ज्या जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी, गोदाम व शासकीय गोदाम एकाच शहरामध्ये आहेत अशा ठिकाणी थेट वाहतूक निविदा प्रक्रिया इत्यादी सुधारणा करण्यात आल्या आहेत. या शासन निर्णयानुसार एकूण ५ परिमंडळे, ५ शहरे व ३३ जिल्ह्यांत अन्नधान्य वाहतूक कंत्राट निविदा निश्चिती होऊन दोन्ही टप्प्याची वाहतूक कार्यान्वित करण्यात आली. रायगड जिल्ह्यामध्ये करारनामा करण्यात येऊन वाहतूक कार्यान्वित करण्यात येत आहे. यामुळे शासनाचे ३२.२५ कोटी रुपयांची बचत होणार आहे.

## संसदीय कामकाज

सर्व पक्षाच्या आमदारांच्या स्वीय सहायकांकरिता संसदीय आयुधांचा सुयोग्य वापर व ऑनलाइन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सत्ताधारी पक्षाच्या प्रतोदांसाठी कॅबिनेट/राज्यमंत्री दर्जा देण्यात आला. विधान परिषदेचे कामकाज कागदविरहित



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88

(पेपरलेस) करण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न. विधान परिषदेचे आमदार विधानमंडळाचे कामकाज सद्या लॅपटॉपच्या माध्यमातून करत आहेत.

### ग्राहक संरक्षण

राज्यात ग्राहक धोरण तयार करण्यासाठी प्रथमच तज्ज्ञ समितीची स्थापना करण्यात आली. यापूर्वी अस्तित्वात नसलेली थेट विक्री मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी कृतिगट व मध्यवर्ती (नोडल) अधिकाऱ्याची नेमणूक झाली. ऑनलाइन पद्धतीने ग्राहक मंच व राज्य आयोगात ग्राहकांच्या तक्रारी करण्याकरिता मान्यता देण्यात आली.

पेट्रोल व डिझेलची चोरी रोखण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या. ऑडिट रिपोर्ट ही बाब नव्याने सुरू करण्यात आली आहे. पेट्रोलपंप युनिटच्या स्टॅम्पिंगसाठी, ऑईल कंपन्यांचे प्रतिनिधी, डिस्पेंसिंग युनिटच्या उत्पादकांचे प्रतिनिधी आणि पंपाचे डिलर या तीनही प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या घेऊन ऑडिट रिपोर्टद्वारे स्टॅंपिंग करण्याची पद्धत सुरू केली. पर्यायाने पेट्रोल पंपावरील फसवणुकीच्या तक्रारीमध्ये सर्व संबंधितांची संयुक्त जबाबदारी आली. त्यामुळे तक्रारीत घट झाल्याचे दिसून येते.

### विभागीय स्तरावरील सुनावण्या

मागील ३ वर्षांपासून सर्वसामान्य जनतेला शासनाकडील अपिल कामी वकीलासह मुंबई येथे हेलपाटे घालण्यास लागू नयेत म्हणून विभागीय पातळीवर अपिलांच्या सुनावणी घेण्याची पद्धती सुरू केली गेली. या पद्धतीने आतापावेतो सुमारे २०३२ अपील प्रकरणांचा निकाल लागला असून, त्यामुळे पक्षकाराचा वेळ व पैसा यांची मोठ्या प्रमाणावर बचत झाली आहे.

### हाफकिनचे बळकटीकरण

हाफकिन महामंडळाच्या माध्यमातून दर्जेदार लसी व औषधांची निर्मिती शक्य व्हावी, त्याचबरोबर संशोधन कार्याला गती मिळावी, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या महामंडळाला पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे व विशेष दर्जा मिळण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. हाफकिन महामंडळाने औषध खरेदी प्रक्रियेचे संपूर्ण संगणकीकरण करून यात संपूर्ण पारदर्शकता आणली. हाफकिन जीव औषध महामंडळाची मालकी असलेली हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड, जळगाव या कंपनीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी शासन स्तरावर विभागामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.

हाफकीनच्या औषध निर्माण महामंडळासाठी विविध जीवन रक्षक लस व औषध निर्माण करण्यासाठी राज्य शासनामार्फत १०० कोटी रुपयांचा निधी देण्यास मुख्यमंत्र्यांनी नुकतीच तत्त्वतः मंजुरी दिली आहे. हाफकिन प्रशिक्षण संशोधन व चाचणी संस्थेसाठी अत्याधुनिक अशी नवीन इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,** विभागीय संपर्क अधिकारी

### वैधमापन शास्त्र यंत्रणेचे संगणकीकरण

राज्यात वैधमापन शास्त्र यंत्रणेचे संपूर्ण संगणकीकरण प्रक्रिया सुरू करण्यात आली. ग्रास शुल्क यंत्रणेमधून ऑनलाइन पद्धतीने शासकीय शुल्क भरता येणार आहे. त्यामुळे विनाविलंब कोणत्याही रांगेत उभे न रहाता प्रत्येक उपयोगकर्त्यांना कोणतेही परवाने / नोंदणी / नूतनीकरण अशी सर्व कामे ऑनलाइन करता येणार आहेत. ज्यामुळे व्यवसाय करणे सुलभ होईल.

### एका दिवसात पडताळणी

कमलेश गौर यांचे ठाण्यातील कोपरी येथे, 'टीपटॉप मिठाई वाला' हे दुकान आहे. त्यांनी दुकानातील इलेक्ट्रॉनिक वजन काटे वार्षिक फेरतपासणी व मुद्रांकन वजन माप विभाग यांच्याकडून नुकतेच करून घेतले. वैधमापन शास्त्र विभागाचे वजनकाटे पडताळणीचे काम आता खूप सुकर व पारदर्शक झाल्याचा त्यांचा अनुभव आहे.

शासनाच्या ग्रास प्रणालीच्या माध्यमातून ६ सप्टेंबर २०१८ रोजी त्यांनी पडताळणी शुल्क जमा केले. लगेच त्यांनी दुसऱ्या दिवशी ७ सप्टेंबर २०१८ रोजी निरीक्षक वैधमापन शास्त्र ठाणे विभाग २ कार्यालयात दुकानातील वजनकाट्याच्या वार्षिक तपासणीसाठी संपर्क साधला. तेथे उपस्थित कर्मचारी व निरीक्षक यांनी त्यांना संगणकीकरण व नोंदणी प्रक्रिया या नवीन संकल्पनेविषयी माहिती दिली. ती पूर्ण करण्यास मार्गदर्शन केले. सकाळी नोंदणी अर्ज भरून दिला व लगेचच या अर्जाप्रमाणे त्यांना नोंदणी क्रमांक ताबडतोब मिळाला. दुपारी निरीक्षक, ठाणे विभाग २ व कर्मचारी यांनी दुकानात भेट देऊन दुकानातील वजन काटे यांची तपासणी करून त्यावर मुद्रांकन ठसा उमटवला. पडताळणी प्रमाणपत्र लॅपटॉपवर बनवले व रंगीत पडताळणी प्रमाणपत्राची प्रत दुकानात लगेचच दिली. कायमस्वरूपी नोंदणी क्रमांक मिळाला. एका दिवसात वजनकाट्याचे पडताळणी व मुद्रांकनाचे काम, पडताळणी प्रमाणपत्रासह करून मिळाले. शासनाच्या ऑनलाइन ग्रास प्रणाली व संगणकीकरणामुळे वार्षिक नूतनीकरण करणे सुलभ व गतिमान झाले आहे.



**कमलेश गौर – मिठाई विक्रेता यांना वजनकाट्याची पडताळणी व मुद्रांकनाचे काम प्रमाणपत्रासह एका दिवसात मिळाले.**



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88

# आम्ही लाभार्थी

## जीवन वाचले



सूर्यभान तळे

सूर्यभान तळे यांना डॉक्टरांनी ॲन्जिओप्लास्टी करून तीन स्टेंट लावावे लागतील. त्याचा अंदाजे खर्च सुमारे पाच लक्ष इतका येईल असे सांगितले. एवढा आर्थिक खर्च करणे त्यांना शक्य नसल्यामुळे त्यांनी ऑपरेशन करावयाचे टाळले. केंद्र शासनाकडे वारंवार पाठपुरावा केल्याने स्टेंटला औषधाचा दर्जा घोषित करण्यात आला. त्यामुळे स्टेंटच्या किंमती कमी झाल्या. त्यांना यापूर्वी सांगितलेला पाच लाख रुपयाचा खर्च अवघ्या १.५० लाख रुपयांवर आला. यामुळे औरंगाबाद येथील हेगडेवार हॉस्पिटलमध्ये स्वस्त दरात स्टेंट टाकण्याचे ऑपरेशन करता आले.

## आठ दिवसात परवाना



श्याम बहाळकर

श्याम बहाळकर यांना यापूर्वी औषध परवाने प्राप्त करण्यासाठी विविध कागदपत्रांच्या प्रतींसह अन्न व औषध प्रशासन कार्यालयास बऱ्याच वेळा चकरा माराव्या लागत. त्यासाठी बराच वेळ वाया जायचा. औषध प्रशासनाने नवीन परवाने ऑनलाइन मंजुरीची सुविधा सुरू केल्यावर त्यांनी नवीन परवाने प्राप्त करण्यासाठी सर्व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज केला. त्यांना आठ दिवसांतच घरबसल्या नवीन औषध परवाने प्राप्त झाले. एकदा सुद्धा त्यांना प्रत्यक्ष औषध प्रशासनाच्या कार्यालयात जावे लागले नाही. त्यांच्यासारख्या बऱ्याच व्यावसायिकांना ऑनलाइन प्रक्रियेचा खूप फायदा झाला आहे. यामुळे होणारा आर्थिक व मानसिक त्रास बऱ्याच प्रमाणात थांबला आहे.

**केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे अनुदानित दराचे केरोसीन केवळ बिगर गॅस जोडणी शिधापत्रिकाधारकांना अनुज्ञेय आहे. केंद्र शासनाकडून राज्यास प्रत्येक तिमाहीकरिता केरोसीन नियतन मंजूर करण्यात येते. केंद्र शासनाकडून प्राप्त केरोसीन नियतन व जिल्ह्यांची केरोसीन मागणी विचारात घेऊन सर्व जिल्ह्यांना त्यांच्या मागणीच्या १०० टक्के इतके केरोसीन नियतन मंजूर करण्यात येते. गॅसधारकांच्या संख्येत वाढ होत असल्याने राज्याच्या केरोसीन मागणीत कपात होत आहे.**

# केरोसीनमुक्ती

जानेवारी २०१५ मध्ये राज्याची केरोसीनची मासिक मागणी १,७७,०८० कि.ली.इतकी होती. तथापि, राज्यात राबवण्यात येत असलेल्या गॅस स्टँपिंग मोहिमेतून गॅसजोडणी शिधापत्रिकाधारकांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे केरोसीन मागणीत मोठी कपात झाली आहे. सद्यस्थितीत मासिक केरोसीन मागणी २६,२९२ कि.ली. इतकी आहे. अर्थात जानेवारी २०१५ ते जुलै २०१८ या कालावधीत राज्याच्या केरोसीन मागणीत १,५०,७८८ कि.ली. इतकी बचत झाली आहे.



केंद्र शासनाकडून एप्रिल २०१५ पासून ५२,१८८ कि.ली.मासिक केरोसीन कोटा प्राप्त होत होता त्यात कपात होऊन जुलै, २०१८ मध्ये ३१,२३६ कि.ली. इतका केरोसीन कोटा प्राप्त होत आहे. अर्थात एप्रिल २०१५ ते जुलै २०१८ या कालावधीत केरोसीन कोटयात २०,९५२ कि.ली. इतकी बचत झाली आहे.

केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे अनुदानित दराचे केरोसीन केवळ बिगर गॅस जोडणी शिधापत्रिकाधारकांना अनुज्ञेय असल्याने गॅसधारक शिधापत्रिकांना अनुदानित दराच्या केरोसीन मधून वगळण्याकरिता शिधापत्रिकांवर स्टँपिंग करण्याची मोहिम राबवण्यात येत आहे. माहे जुलै, २०१५ पर्यंत राज्यात १.०४ कोटी शिधापत्रिकांवर स्टँपिंग करण्यात आले होते. माहे जून, २०१८ पर्यंत स्टँपिंग केलेल्या शिधापत्रिकांची संख्या १.५४ कोटी इतकी झाली आहे.

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार राज्य केरोसीनमुक्त करण्यासाठी शासन प्रयत्नशील

आहे. त्याअनुषंगाने मार्च,२०१७ पासून पुणे व कोल्हापूर तर ऑगस्ट,२०१७ पासून भंडारा शहर केरोसीनमुक्त करण्यात आले आहे. राज्यातील महापालिका क्षेत्रे व नगरपालिका क्षेत्रे केरोसीनमुक्त करण्याबाबत राज्य शासन प्रयत्नशील आहे.

जून, २०१८ पासून मुंबई–ठाणे शिधावाटप क्षेत्रात तर माहे ऑगस्ट, २०१८ पासून संपूर्ण राज्यात केरोसीनचे वितरण विशिष्ट ठिकाणांहून (पॉइंट ऑफ सेलमधून) लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला. राज्यात गॅस जोडणी शिधापत्रिकांवर स्टॅंपिंग करण्यात येत आहे. त्यामुळे केरोसीन मागणीत मोठी कपात झाली आहे. केरोसीन कोट्यात बचत झाली आहे. या कार्यवाहीमुळे मुंबई–ठाणे शिधावाटप क्षेत्रातील केरोसीन कोट्यात ४३ टक्के इतकी बचत झाली आहे. केरोसीनचे वितरण पॉइंट ऑफ सेल मधून करण्यात येत असल्याने अनुदानित दराचे केरोसीन पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे शक्य झाले. तसेच केरोसीनच्या काळाबाजारास आळा बसला आहे.

### २.८० कोटी गॅस जोडण्या

प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना गॅस जोडण्या वितरित करण्यात येत आहेत. त्यापैकी प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत जून २०१८ पर्यंत २५.२६ लक्ष कुटुंबांना गॅस जोडण्या वितरित करण्यात आल्या. राज्यातील एकूण गॅस जोडण्यांची संख्या २.८० कोटी इतकी झाली आहे. त्यामुळे



राज्याच्या केरोसीन कोट्यात पुन्हा बचत होण्याची शक्यता आहे.

# धान्य मिळणे सुलभ झाले...

### रांग लावावी लागत नाही

जालना येथील विजया शाम खुरपे यांनी स्वस्त धान्य दुकानदाराकडे एक वर्षापूर्वी कुटुंबातील सदस्यांचे आधार कार्ड जमा केले. आता त्यांच्या घरातील कोणताही सदस्य रेशन दुकानात जाऊन अंगठा लावून धान्य घेऊन येतो. पूर्वीसारख्या रेशन दुकानात चकरा माराव्या लागत नाहीत. महिन्याच्या १० तारखेनंतर रेशन दुकानात गेले की हमखास धान्य मिळते. आता दुकानात जास्त वेळ रांग लावावी लागत नाही. अंगठा दिला की लगेच पावती व धान्य मिळते. दुकानदारसुद्धा चांगली वागणूक देतो. यापूर्वी त्यांना असा अनुभव नव्हता.

### धान्य वेळेत मिळते




जालना जिल्ह्यातील अर्चना गणेश गोगडे यांच्या गावात पूर्वी कधी धान्य आले आणि कधी वाटप झाले याबाबत कोणतीही माहिती प्राप्त होत नव्हती. कधी कधी दोन महिन्यातून एकदाच स्वस्त धान्य मिळत असे. पॉस मशीन स्वस्त धान्य दुकानात आल्यानंतर त्यांना आता महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यातच धान्य मिळते. कधी कधी तर दुकानदार गावात भेटला तर 'धान्य आले आहे, अंगठा लावून घेऊन जा' असे सांगतो. पूर्वी धान्य कुटुंबातील सदस्यागणिक न मिळता प्रतिकार्ड मिळत असे आता पॉस मशीनमुळे जेवढे सदस्य आहेत तेवढे धान्य मिळते. मिळालेले धान्य व रक्कम पावतीवरून पडताळणी करता येते. पॉस मशीन दुकानामध्ये सुरू केल्यामुळे त्या समाधानी आहेत.

### घरपोच न्याय



**अझीज खान असलम खान**

औरंगाबाद येथील सोहिल मेडिकल स्टोअर्सचे मालक अझीज खान असलम खान यांच्या दुकानाचा परवाना निलंबन करण्याची कार्यवाही अन्न व औषध प्रशासन विभागाने केली होती. त्या आदेशाविरुद्ध स्थगिती मिळवण्यासाठी व सुनावणीसाठी मुंबई येथील मंत्री कार्यालयात वारंवार जावे लागणार होते, ते अत्यंत वेळखाऊ व खर्चिक होते. मात्र त्यांच्या अपिलावर मंत्री महोदयांनी दिलेल्या स्थगिती आदेशाची प्रत ई–मेलवर घरी उपलब्ध झाली. त्यानंतर अपिलावरील सुनावणीचे आयोजन स्थानिक पातळीवर केले गेले. अशा पद्धतीचे कामकाज यापूर्वी कोणत्याही मंत्री महोदयांनी केले नाही. हे विशेषत्वाने नमूद करण्यासारखे आहे. त्यामुळे खरोखरच शासन आपल्या दारी आल्याची प्रचिती त्यांना आली. यामुळे त्यांच्यासारख्या अपिलार्थींना मुंबई येथे वकिलासह चकरा मारणे वाचले आहे. मानसिक ताण व खर्चसुद्धा वाचला.



join us » » https://t.me/Mpscrockers88

शासकीय योजनांचा लाभ घेऊन, स्वत:च्या आयुष्यात परिवर्तन घडवून आणणाऱ्या महाराष्ट्राच्या विविध भागातील नागरिकांच्या यशकथा इतरांसाठी प्रेरणादायी व उत्साह वाढवणाऱ्या आहेत. एका नव्या परिवर्तन पर्वाचे साक्षीदार झालेले हे सर्व लाभार्थी विविध योजनांच्या यशस्वितेचे खरेखुरे 'ब्रँड ॲम्बेसेडर' आहेत.



# महाराष्ट्राच्या परिवर्तन कथा >>>

**जलयुक्त शिवार अभियानाला नागरिकांनी चळवळ म्हणून स्वीकारले आहे. नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग या अभियानाला लाभल्यामुळे या अभियानाची यशस्वी अंमलबजावणी केली जात आहे. यामुळे आता गाव व शिवार जलयुक्त व हिरवेगार होऊ लागले आहे.**

# सर्वांसाठी पाणी, टंचाईमुक्त महाराष्ट्र

धुळे जिल्हा

नागपूर-सुरत महामार्गाच्या दक्षिणेला धुळे तालुक्यातील कुंडाणे आणि मोराणे (प्र. लळिंग) शिवार आहे. या शिवारातून भुतड्या नाला वाहतो. पाऊस आला, तर या भागातील पाणी वाहत जाऊन पुढे ते मोराणे गावाजवळून वाहत जाणाऱ्या पांझरा नदीला मिळते. त्याचा कोणताही लाभ शेतकऱ्यांना होत नव्हता. या पार्श्वभूमीवर मोराणे येथील शेतकरी शिरीष सोनवणे व त्या परिसरातील शेतकऱ्यांनी भुतड्या नाल्यावर सिमेंट नाला बांध बांधावा, अशी मागणी केली. त्यानुसार लघुसिंचन विभाग (जलसंधारण) यांनी भुतड्या नाल्यावर सिमेंट नालाबांध बांधला. या नाल्यातील पाणी, शेतकऱ्यांनी लोकवर्गणी गोळा करीत, सुमारे तीन किलोमीटर अंतराची चारी खोदून परिसरातील चार नाल्यांमध्ये खेळवले. ते पाणी बुराडी बल्ली नाल्यापर्यंत आणले. बुराडी बल्ली नाल्याचे खोलीकरण जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून कृषी विभागाने केले. त्याचाही लाभ परिसरातील विहिरींना झाला आहे.

## पिकांना मिळाली नवसंजीवनी

भुतड्या नाल्यातील पाणी विविध नाल्यांमध्ये फिरविल्याने परिसरातील ५० हून अधिक विहिरींची पाण्याची पातळी उंचावली आहे. तसेच लहानमोठी दोन शेततळीही भरली आहेत. या भागातील शेतकऱ्यांनी प्रामुख्याने कपाशी, मका, भुईमूग, कांदा आदी पिकांची लागवड केली आहे. यंदा ऑगस्टनंतर पावसाचा खंड पडला. त्यामुळे पिकांना पाण्याचा ताण पडला. मात्र, पाणी खेळवल्यामुळे सध्या या भागातील विहिरींची भूजल पातळी चांगलीच उंचावली आहे. ज्या ठिकाणी अर्धा तास पाणी उपसा होत असे, तेथे आता २४ तास पाणी उपसा होऊ शकतो. पावसाने दडी मारली तरी संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी वीज पंपाच्या साहाय्याने पिकांना पाणी देत पिके जागवली आहेत. शिवाय यामुळे खरीप हंगामाबरोबरच रब्बी हंगाम घेण्याचीही सोय झाली आहे.

### अभियानाला लोकसहभागाचे बळ

या गावात नाला खोलीकरणाच्या कामामुळे पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवण्यात आले. नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत या परिसरातील शेतकऱ्यांनी स्वखर्चाने चारी तयार करून, वाहून जाणारे पाणी अन्य नाल्यांमध्ये खेळवले. त्यामुळे सुमारे १५० एकर क्षेत्रासाठी संरक्षित जलसाठा उपलब्ध होऊ शकला.

निंबा विठ्ठल पाटील यांची शेती कोरडवाहू आहे. ती सर्वस्वी पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. यंदा पावसाने ओढ दिली आहे. शेताजवळून नाला वाहतो. या नाल्याचे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत खोलीकरण करण्यात आले आहे. या बांधामध्ये सध्या पाणी उपलब्ध आहे. या पाण्याचा उपयोग पिकांना देण्यासाठी ते करणार आहे.

### संरक्षित जलसाठा

मोराणे (प्र. लळिंग) कुंडाणे येथील शिरीश सोनवणे यांच्या शिवारातून वाहणाऱ्या भुतडी नाल्याचे पाणी वाहून पांझरा नदीला मिळत असे. ते अडवण्याचे नियोजन करून ते शेतशिवारात खेळवण्यात आले. त्यासाठी परिसरातील शेतकऱ्यांनी सहकार्य केले. जलयुक्त शिवार अंतर्गत शिवार फेरीच्या वेळेस भुतड्या नाला ते बुराडी बल्ली नाला जोडण्याचे नियोजन केले. त्यामुळे आज शेतीसाठी संरक्षित जलसाठा निर्माण करण्यात हे नाले यशस्वी ठरले आहेत.

**– गोपाळ साळुंके,** माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, धुळे





join us 》》 https://t.me/Mpscrockers88

नाशिक जिल्हा

# हिरवेगार कितांगळी

गावाने एकत्रित निश्चय केल्यावर सकारात्मक बदल कसा वेगाने घडून येतो याचा प्रत्यय सिन्नर तालुक्यातील कितांगळी गावात गेल्यावर येतो. गावात जलयुक्त शिवार अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी झाल्याने बाजरी, सोयाबीनसारख्या पिकांची जागा आता टमाटर, द्राक्षे, कांदा पिकाने घेतली आहे.

अत्यंत कमी पर्जन्यमान असलेल्या या गावातील विहिरी पाण्यासाठी ६० ते ७० फूट खोल कराव्या लागतात. पाणी लागेलच याचीही निश्चिती नसे. गाव देवनदी आणि कासारी नाल्याच्या प्रवाहाच्या मधोमध आहे. मात्र नाल्यात पूर्णत: गाळ साचल्याने तो जमीनसपाटीला आला होता आणि पावसाअभावी नदीलाही पाणी पुरेसे नव्हते. त्यामुळे खरिपानंतर दुसरे पीक घेणे शेतकऱ्यांना शक्य नव्हते.

## विहिरींना १५ ते २० फुटांवर पाणी

नाल्याचे तीन ते चार मीटर खोलीकरण आणि ३० ते ३५ मीटर रुंदीकरण करण्यात आले. एकूण साडेचार किलोमीटर क्षेत्रात हे काम करण्यात आले. नाल्यात असलेले अतिक्रमण काढण्यात आले. बऱ्याचदा मध्यरात्रीपर्यंत काम चालायचे. सोबत बंधाऱ्याची दुरुस्ती आणि भूजल सर्वेक्षण यंत्रणेमार्फत रिचार्ज शाफ्टचे काम करण्यात आले.





गावात आतापर्यंत केवळ दीडशे मिमी पाऊस झाला आहे. मात्र नाला ओलांडून जाणाऱ्या कडवा कालव्याच्या जलसेतूमधून बाहेर पडणाऱ्या पाण्यामुळे संपूर्ण साडेचार किलोमीटरच्या पात्रात दीडशे टीसीएम पाणीसाठा निर्माण झाला आहे. रिचार्ज शाफ्टमुळे जमिनीत पाणी मुरण्यास मदत झाली. त्यामुळे गावातील दोनशेपेक्षा जास्त विहिरींना फायदा झाला असून विहिरीमध्ये १५ ते २० फुटांवर पाणी आले आहे.

पाणी उपलब्ध झाल्याने पीक पद्धतीत आमूलाग्र बदल घडून आला आहे. टमाटरचे क्षेत्र १०० एकरने तर द्राक्षाचे क्षेत्र ५० एकराने वाढले आहे. मिरची, ऊस, भुईमूग आदी पिकेदेखील शिवारात दिसू लागली आहेत. टमाटरचे दोन हजार कॅरेट दररोज बाजारात जातात. 'जलयुक्त'मुळे जिथे कोरडे गवत आणि झुडपे दिसायची तिथे आता जलसाठा दिसतोय. शिवाराचे बदललेले रूप पाहून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. ग्रामस्थांना प्रतीक्षा आहे ती रब्बी हंगामाची.

## सहकार्यातून सुटले प्रश्न

नाल्यातून काढण्यात आलेला गाळ गावातील शेतात टाकण्यात आल्याने शेतजमीन सुपीक होण्यास मदत झाली आहे. गाळ टाकल्याने नाल्याच्या किनाऱ्यावरील आणि शिवाराकडे जाणारे रस्ते तयार झाले आहेत. पावसाळ्यातही आता सहजपणे शिवारात जाता येते.

युवा मित्र संस्थेच्या सहकार्याने लोकसहभागातून काम करण्यात आल्याने केवळ ७ लाख ३० हजार खर्च झाला. कंत्राटदारांकडून हे काम करण्यात आले असते तर १६ लाख आणि प्रचलित दराने केले असते तर ३४ लाख खर्च झाला असता. सिमेंट बंधारे बांधून एवढेच पाणी अडवण्यासाठी ८५ लाख खर्च झाला असता.

## गाळयुक्त शिवार

जुने बंधारे गाळमुक्त करण्यात आले. जिल्हा परिषद लघू पाटबंधारे विभागामार्फत २२ हजार घनमीटर आणि मृद व जलसंधारण विभागामार्फत ६१ हजार घनमीटर गाळ काढण्यात आला.

**जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक.**



**पन्हाळा तालुक्यातील जाखले गावात जलयुक्त शिवारच्या कामांमुळे पाणीदार झालेला तलाव.**

# शेतकऱ्यांना दुहेरी लाभ

**कोल्हापूर जिल्हा**

पन्हाळा तालुक्यात ज्योतिबा डोंगराच्या पायथ्याला १०२४ हेक्टर क्षेत्रफळाचे जाखले हे गाव! डोंगराच्या उताराला असणारे हे गाव तसे पाहिले तर परंपरागत दुष्काळग्रस्त. १९७२ च्या दुष्काळामध्ये या गावात ३४० मीटरचा कुरण पाझर तलाव आणि ४४० मीटरचा माने पाझर तलाव घेण्यात आला. नंतरच्या काळात वेळीअवेळी आणि अत्यल्प पडणाऱ्या पावसामुळे हे तलाव कोरडे पडू लागले. त्यामुळे या तलावाकडे कोणाचेही लक्ष गेले नाही, बघता-बघता हा तलाव पूर्णत: गाळाने भरुन गेला अन जाखले गावावर दुष्काळाच्या झळा अधिक तीव्र झाल्या.

## तरुणांची संकल्पपूर्ती

जाखले गावास शेतीच्या पाणी टंचाईबरोबरच पिण्याच्या पाण्याचीही तीव्र टंचाई भासू लागली. दरवर्षी जानेवारीपासूनच पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ लागली. यावर कायमस्वरूपी उपाय काढण्यासाठी गावातील तरुण पुढे सरसावले. दोन वर्षापूर्वी सागर माने यांनी गावातील तरुणांना संघटीत करून जलयुक्त शिवार अभियान राबवण्यास सुरुवात केली. गेल्या अडीच तीन वर्षात पिण्याच्या पाण्याची वानवा असलेल्या जाखले गावात जलयुक्त शिवार अभियानातून गंगा अवतरली.

## ध्यास जलयुक्त शिवारचा

कृषी विभागाच्या मदतीने गावाच्या शिवारात पडणाऱ्या पावसाच्या पाण्याची साठवणूक करण्याच्या दृष्टीने प्रारूप आराखडा तयार करण्यात आला. गावात १९७२च्या दुष्काळात घेण्यात आलेल्या पाझर तलावाचे पुनरुज्जीवन करणे, गावातील दोन मोठ्या ओढ्यांवर जागोजागी साखळी सिमेंट बंधारे बांधणे, डोंगर उतारावरील ओघळ जोडणी प्रकल्प, सीसीटी, वनतळी घेण्याचे निश्चित करण्यात आले. गावात १९७२ च्या दुष्काळात घेण्यात आलेल्या कुरण व माने या दोन पाझर तलावांच्या दुरुस्तीसह गाळ काढण्यास प्रारंभ करण्यात आला. दोन मोठ्या ओढ्यावर १९५२ साली घेण्यात आलेल्या कोल्हापूर पद्धतीचा बंधाराही तकलादू झाला होता. हा मोठा ओढा गाळाने भरून गेल्याने तो लुप्त अवस्थेत होता. ओढ्याचे खोलीकरण आणि रुंदीकरण मोहीम ३ किलोमीटर अंतरात राबवल्याने लुप्त पावलेला ओढा जिवंत झाला. त्यामुळे मोठा पाणीसाठा होऊ शकला.

## लोकसहभाग

पाझर तलाव, ओढ्याचे खोलीकरण आणि रुंदीकरणाचे महत्त्वाकांक्षी प्रकल्प शासन योजना आणि लोकसहभागातून राबवण्यात आले. जवळपास ११ हजार ट्रॉली गाळ लोकसहभागातून काढून शेतात टाकण्यात आला. शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाची माती शेतीस मिळाली. त्यामुळे पिकेही चांगली येऊ लागली. असा दुहेरी लाभ जलयुक्त शिवार अभियानाद्वारे शेतकऱ्यांना मिळाला.

जलयुक्त शिवार अभियानातून सुमारे साडेचार कोटींची कामे शासन योजना आणि लोकसहभागातून झाल्याने जवळपास ६०० टीसीएम इतका पाणीसाठा जाखलेच्या शिवारात होऊ शकला. यामध्ये पाझर तलावांची दुरुस्ती, ओढ्याचे खोलीकरण, रुंदीकरण आणि १६ सिमेंट नालाबांध, २ वनतळी, १०० लूज बोल्डर तसेच २४ हेक्टरवर सीसीटी अशा जलसंधारणाच्या कामांची अंमलबजावणी करून दुष्काळी गावाचे सधन बागायती गावात रूपांतर करण्यात आले. जलयुक्त शिवार अभियान आणि लोकसहभागातून गावातील ओढ्यातील जवळपास ११ हजार ट्रॉली गाळ काढण्यात आला. त्यामुळे ओढ्यामध्ये आता चांगला पाणीसाठा झाला आहे. या पाण्यावर ऊसाबरोबरच अन्य पिकेही शेतकरी घेत आहेत.

**जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर.**



join us 》》 https://t.me/Mpscrockers88



# कोरड्या विहिरी भरल्या

नंदुरबार जिल्हा

नंदुरबार तालुक्यातील धानोरा महसूल मंडळातील संपूर्ण आदिवासी लोकसंख्या असलेले मौजे शिवपूर गावात २०१४-१५ पासून पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष होते. गावात पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरी कोरड्या पडल्या होत्या. गावात एकाच हातपंपाला पाणी उपलब्ध होते. गावात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली होती. हातपंपावर दिवसरात्र पिण्याच्या पाण्यासाठी हंड्याची रांग लागलेली असायची.

दुष्काळसदृश चित्र बदलण्याचा प्रयत्न मार्च २०१६ मध्ये सुरू झाला. शिवपूर गावाची जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवड करण्यात आली. गाव जलपरिपूर्ण करण्याचा ग्रामस्थांनीदेखील निश्चय केला. या अभियानाच्या माध्यमातून कृषी विभागामार्फत नाला खोलीकरण, कंम्पार्टमेंट बंडिंग, भूजल सर्वेक्षण यंत्रणेमार्फत रिचार्ज शॉफ्ट व पुनर्भरणाची कामे करण्यात आली. कृषी विभागामार्फत करण्यात आलेल्या नाला खोलीकरण कामांचा पुरेपुर फायदा झाला. त्यामुळे नाला खोलीकरणाची कामे पिण्याच्या पाण्याच्या स्रोताजवळ झाली आणि जून महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात जोरदार पाऊस झाल्यामुळे जलस्रोत पाण्याने भरले. शिवारातून वाहून जाणारे पाणी अडविण्यात आले.

गावालगतच्या नाल्याचे खोलीकरण करण्यात आल्याने विंधनविहीर आणि कोरड्या विहिरींनादेखील पाणी लागले. विहिरींच्या पाणी पातळीत लक्षणीय वाढ झाल्याने गावात नेहमी दिसणारी हंड्यांची रांग दिसेनाशी झाली. शिवपूर गावासाठी मुबलक पाणी उपलब्ध झाले व गावकऱ्यांची पिण्याच्या पाण्याच्या त्रासापासून कायमची सुटका झाली.

२०१७-१८ या वर्षात गावासाठी पाणीपुरवठा योजना मंजूर झाली. त्यातून नवीन विहीर ग्रामपंचायतच्या गावठाण जागेत नाला खोलीकरणाच्या कामालगत खोदण्यात आली. आता या विहिरीतून गावासाठी मुबलक पाणी पुरवठा होत आहे.

विहिरींच्या पाण्याची पातळी वाढल्यामुळे बागायती कपाशी, मिरची, मका, गहू पिकाच्या क्षेत्रात वाढ झाली आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार.**

# सिंचनाची हमी

बुलडाणा जिल्हा

मेहकर तालुक्यातील साब्रा-काब्रा गावांमध्ये जलयुक्त शिवार योजनेत जलसंधारणाची विविध कामे पूर्ण करण्यात आली. ही कामे होण्यापूर्वी गावशिवारात पाणी अडवण्याचे जलसंधारणाचे काम नसल्यामुळे, शिवारातील नाल्यांमध्ये पावसाचे पडलेले पाणी वाहून जायचे. परिणामी, गावशिवारात भूजल पातळी वाढत नव्हती आणि पिकांना संरक्षित सिंचन मिळत नव्हते. मात्र गावशिवारात दोन नाल्यांवर सिमेंट नाला बांध घेण्यात आले. साब्रा आणि काब्रा शिवारातील नाल्यावर सिमेंट नाला बांध घेण्यात आला. या दोन्ही बांधाची पाणी साठवण्याची क्षमता अनुक्रमे ४.६५ टिसीएम व ३.४५ टीसीएम आहे. जलयुक्त शिवार अभियानामुळे पावसाचे पडलेले पाणी सिमेंट नाला बांधमध्ये साचले. परिणामी, भूजल पातळीत वाढ झाली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या विहिरीत पाणीपातळी वाढली. पावसाचे पाणी या बांधामध्ये तुडुंब भरले. त्यामुळे शिवारातील विहिरींना पाझर फुटले. पावसाने मोठा खंड दिला, तेव्हा या संरक्षित सिंचनाच्या सुविधेमुळे शेतकऱ्यांनी करपणारे पीक वाचवले.

नाल्याशेजारील शेत असणारे शेतकरी विजय रामकिसन ठोकरे यांनी सांगितले. पावसाने मोठा दगा दिला आहे. अशा परिस्थितीत आमचे सोयाबीन पीक करपल्याशिवाय राहणार नव्हते. पण आम्ही संरक्षित सिंचन केले, सोयाबीन वाचवले. त्यामुळे हाती न येणारे सोयाबीनचे उत्पन्न आता हमखास येणार आहे.'

या अभियानाच्या प्रथम, द्वितीय टप्प्यात जिल्ह्यातील ५७५ गावांमध्ये विविध विभागांच्या समन्वयाने १२ हजारांवर कामे पूर्ण करण्यात आली. या कामांमुळे हजारो हेक्टर क्षेत्रावर संरक्षित सिंचन उपलब्ध झाल्यामुळे पीक उत्पादनात वाढ झाली आहे.

**- एस. के बावस्कर,** जिल्हा माहिती अधिकारी, बुलडाणा.



साब्रा-काब्रा गावामधील पाण्याने भरलेला ओढा



मृतप्राय झालेली कमळगंगा यंदाच्या पावसात दुथडी वाहू लागली.

अकोला जिल्हा

# कमळगंगेला नवसंजीवनी

राष्ट्रीय महामार्गाच्या कामांमध्ये जलसंधारणाच्या कामांची सांगड घालून अकोला जिल्ह्यात अनेक ठिकाणी जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली. यामध्ये कमळगंगा नदी व जामठी नाल्याचे पुनरुज्जीवन ही महत्त्वाकांक्षी कामे होती. कमळगंगाचे १० ते ११ किलोमीटरचे खोलीकरण करण्यात आले. पहिल्याच पावसात ही नदी भरभरून वाहत आहे.

मुर्तिजापूर तालुक्याची जीवनवाहिनी म्हणून एकेकाळी ओळखल्या जाणाऱ्या कमळगंगा नदीचे अस्तित्व पूर्णत: संपले होते. गाळ व मातीमुळे ही नदी अदृश्य झाली होती. यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सिंचनासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनामार्फत २३ कि.मी. लांबीच्या कमळगंगाचे १० ते ११ किलोमीटर खोलीकरण करण्यात आले. या नदीला मिळालेल्या पुनरुज्जीवनामुळे पहिल्याच पावसात नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात जलसाठा जमा झाला आहे. यामुळे नदी काठावरील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न निकाली लागला आहे. भूजल पातळीत वाढ झाली आहे. या नदीवरील जामठी नाला, पळसोडा येथील नाला, सोनोरातील नाल्यांचेही खोलीकरण करण्यात आल्यामुळे हे नाले पाण्याने भरून गेले आहेत.

अकोल्याहून अकोटकडे जाताना लागणाऱ्या अनेक गावांमध्ये जिकडे नजर जाईल, तिकडे अवाढव्य शेततळी नजरेस पडतात. मोठ्या तलावासारख्या दिसणाऱ्या या शेततळ्यांमध्ये नुकत्याच पडलेल्या पावसामुळे जलसंचय झाल्याने त्याचे सौंदर्य अधिकच खुलून दिसते. चार, पाच व सहा एकर क्षेत्रातील ही शेततळी इतर जिल्ह्यांसाठी आदर्श ठरली आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहाचे बांधकाम, अकोट–अकोला रोडचे रुंदीकरण, अकोला–खंडवा रेल्वे मार्गाचे विस्तारीकरण यासाठी गौण खनिजांची गरज भागवण्यासाठी, या कामांशी जलसंधारणाच्या कामांची सांगड घालून, ही शेततळ्यांची निर्मिती करण्यात आली आहे. अकोट तालुक्यातील कालवाडी येथील ६ एकरचे शेततळे, वणी वारुळा येथील २.५ एकर क्षेत्रातील शेततळे, बळेगाव येथील २.५ एकर व २ एकर क्षेत्रातील शेततळे, तरोडा येथील ४ एकर क्षेत्रातील शेततळे, करोडी येथील ४ एकर क्षेत्रातील शेततळे, दनोरी येथील ४ एकर क्षेत्रातील शेततळे, देवरी येथील ३ एकर क्षेत्रातील शेततळे आहेत. गायरान जमीन, नदीचे पात्र आणि शेतात या शेततळ्यांची निर्मिती करण्यात आली. यातील गौण खनिज रेल्वे मार्गासाठी वापरण्यात आले. खोल करण्यात आलेल्या या शेततळ्यांमध्ये पावसाचे ८ ते १० फुटापर्यंत पाणी जमा झाले आहे. काही ठिकाणी झरे लागल्याने हा जलसंचय वाढत आहे.

शेततळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने या भागातील पाण्याचा प्रश्न मिटला आहे. अकोला जिल्ह्यामध्ये प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे झाली आहेत. यामुळे नियोजनबद्ध पद्धतीने जलसंचय होईल. त्यामुळे परिसरातील शेती सिंचनाकरिता, पशुपक्ष्यांकरिता पाणी उपलब्ध होईल. भूजल पातळीमध्ये निश्चितच वाढ होईल.

**– प्रमोद धोंगडे,**
प्र. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला.



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88

वर्धा जिल्हा

# 'यशोदे'चा पुनर्जन्म

यशोदा ही वर्धा जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण नद्यांपैकी एक. आर्वी तालुक्याच्या बोरी या गावापासून उगम होऊन पुढे हिंगणघाट तालुक्यातील कनोली या गावी वर्धा नदीला मिळणारी ही 'वर्धेची उपनदी'. यशोदा नदीचे खोरे आर्वी, वर्धा, देवळी आणि हिंगणघाट या ४ तालुक्यात विस्तारले आहे. जिल्ह्यातील १४३ गावांचा समावेश या नदीच्या खोऱ्यात होतो. कधीकाळी ही सर्व गावे जलसमृद्ध होती. मानवाच्या हस्तक्षेपामुळे पर्यावरणाच्या ऱ्हासासोबत नदीचे प्रदूषण होत गेले. तिला पाणी पुरवणारे ओहोळ, नाले गाळाने काठोकाठ भरले आणि त्यांची पाणीवहन क्षमता कमी झाली. एकेकाळी पाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांवर शेती बहरली होती. यामुळे शेतात पाणी शिरून सुपीक माती वाहून जाण्यासोबतच शेतातील पीकही उद्ध्वस्त होत होते. या सर्वांचा परिणाम म्हणजे खळखळ वाहणारी यशोदा नदी कधी अदृश्य झाली कळलेच नाही.

२०१५ मध्ये शासनाचे जलयुक्त शिवार अभियान सुरू झाले आणि 'यशोदा' नदीचेही दिवस पालटायला सुरुवात झाली. टाटा ट्रस्ट आणि कमलनयन जमनालाल बजाज फाऊंडेशनने यशोदा नदीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी प्रस्ताव तयार केला. यशोदा नदीच्या उपनद्या, ६ पाणलोट क्षेत्र, १९ लघु पाणलोट क्षेत्राचा विकास आणि खोऱ्यातील सर्व गावांसह सर्वसमावेशक असा हा आराखडा होता. यासाठी खोऱ्यातील गावांचे आणि शिवाराचे सर्वेक्षण करण्यात आले. १४३ गावांच्या पाणलोटाचा विकास म्हणजेच 'माथा ते पायथा' काम करण्यावर भर देण्यात आला. प्रत्येक गावात असणारे मात्र अदृश्य झालेले नैसर्गिक प्रवाह सुरू करण्यासाठी जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कामे हाती घेण्यात आली.

या कामाचा आवाका एखाद्या मोठ्या धरणासारखा आहे. कारण जिल्ह्यातील २ लाख ४ हजार ५३० एकर जमिनीला यामुळे संरक्षित सिंचनाची सोय उपलब्ध होणार आहे. थेट २९ हजार शेतकरी कुटुंबांना याचा लाभ मिळणार आहे. या कामाची सुरुवात २०१६ मध्ये वायफड या गावापासून झाली. या एकाच गावात १९ किलोमीटरचे नाला खोलीकरणाचे काम झाले आहे. ७५ ते ८० टक्के शिवार या कामात अंतर्भूत झाले आहे. गावातील पारधी समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना याचा फायदा होत आहे. हे गाव जलयुक्त होण्यासोबतच गावातील पीक पद्धत बदलण्यास सुरुवात झाली आहे.

गाळाने भरल्यामुळे नाल्यांची पाणी साठवण क्षमता संपली होती. त्यामुळे थोडाही पाऊस झाला तरी नाल्याना पूर यायचा आणि पुराचे पाणी थेट नाल्याकाठच्या शेतात शिरायचे. यामुळे नाल्याकाठच्या शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठे नुकसान होत असे. कधीकधी संपूर्ण शेत खरडून निघायचे. हा दरवर्षीचा त्रास असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांची शेती पडीत राहत होती.

यशोदा नदी खोरे पुनरुज्जीवन कामाचा फायदा म्हणजे गाळाने तुडुंब भरलेले नाले उपसले गेलेत. त्यामुळे त्याची पाणी साठवण

पुनर्जीवित झालेली यशोदा नदी.



क्षमता वाढली. पावसाच्या खंड काळात एका पावसामुळे हातातून जाणारी पिके नाल्याच्या पाण्यावर सिंचित होत आहेत. या प्रकल्पातील कामाचा परिणाम म्हणजे १ लाख ५ हजार ५३० एकर शेती, जी नाल्याचे पाणी शेतात शिरल्यामुळे पडीत राहत होती; ती पहिल्यांदाच वाहितीखाली आली. पडीत जमीन वाहितीखाली आल्यामुळे राज्याच्या उत्पादनात निश्चितच वाढ होईल. यशोदा नदी खोऱ्यातील एकूण ६३० किलोमीटर लांबीपैकी सद्यस्थितीत ३५० किलोमीटरचे नदी आणि नाल्याचे खोलीकरणाचे मोठे काम पूर्ण झाले आहे. हे काम ११९ गावांमध्ये करण्यात आले. त्यासाठी २७ कोटी रुपये खर्च झाला असून, ६० लाख ६७ हजार २३ घनमीटर गाळाचा उपसा करण्यात आला आहे. परिणामाचे स्वरूप ६ हजार ६७ टी.सी.एम. पाणीसाठा निर्माण झाला असून, या पाण्याचा २० हजार ७२१ शेतकऱ्यांना थेट लाभ मिळण्यास सुरुवात झाली आहे.

यशोदा नदी खोऱ्यातील या कामामुळे अदृश्य झालेल्या यशोदा नदीचे अस्तित्व आता पुन्हा दिसायला लागले आहे. गावेही दुष्काळाच्या छायेतून बाहेर आली आहेत. गावातील भूजल पातळीत वाढ झाली असून विहिरी, विंधन विहिरींना भरपूर पाणी आले आहे. शिवाय शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरींना आता १२ महिने पाणी असते. पाण्याच्या उपलब्धतेमुळे या भागातील पीक पद्धतीत बदलाची सुरुवात झाली आहे.

– **मनीषा सावळे,** जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा.
संपर्क: ०८७९३५०४६८७



## विहिरीला भरपूर पाणी...



**विजय पोटे, ईसापूर**

यशोदा नदी पुनर्जीवन प्रकल्पात विजय पोटे यांच्या शेताला लागून असलेल्या नाल्याचे खोलीकरण आणि सरळीकरण करण्यात आले. यावर असलेल्या ४ पैकी दोन बंधाऱ्यांची दुरुस्ती केल्यामुळे नाल्यात पाणी साठा झाला आहे. सध्या त्यांच्या शेतातील विहिरीला भरपूर पाणी आहे. सध्या हे पाणी शेतीसाठी वापरत असून, यामुळे खंडकाळात एका पाण्यामुळे हातातून जाणारे पीक टिकून आहे. याशिवाय राष्ट्रीय महामार्गासाठी दिलीप बिल्डकॉन कंपनीला पाणी देत असल्यामुळे त्यांचा दुहेरी फायदा होत आहे.

## उन्हाळ्यात मुबलक पाणी



**बालीश कुत्तरमारे, वायफड**

वायफडमध्ये यशोदा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पात नाले खोलीकरण व सरळीकरणचे काम झाले. यामुळे वायफड गावाचा पुढील काही वर्षांत कृषी क्षेत्राचा कायापालट होईल. ही बाब बालीश कुत्तरमारे या शेतकऱ्याने पीक पद्धतीत केलेल्या बदलावरून स्पष्ट होते. या शेतकऱ्याने मागील वर्षीपासून त्याच्या १५ एकर शेतीत फळ आणि भाजीपाला घेण्यास सुरुवात केली. डाळिंब, पेरू, सीताफळ, आंबा, लिंबू, या फळझाडांची लागवड केली असून, आंतरपीक म्हणून सोयाबीन, चवळी, कारले असा प्रयोग तो करत आहे. त्यांचे शेत नाल्याच्या काठावर असून, पूर्वी विहिरीला उन्हाळ्यात पाणी राहत नव्हते. पावसाळ्यात नाल्याचे पाणी शेतात शिरल्याने पीक नष्ट होत होते. पण नाल्याचे खोलीकरण केल्यामुळे त्याचा दुहेरी फायदा झाला. हे पाणी शेतात शिरण्यास अटकाव झाला. शेतातील विहिरींची पाणी पातळी वाढली. आता एकाचवेळी दोन पंप विहिरीवर चालवतो. शिवाय ठिबक सिंचनाचा उपयोग करून पाण्याची बचतही करतो.

## पडीत शेतीला फायदा



**सुरेश आगे, सोलाड**

सोलाड येथील शेतकरी सुरेश आगे यांची १६ एकर शेती नाल्याच्या काठावर आहे. येथील मोठ्या नाल्याचे पाणी पावसाळ्यात नेहमी शेतात शिरल्यामुळे शेती पडीत राहायची. या वर्षी या नाल्याचे खोलीकरण झाल्यामुळे शेतात पाणी शिरणे थांबले. पेरणीनंतर पावसाने खंड दिल्यामुळे नाल्याचे पाणी वापरून त्याने पीक वाचवले.



join us » » https://t.me/Mpscrockers88

कोल्हापूर जिल्हा

# जलयुक्त विद्यापीठ

कोल्हापूर विद्यापीठाला २०१५ मध्ये पाणी टंचाई भासू लागली. महानगरपालिकेने पाणी पुरवठ्यात कपात केली. एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू झाला. ही परिस्थिती बदलण्यासाठी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी जलयुक्त शिवार अभियानाचे काम हाती घेतले.

शारीरिक शिक्षण संचालकांची संघटना मदतीसाठी पुढे आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या साहाय्याने पहिला टप्पा म्हणून सर्व तळ्यांना पाणी आणणाऱ्या चरींचे पुनरुज्जीवन करणे, परिसरातील दोन विहिरींचा गाळ काढणे आणि त्यांचे बांधकाम करणे ही कामे हाती घ्यावयाचे निश्चित झाले. १४ एप्रिल २०१६ रोजी पहिल्या शेततळ्याच्या कामाचा शुभारंभ झाला. हे शेततळे दोन दिवसात पूर्ण झाल्याने; पुढील काम मोठ्या उत्साहाने सुरू झाले. पुढे साखळी पद्धतीने आणखी दोन शेततळी पूर्ण करण्यात आली. या तळ्यांचे वैशिष्ट्य असे की, एक भरल्यानंतर त्याचे अतिरिक्त पाणी आपोआप दुसऱ्या आणि ते भरले की तिसऱ्या तळ्यात जाणार होते.

त्याच वेळी सिंथेटिक ट्रॅक परिसरातील विहिरींचा गाळ काढण्याचे काम सुरू झाले. २५ फूट भरलेला गाळ काढल्यानंतर या विहिरीला पाणी येऊ लागले. या विहिरीचेही बांधकाम करण्यात आले. या कामात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, अभियांत्रिकीचे कर्मचारी आणि उद्यान विभाग सगळ्यांनीच लक्ष घातले.



संगीतशास्त्र विभागाशेजारील भरलेला तलाव

रस्त्यावर पडणारे पावसाचे पाणी भाषा भवनजवळच्या तळ्यात घेता येते, हे लक्षात आल्यावर अभियांत्रिकी विभागाला या कामाची पूर्तता करण्याची सूचना दिली. यामध्ये एकूण अडीच किलोमीटर अंतराच्या चरींचे काम करण्यात आले. चरींची खोली अर्ध्या फुटापासून आठ फूट होती. यामध्ये रसायनशास्त्र विभागाजवळील रोडवरील पाणी आत घेऊन भाषा भवन तलावापर्यंत नेण्यासाठी तयार करण्यात आलेली चर काढताना खूप विचारपूर्वक काम करावे लागले. काही ठिकाणी आठ फूट खोदावे लागले. रोडवर थोडा जरी पाऊस पडला तरी पाणी चरीत येणार होते. इतर चरी ५० मीटरपासून साडेपाचशे मीटरपर्यंत होत्या. पुढील काही दिवसांमध्ये पाऊस पडला आणि हा प्रकल्प यशस्वी झाला. शेततळे फुटते की काय, इतके पाणी भरून वाहू लागले.

या सर्व प्रयत्नात विद्यापीठातील भाषाभवन या इमारतीजवळील तलावामध्ये २२ कोटी १५ लाख लीटर, संगीतशास्त्र विभागाजवळील तलावामध्ये ५ कोटी २० लाख लीटर, सुतार विहीर ४ लाख लीटर, क्रीडा विभागाजवळील विहीर पाच लाख लीटर, रसायनशास्त्र विभागाजवळील विहीर ३ लाख लीटर, सिंथेटिक ट्रॅकजवळील विहीर ५ लाख लीटर, शिंदे विहीर ३ लाख लीटर आणि तीन शेततळ्यांमध्ये ४० लाख लीटर असे एकूण तीस कोटी लीटर पाणी साठवण्यात यश मिळाले. याखेरीज जमिनीखालील पाण्यामध्ये मोठी वाढ झाली. सुतार विहिरीजवळील साधारण दीडशे एकर क्षेत्रातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढली. आजही या क्षेत्रात कोठेही सात आठ फुटाचा खड्डा घेतला तर पाण्याचे झरे सुरू होतात. हे लक्षात घेऊन पुढील वर्षाचे नियोजन सुरू झाले.

विद्यापीठाने जलसंधारणाच्या कार्यात खंड पडू दिला नाही. विद्यापीठ परिसरामध्ये दोन ऐतिहासिक विहिरी आहेत. त्यांचे बांधकाम १८८३ साली केल्याचे शिलालेख या दोन्ही विहिरीवर इंग्रजी आणि मराठी भाषेत आहेत. त्यातील रसायनशास्त्र विभागाजवळील विहिरीचे पाणी वापरले जात होते. तंत्रज्ञान विभागाशेजारील विहीर मात्र दुर्लक्षित होती. २०१७ मध्ये या विहिराचा गाळ काढून दुरूस्ती करण्यात आली. तसेच सुतार विहीर परिसरातील पाणी आणखी वापरात यावे, म्हणून ६६ फूट व्यासाची आणखी एक विहीर खोदण्यात आली.

या नव्या विहिरीची साठवण क्षमता सात लाख लीटर इतकी असून विद्यापीठ परिसरातील सर्वाधिक साठवण क्षमता असलेल्या या विहिरीचे बांधकाम करण्यात आले. या विहिरीला 'शिवटाक' हे नाव कुलगुरू डॉ. शिंदे यांनी दिले. महानगरपालिकेचे दरमहा येणारे बिल सात लाख रुपये होते. या सर्व प्रयत्नांतून विद्यापीठ सर्व खर्च वजा करून वर्षाला साठ ते सत्तर लाख रुपयांची बचत करत आहे. ते पैसे अन्य विकासात्मक कामासाठी वापरण्यास उपलब्ध होत आहेत. जलसाठ्यांबरोबर विद्यापीठातील जैवविविधताही चांगली वाढत आहे. परिसरात पक्ष्यांची संख्या वाढली आहे. मोर, साप, मुंगुस, ससा, खवल्या मांजर या विविध पक्ष्यांबरोबर कोल्ह्याने दर्शन दिले.

२०१७ मध्ये पाऊस तुलनेने खूप कमी झाला तरी विद्यापीठाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नामुळे पाण्याची कोणतीही टंचाई भासली नाही. दरम्यान विद्यापीठाने प्रतिदिन एक लाख लीटर शुद्ध पाणी देण्याची क्षमता असलेला रिव्हर्स ऑस्मॉसीस तंत्रावरील जल शुद्धीकरण प्रकल्प विद्यापीठात कार्यान्वित केला आहे. या प्रकल्पाचे पाणी पिण्यासाठी सर्वांना पुरवण्यात येते. तलाव आणि अन्य विहिरींचे पाणी वापरण्यात येते. सध्या राजाराम तलाव आणि विद्यापीठाने बांधलेल्या दोन तलावासह आठ विहिरीतील पाणी विद्यापीठ वापरते.

– **प्रशांत सातपुते,** वरिष्ठ सहायक संचालक,
महाराष्ट्र परिचय केंद्र, गोवा. संपर्क: ०९४०३४६४१०१

## धानपिकाला फायदा

भंडारा जिल्हा

जलयुक्त शिवारच्या माध्यमातून झालेल्या कामामुळे पिकांना संजीवनी मिळत आहे. सोबतच पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. एका पाण्याने वाया जाणाऱ्या धानपिकाला जलयुक्त शिवार संजीवनी ठरले आहे. मागील तीन वर्षात भंडारा जिल्ह्यातील २०१ गावात जलयुक्त शिवारची कामे घेण्यात आली त्यापैकी १८७ गावे जलपरिपूर्ण झाली आहेत. मागील दोन वर्षात झालेल्या कामांमुळे ८१ हजार ५३९ टीसीएम पाणी साठा उपलब्ध झाला आहे. यामुळे ३८ हजार ३३२ हेक्टर संरक्षित सिंचन निर्माण झाले आहेत. जलयुक्त शिवार अभियानाचे हे मोठे यश म्हणावे लागेल.



२०१५-१६ मध्ये ८६ गावांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी ८६ गावे जलपरिपूर्ण झाली आहेत. यातून यावर्षी ३७ हजार ७५५ टिसीएम पाणीसाठा निर्माण झाला. या पाण्यामुळे १६ हजार ४४० हेक्टर संरक्षित सिंचन निर्माण झाले. २०१६-१७ मध्ये ५९ गावे अभियानात समाविष्ट होती. त्यापैकी ५९ गावे जलपरिपूर्ण झाली आहेत. ३१ हजार ८८७ टीसीएम पाणी साठा निर्माण झाल्यामुळे १५ हजार ९४३ हेक्टर संरक्षित सिंचन क्षेत्र तयार झाले आहे. २०१७-१८ मध्ये ५६ गावे जलयुक्त शिवार अभियानात निवडली गेली. यापैकी ४२ गावे जलपरिपूर्ण झाली आहेत. निवडल्या गेलेल्या गावात ११ हजार ८९६ टीसीएम पाणीसाठा निर्माण झाला असून ५ हजार ९४८ हेक्टर सिंचन क्षेत्र तयार झाले आहे.

पाण्याने तुडुंब भरून नाल्यावरून वाहणारे पाणी व धानाची शेती बहुधा ही स्थिती पूर्व विदर्भातील भंडारा जिल्ह्यात वेगळी नाही परंतु, पाऊस बहुतांश भागात समाधानकारक झाला असला तरी अजूनही काही भागात तो भरगच्च पडण्याची वाट शेतकरी बांधव पाहत आहे. मात्र, असे असताना शेतकऱ्यांसाठी जलयुक्त शिवार संजीवनी ठरत असून, अशाच प्रकारचे उदाहरण भंडारा जिल्ह्यातील सर्व तालुक्यात पाहावयास मिळत आहे. जिल्ह्यातील बहुतांश गावात पाहिजे त्या प्रमाणात पाऊस बरसला नसल्यामुळे खरीप हंगामातील धानाची पेरणी खोळंबली होती. मात्र शेततळी, नाला खोलीकरण, साठवण तलाव दुरुस्ती, कोल्हापुरी बंधारे दुरुस्ती, व सिमेंटनाला बांध इत्यादी कामाच्या माध्यमातून पावसाचे पाणी वाहून न जाता ते साठवणूक करण्यात यश आले. साठवणूक झालेल्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणावर जमीन सिंचनाखाली आली असून या पाण्यावर शेतकऱ्यांनी धानपिकाची लागवड केली आहे. २०१८-१९ साठी १४० गावांची निवड करण्यात आली असून सर्व गावात शिवार फेरी पूर्ण झाली आहे. गावांचे आराखडे तयार झाले आहेत. या कामामुळे १४० गावात निश्चितच सिंचन क्षेत्र वाढणार आहे.

**– रवी गिते,** जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा.

---

## अभियान नव्हे लोकचळवळ

सोलापूर जिल्हा

जलयुक्त शिवार अभियानात सोलापूर जिल्ह्याने प्रथमपासूनच ओळख निर्माण केली. २०१५-१६ यावर्षी या अभियानामध्ये २६५ गावांची निवड करण्यात आली. या गावांमध्ये जलयुक्त शिवार अभियानातील कामे प्रभावीपणे राबवल्यामुळे जिल्ह्यास 'महात्मा फुले जलमित्र पुरस्कार' मिळाला. २६५ गावांमध्ये ३१,०६७ कामे पूर्ण करण्यात आली. लोकसहभागातून ५१,३४,३४ घ. मी. इतका गाळ काढला तर २०,३५६ विहिरींचे पुनर्भरण करण्यात आले. जलयुक्तच्या झालेल्या कामांमध्ये जिल्हा टँकरमुक्त झाला. ही या अभियानाची यशस्विता आहे.

अभियानातील कामे करताना शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे हा हेतू डोळ्यासमोर ठेवून कामे करण्यास प्राधान्य देण्यात आले. जलयुक्तमधील कामे करताना क्षेत्रिय उपचार पद्धती, ओघळीवरील उपचार व शास्त्रीय पद्धतीने वापर आणि पीक पद्धतीमध्ये बदल याचा समावेश करून या त्रिसूत्रीनुसार कामास प्राधान्य देण्यात आले.

कृषी विभाग, वन विभाग, जलसंधारण, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महसूल विभाग, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमार्फत २६५ गावांमध्ये जलयुक्त शिवार अभियानातील कामे करण्यात येत आहेत. या गावांमध्ये १०११८ कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. यापैकी ७ हजार ३५५ कामे पूर्ण झाली आहेत. २ हजार ७६३ कामे प्रगतिपथावर आहेत. या कामावर ७६३० लाख इतका खर्च झाला आहे. उर्वरित कामे मुदतीत पूर्ण करण्यासाठी सर्वच यंत्रणांनी प्राधान्य दिले आहे. जिल्ह्यात २०१८-१९ मध्ये जलयुक्त शिवार अभियानामध्ये ११८ गावांमध्ये कामे होणार असून, ९१ गावांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे.

**– एकनाथ पोवार,** माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर.



join us 》》 https://t.me/Mpscrockers88



# समृद्धीचा 'रेशीम' मार्ग

**रेशीम शेती उद्योग हा कृषीवर आधारित रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला व ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी मदत करणारा उद्योग आहे. देशभरात रेशीम उद्योग आणि तुती लागवड यांची झपाट्याने वाढ होत आहे. महाराष्ट्रात विशेषत: विदर्भात रेशीम उद्योग जास्त प्रमाणात दिसून येतो. रोजगाराची प्रचंड क्षमता असणाऱ्या या उद्योगाचे ग्रामीण विकासात मोठे योगदान आहे. या उद्योगातून ग्रामीण भागातील लोकांना तुती लागवड, कीटकसंगोपन व धागानिमिर्तीमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होत आहे.**

वर्धा जिल्हा

शेतीमध्ये सिंचनाची व्यवस्था असेल आणि ५० हजार रुपये महिना कमवायचे असतील तर रेशीम शेती हा अतिशय उत्तम पर्याय ठरू शकतो. एकदा लागवड केली की, १२ वर्षे दरमहा उत्पन्न देणारे पीक म्हणून याकडे पाहिले जाते. वर्धा जिल्ह्यातील झाडगावच्या २० शेतकऱ्यांनी हा पर्याय निवडला आहे. झाडगाव आता रेशीम शेतीचे गाव म्हणून जिल्ह्यातच नव्हे; तर इतरत्रही नावारूपास आले आहे. वर्धा शहरापासून २५ किलोमीटर अंतरावर असणारे हे रेशीम गाव म्हणजे झाडगाव.

अडीच हजार लोकसंख्येचे हे गाव काही वर्षांपूर्वी इतर गावांसारखेच एक सर्वसामान्य गाव होते. येथील शेतकरी कापूस, सोयाबीन, तूर, हरभरा, हीच पारंपरिक पिके घ्यायचे. नैसर्गिक आपत्ती आली की मग नैराश्यग्रस्त होत.

या गावातीलच भोजराज भांगडे यांनी गावात पहिल्यांदा १२ वर्षांपूर्वी १ एकरमध्ये रेशीम शेतीचा प्रयोग केला. रेशीम कार्यालयातून त्यांनी याविषयी माहिती घेतली. गावातील इतर शेतकऱ्यांनी भांगडे यांना त्यावेळी वेड्यात काढले होते. पण त्यांनी लोकांच्या बोलण्याकडे लक्ष न देता आपले काम चालू ठेवले. सहा महिन्यातच त्यांना दरमहा उत्पन्नाचा कायमस्वरूपी स्रोत निर्माण झाला. एक एकरमध्ये उत्पादित केलेले कोष त्यांनी कर्नाटक, आंध्र प्रदेशमध्ये जाऊन विकले. यातून त्यांना फायदा दिसू लागल्यावर त्यांनी हळूहळू लागवड क्षेत्र वाढवले.

### एक वर्षात १४ लक्ष रुपयांचे उत्पन्न !

भांगडे यांची आता साडेचार एकरमध्ये तुतीची लागवड आहे. आज त्यांच्या साडेचार एकर शेतीतून ते आठ वेळा रेशीम कोष उत्पादन घेतात. एका वेळी ५०० अंडीपुंजापासून सरासरी ३.५० क्विंटल उत्पादन एक महिन्यात होते. एक क्विंटलला साधारणपणे ५० हजार रुपये भाव मिळतो.

म्हणजे एक महिन्यात ते सुमारे १ लक्ष ७५ हजार रुपये उत्पन्न घेतात आणि वर्षाला १४ लक्ष रुपये कमावतात.

### उन्हाळ्यात शेती

उन्हाळ्यात त्यांना पिकासाठी विहिरींचे पाणी पुरेसे नसते. त्यामुळे शेजारच्या शेतकऱ्याकडून ते १० हजार रुपयांचे पाणी विकत घेऊन रेशीम कोषाचे उत्पादन घेतात.

या मिळणाऱ्या उत्पन्नातून श्री. भांगडे यांनी घर बांधले, चारचाकी गाडी घेतली. विशेष म्हणजे त्यांची दोन्ही मुले अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहेत. हा सर्व खर्च ते रेशीम शेतीतून भागवतात.

'एखाद्या अधिकाऱ्यासारखी माझी जीवन शैली झाली आहे,' असे श्री. भांगडे अभिमानाने सांगतात. या रेशीम शेतीसाठी त्यांना रेशीम मित्र पुरस्कार मिळाला आहे.

### रेशीम शेती

श्री. भांगडे यांची दिवसेंदिवस होत असलेली प्रगती पाहून झाडगावातील इतर शेतकऱ्यांनी हळूहळू तुती लागवडीकडे आपला मोर्चा वळवला. सध्या गावातील २० शेतकरी आज रेशीम शेती करायला लागले आहेत. कर्नाटकमधील रामनगर येथे एकत्रितपणे कोष विक्रीसाठी पाठवतात. तर कधी व्यापारी गावात येऊन कोष खरेदी करतात. यामुळे गावात ७५ लक्ष ते १ कोटी रुपयांची उलाढाल होते.



**भोजराज भांगडे**

### तुती लागवड अशी ठरते फायदेशीर

तुती लागवड करण्यासाठी सिंचन व्यवस्था असणे आवश्यक आहे. एकदा तुती लागवड केली की, १२ ते १५ वर्ष यापासून उत्पन्न मिळू शकते. पुन्हा लागवड करण्याची गरज नाही. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून यासाठी अनुदानसुद्धा मिळते. तीन वर्षात २ लाख ९० हजार रुपये प्रति एकर अनुदान दिले जाते. यामध्ये शेड बांधकाम व इतर साहित्य खरेदी आणि तुतीची बियाणे दिली जातात. याशिवाय प्रत्येक पिकासाठी लागणारे अंडीपूंज खरेदी करण्यासाठी रेशीम विकास अधिकारी कार्यालयामार्फत १७५ रुपये १०० अंडीपूंजाप्रमाणे अनुदान दिले जाते.

तुतीच्या वाढीसाठी सेंद्रिय खताशिवाय कोणतेही रासायनिक खत, फवारे देण्याची गरज नाही. लागवड खर्च, खते, फवारणी या खर्चातून सुटका. मजुरांचा खर्च एकदम कमी. महिन्यातून आठ दिवस एक मजूर पुरेसा आहे. कोष उत्पादन शेडमध्येच होत असल्यामुळे घरातील स्त्रिया सुद्धा हे काम करू शकतात. तुतीला कोणतेही जनावर खात नाही. विदर्भात उन्हाळ्यात तापमान जास्त असल्यामुळे एप्रिल, मे महिन्यात कोष उत्पादन करणे शक्य नाही. पण उर्वरित १० महिने हे पीक चालू राहते. अळ्यांची विष्ठा खत म्हणून शेतात वापरता येते. शिवाय तुतीच्या काड्या जनावरे खातात. त्यामुळे दूध उत्पादनात सुद्धा वाढ होते. या काड्यांचा कंपोस्ट खतासाठी चांगला उपयोग होतो.

**जिल्हा माहिती कार्यालय, वर्धा.**

---

**वाशिम जिल्हा**

वाशिमपासून १८ कि.मी. अंतरावर असलेले 'टो' नावाचे गाव. १८०० लोकसंख्या असलेल्या या गावात बहुतांश शेतकरी. गावातील बहुतेक शेतकरी हे कोरडवाहू शेती करतात. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून (मग्रारोहयो) गावात रेशीम विकास प्रकल्पाची सुरुवात झाली ती २०१६-१७ या वर्षात. तत्पूर्वी देखील गावातील तीन शेतकऱ्यांनी रेशीम शेतीला सुरुवात केली ती रेशीम विकास विभागाच्या मार्गदर्शनातून. मग्रारोहयोतून २०१६-१७ या वर्षात रेशीम विकास प्रकल्पातून टो गावातील १० शेतकऱ्यांनी तुती लागवड करून रेशीम शेतीला सुरुवात केली. यामधून त्यांना १२ लाख ५० हजार रुपये नफा मिळाला. आता गावातील ३१ शेतकरी हे रेशीम शेती करतात. वर्षातून सरासरी चारवेळा रेशीम कोषाचे उत्पादन हे शेतकरी घेत आहेत. ज्या शेतकऱ्यांकडे रेशीम शेती आहे, त्यांच्या कुटुंबातील सदस्य तर या शेतीत मदत करतात.

२०१७-१८ या वर्षात टो गावातील शिवाजी बोरकर, विश्वनाथ काकडे, लक्ष्मण काकडे, हरिभाऊ काकडे, धोंडू इंगळे, केशव काकडे, भागवत काकडे या शेतकऱ्यांनी रेशीम विकास विभागाकडून प्राप्त १४५० अंडीपुंजातून ११२० किलो रेशीम कोषाचे पहिल्या पिकातून उत्पन्न घेतले. या उत्पादनातून शेतकऱ्यांना ३ लाख ३६ हजार रुपये नफा मिळाला. उत्पादित कोषाला प्रती किलो ३५० रुपये ते ४५० रुपये दर देखील मिळाला. हे कोष शेतकरी विक्रीसाठी थेट बेंगळुरुला घेऊन जातात.



**शिवाजी बोरकर**



join us » » https://t.me/Mpscrockers88

## समृद्धीचा मार्ग

या गावातील शिवाजी बोरकर... शिक्षण जेमतेम ५ वी पर्यंत झालेले. परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडून शेतीत रमला. आईवडील, दोन भाऊ आणि दोन बहिणी असे त्याचे कुटुंब. घरी वडिलोपार्जित पाच एकर शेती. या शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. शिवाजीची पाच एकर शेती पूर्वी कोरडवाहू होती. पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहून शेतीतून सोयाबीन, उडीद, मूग, हरभरा पिके घ्यायचा. कुटुंबातील सर्व सदस्यांचा विचार करता कोरडवाहू शेतीतून उपजीविका करणे कठीण जात होते. एकदा शिवाजीच्या मनात विचार आला की, आपण आता शेतात विहीर खोदून कोरडवाहू शेती बागायतीखाली आणली पाहिजे. म्हणून काही वर्षांपूर्वी स्वतःच्या खर्चातून शेतीत विहीर तयार केली. विहिरीमुळे शेती सिंचनाखाली आली. पाच एकर शेतीपैकी एक एकर शेतीत मिरची, दोन एकर गहू व उर्वरित शेतीत भाजीपाला व अन्य पिके घेण्यास सुरुवात केली. शेतीतील उत्पादित भाजीपाल्याची विक्री शिवाजी सायकलने आजूबाजूच्या गावाला करू लागला.

एकदा घरी सायंकाळी दूरदर्शनच्या 'आमची माती, आमची माणसं' या कार्यक्रमात रेशीम शेतीची यशोगाथा बघितली आणि येथून ही शेती करण्याची प्रेरणा मिळाली. ही यशोगाथा बघितल्यानंतर दुसऱ्याच दिवशी वाशिम येथील रेशीम विकास कार्यालय गाठले. अधिकाऱ्यांनी त्याला मार्गदर्शन केले. २०११-१२ या वर्षात रेशीम विकास अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनातून तुतीच्या झाडांची एक एकरात लागवड केली. रेशीम कीटक संगोपनासाठी २० बाय ५० मीटर आकाराचे टीनचे शेड रेशीम विकास विभागाने बांधून दिले. अंडीपुंज, रॅक, कीटकनाशकांना कोष तयार करण्यासाठी उपयोगात येणाऱ्या चंद्रिकांचा पुरवठा तसेच शेडच्या निर्जंतुकीकरणासाठी पावडर असे एकूण २३,६०० रुपयांचे साहित्य रेशीम विभागाने दिले आहे.

शिवाजीने रेशीम कोषाचे पहिले उत्पादन घेतले ते ऑगस्ट २०१२ मध्ये. पहिल्याच १५० अंडीपुंजातून १२० किलो कोषाचे उत्पादन झाले. रेशीम विभागाच्या मार्गदर्शनातून बेंगळुरु येथे कोषाची विक्री केली. तेव्हा १६० रुपये प्रतिकिलो दर कोषाला मिळाला. आतापर्यंत शिवाजीने एकूण २४ वेळा रेशीम कोषाचे उत्पादन घेतले आहे. आज बेंगळुरुच्या बाजारपेठेत रेशीम कोषाला प्रतिकिलो ३२० ते ४५० रुपये दर मिळत आहे.

शिवाजी दर तीन महिन्याला एक पीक असे वर्षातून चार वेळा रेशीम कोषाचे उत्पादन घेत आहे. रेशीम कीटकांना तुतीच्या झाडांची पाने खाऊ घालण्यापासून ते चंद्रिकेमधून तयार झालेले रेशीम कोष काढण्याची कामे कुटुंबातील सदस्य तर करतातच तसेच गावातील ५ ते ६ मजुरांना देखील या कामातून रोजगार उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रत्येक मजुराला २०३ रुपये एका दिवसाची मजुरी रोहयोतून देण्यात येते. तीन महिन्यात एका पिकातून ४०० अंडीपुंजापासून ३०० किलो अर्थात तीन क्विंटल रेशीम कोषाचे उत्पन्न मिळत आहे. यामधून एका तिमाही पिकातून १ लाख रुपये नफा मिळत असल्याचे श्री. बोरकर यांनी सांगितले. आता शेतकऱ्यांनी कोरडवाहू पिकांसोबत हमखास नफा देणारी रेशीम शेती केली पाहिजे. यासाठी शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. रेशीम शेती हाच शेतकऱ्यांच्या समृद्धीचा मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले.

**– विवेक खडसे,** जिल्हा माहिती अधिकारी, वाशिम. संपर्क: ०९४२३४३४३०८

**नागपूर जिल्हा**

नागपूर जिल्ह्यातील कारगाव (ता. भिवापूर) येथील तुलाराम कचरू गजभिये हे यापूर्वी पारंपरिक पिकांमध्ये संत्री, भातशेती, कापूस, मिर्ची यासारखी पिके घेत. परंतु निसर्गाच्या लहरीपणामुळे समाधानकारक पिके निघत नव्हती. रेशीम उद्योगाची किमया वाचून त्यांनी तुतीच्या लागवडीसाठी रेशीम कार्यालयात नोंदणी केली. याद्वारे व्ही-१ या जातीच्या तुतीची लागवड केली. २०१६ ते मार्च २०१८ अखेरपर्यंत १३५० अंडीपुंजाचे संगोपन करून ४१९ किलोग्रॅम कोषाची निर्मिती केली. यातून त्यांनी १ लाख २५ हजार २२५ रुपयांचे कोष विकले. तसेच २०१७-१८ या वर्षात तुती बियाणे



तुलाराम कचरू गजभिये



किशोर देवराव वाघमारे

एकरीपासून त्यांना ७,८०० रुपये प्राप्त झाले.

२०१६-१७ या वर्षात रेशीम उद्योगापासून १ लाख २५ हजार २२५ रुपयांचे उत्पादन झाले. त्याचप्रमाणे राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत तुती संगोपनासाठी ८७ हजार ५०० रुपयांचे सानुग्रह अनुदान प्राप्त झाले. मार्च २०१८ अखेर ४०० अंडीपुंजाचे संगोपन करून ३६६ किलोग्रॅम कोषाची निर्मिती केली. त्यापासून त्यांना १ लाख २ हजार ४८० रुपयांचे उत्पादन घेता आले. तुतीपाला उपलब्धतेनुसार अंडीपुंजी घेऊन ते संगोपनाचे काम करून पिके घेतात. त्यांनी कारगावमध्ये १५ शेतकऱ्यांना प्रोत्साहित करून त्यांच्यामार्फत तुती लागवड करून कोषाचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली आहे.

सुरेंद्र विनायक धुंडे, मुक्काम करंभाड, (ता. पारशिवनी, जि. नागपूर) यांना देखील तुतीच्या लागवडीमुळे आर्थिक स्थिती उंचावण्यास मदत झाली. २०१६-१७ या वर्षात एक एकर तुतीची लागवड करून रेशीम उद्योगाला त्यांनी सुरुवात केली. आज त्यांच्या एक एकरात व्ही-१ जातीच्या तुतीची झाडे आहेत. ते दरवर्षी २०० ते ६५० अंडीपुंजाचे संगोपन करतात. २०१६-१७ या वर्षात २०० अंडीपुंजाचे संगोपन करून १४६ किलोग्रॅम कोषनिर्मिती केली. यापासून त्यांना ३६ हजार ५०० रुपयांचा नफा झाला. २०१७-१८ या वर्षात तुती कलमांपासून १५०० रुपयांची आर्थिक मदत मिळाली. मार्च २०१८ पर्यंत ३०० अंडीपुंजाचे संगोपन करून २१४ किलोग्रॅम कोषांची विक्री करून ५७ हजार १५० रुपयांचा नफा मिळाला.

२०१६-१७ आणि २०१७-१८ या दोन वर्षापासून रेशीम उद्योगाचा मनरेगा या योजनेंतर्गत समावेश केला असल्याने मजुरीपोटी १ लाख १८ हजार रुपयांचा निधी त्यांच्या खात्यात वळता करण्यात आला. रेशीम कार्यालयाकडून ७२ हजार रुपयांचे साहित्य प्राप्त झाले आहे. रेशीम उद्योग सुरू केल्यापासून त्यांची आर्थिक स्थिती बळकट झाली.



सुरेंद्र विनायक धुंडे

## नवी वाट

वर्धा जिल्ह्यातील सेलू (काटे) येथील किशोर देवराव वाघमारे यांच्या रेशीम शेतीच्या जोड व्यवसायामुळे उत्पन्नात भर पडली असून, आज अनेकजण त्यांची शेती बघण्यासाठी क्षेत्रभेटी देतात. श्री. वाघमारे यांची पारंपरिक शेती व्यवसायातून रेशीम शेतीकडे वाटचाल इतर नव उद्योजकांना मार्गदर्शक ठरत आहे. श्री. वाघमारे यांनी २०१६-१७ मध्ये मनरेगा अंतर्गत शेतात तुतीच्या नर्सरीची लागवड केली. जुलैमध्ये ही रोपे शेतात लावली. त्यासाठी ६० बाय २२ आकाराचे पक्के शेड बांधले. त्यांना मनरेगांतर्गत तुती लागवडीकरिता ५० हजार रुपये, कीटकसंगोपन साहित्यासाठी २३ हजार रुपये तसेच शेड बांधण्याकरिता ९१ हजार ८६३ रुपये मिळाले. त्यामुळे शेड बांधकामामध्ये अडचण निर्माण झाली नाही. सोबतच १२ बाय १२ चे बालकीटक संगोपनगृहाचे बांधकाम करून जानेवारी २०१८ मध्ये कीटकांचा पहिला टप्पा टाकला. १५० अंड्यांपासून १०४ किलोग्रॅम ए - ग्रेडचा कोष काढला. त्यांच्या शेतातून व्यापाऱ्यांनी ४६ हजार ८०० रुपयांना कोष विकत घेतला. दुसऱ्या टप्प्यात मार्च २०१८ ला १०० अंड्यांपासून नवीन टप्पा सुरू केला. त्यामध्ये त्यांना ८० किलोग्रॅम कोष प्राप्त होऊन ते त्यांनी ३२ हजार रुपयांना व्यापाऱ्यांना विकला. विशेषत: खतांसाठी जीवामृत, कंम्पोस्ट खत, विघटन केलेला काडी कचरा यांचा वापर करतात. यामुळे खतांसाठी खर्च करावा लागत नाही.

वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील गिरोली येथील रामभाऊ बकाराम दुधबडे यांनीदेखील आपल्या तीन एकराच्या शेतीमध्ये कपाशीऐवजी व्ही-१ जातीच्या तुतीची लागवड केली. याद्वारे २०१५-१६ मध्ये ३ एकर शेतीमधून १ लाख ९० हजार रुपयांचा नफा झाला. याच जमिनीतून २०१६-१७ मध्ये ३ लाख ९६ हजार ८०० रुपयांचा नफा झाला. तर यंदा २०१७-१८ मध्ये ५ लाख ५० हजार रुपयांचा नफा झाला. यामुळे त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले.

**- अपर्णा यावलकर-डांगोरे,**
माहिती सहायक, नागपूर.



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88


जालना जिल्ह्यात 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत ६,८५८ शेततळे पूर्ण करण्यात आले.

**राज्यात गेल्या काही वर्षात पावसाचे प्रमाण कमी तसेच अनिश्चित झाले आहे. कोरडवाहू क्षेत्रातील पूर्णतः पावसावर अवलंबून असलेल्या पिकांवर तसेच त्याच्या उत्पादनावर विपरित परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर पावसात पडलेला खंड, पाण्याची टंचाई व पिकांचे नुकसान होऊ नये, यासाठी राज्य शासनाने मागेल त्याला शेततळे ही योजना सुरू केली. शेती उत्पादनामध्ये शाश्वतता आणण्यासाठी तसेच, दुष्काळावर मात करण्यासाठी शेततळे उपयुक्त ठरत आहे. यामुळे पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून जलसिंचनाची उपलब्धता वाढवता येणे शक्य होईल. या माध्यमातून संरक्षित व शाश्वत सिंचनाची सुविधा मिळेल.**

# शेततळ्यांनी आणली समृद्धी

**अहमदनगर जिल्हा**

अहमदनगर जिल्ह्यात राहाता तालुक्यातील राजुरी येथील गणपत नारायण भोसले यांनी आपल्या शेतात 'मागेल त्याला शेततळे' या योजनेमधून शेततळे बांधले आहे. शेततळ्यात उपलब्ध पाण्यामुळे खरिपासोबतच उन्हाळी हंगाम घेणे शक्य झाले आहे. शेवगा, कांदा आणि फळशेतीला सूक्ष्म सिंचनाच्या मदतीने पाण्याचे व्यवस्थापन केल्याने उत्पादनात वाढ झाली आहे. खरिपासोबतच उन्हाळी हंगामातील भाजीपाला शेतीने श्री. भोसले यांच्या उत्पन्नातही भर पडली आहे.

राहाता तालुका मुख्यालयापासून १५ किमी अंतरावर बाभळेश्वरनजीक असलेल्या राजुरी शिवारात श्री. भोसले यांच्याकडे नऊ एकर शेती आहे. विहिरीच्या उपलब्ध पाण्यावर खरिपातील पिके घेत असल्याने उत्पादन मर्यादित होते. मात्र गतवर्षी शेततळ्यामुळे सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्यावर शेती फायदेशीर झाल्याचे श्री. भोसले सांगतात.

श्री. भोसले यांनी आपल्या शेतात ३० मीटर बाय ३० मीटर आकाराचे शेततळे बांधले आहे. त्यासाठी त्यांना कृषी विभागाकडून ५० हजार रुपये अनुदान मिळाले. या शेततळ्याची क्षमता एकूण ३६ लाख लिटर एवढी आहे.

### टंचाईस्थितीत शेततळ्याचा आधार

प्रत्येकी एक एकर क्षेत्रात शेवगा, मका व चारा पिके दोन एकर, डाळींब सव्वा एकर व ऊसासह इतर पिके आहेत. नोव्हेंबरमध्ये दोन एकर क्षेत्रात उन्हाळी कांदा लागवड करतात. हंगामाप्रमाणे नेटके नियोजन केल्याने भोसले यांना बाजारातील मागणीप्रमाणे व दराचा अंदाज घेत बाजारपेठेत आपला शेतीमाल पाठवणे शक्य होते.

भाजीपाला शेती करताना फेब्रुवारी ते मे या टंचाईच्या काळात श्री. भोसले यांना पाण्याची अडचण येत असे. शेतळ्यामुळे या कालावधीत शेतीला पाणी उपलब्ध झाल्याने शेती फायद्याची ठरली आहे.

## संसाराचा आधार

गणपतराव भोसले यांनी शेवगा व कांदा या भाजीपाला पिकांसह डाळिंब व मका ही पिके घेतली आहेत. गतवर्षी टंचाईस्थितीत घेतलेल्या शेवगा शेतीतून भोसले यांना तीन ते साडेतीन लाख रूपयाचे उत्पन्न मिळाले. डाळिंब, कांदा, ऊस व मका या पिकातूनही चांगले उत्पन्न मिळाले आहे. यंदा नोव्हेंबरपासून शेवग्याचे उत्पादन सुरू होईल. गतवर्षीपेक्षा यंदा अधिक उत्पन्न मिळेल, असा विश्वास भोसले यांनी व्यक्त केला.

## खर्चात बचत

शेतीत सुपीकता आणण्यासोबतच रासायनिक खतावरील खर्च वाचवण्यासाठी शेणखताचा वापर वाढवण्यावर भर दिला. शेणखतामुळे भाजीपाला पिकाची गुणवत्ता सुधारल्याचा अनुभव भोसले यांनी व्यक्त केला. घरी ८ गाई, इतर वासरे आहेत. त्यामुळे वर्षाकाठी १८ ते २० ट्रॅक्टर शेणखत मिळते.

## ठिबकचा वापर

शेतीसाठी ठिबकने पाणी देतात. त्यामुळे गरजेनुसारच पिकाला पाणी मिळते. यामुळे पाण्याची बचत तर होतेच शिवाय पिकाची वाढही चांगली होते. काही क्षेत्रासाठी स्प्रिंकलरचा वापर करतात. श्री.भोसले यांच्या पत्नी कल्पनाबाई घरची जबाबदारी सांभाळून शेतीच्या कामाचे चोख व्यवस्थापन करतात.



गणपत नारायण भोसले यांची डाळिंब शेती.

## फायद्याचा दुग्धव्यवसाय

शेतीसोबतच शेतीपूरक व्यवसाय म्हणून श्री.भोसले यांनी दुग्धव्यवसायाला पसंती दिली आहे. शेतीत त्यांनी मका लागवड केली आहे. एप्रिल व मे या टंचाईस्थितीत त्यांना हा हिरवा चारा फायद्याचा ठरतो. ते ८ गायींचे संगोपन करतात. त्यापासून ७० ते ८० लीटरपर्यंत दुधाचे उत्पादन मिळते, हिरवाईच्या चाऱ्यामुळे दुग्धोत्पादनात वाढ होते. शेततळ्यामुळे उन्हाळ्यातही हिरवा चारा उपलब्ध होतो.

## वार्षिक उत्पन्न १० लाख

'मागेल त्याला शेततळे' योजनेतून शेततळे बांधले आणि शेतीतील उत्पादनात दुपटीने वाढ झाली. या सर्वाचा एकत्रित परिणाम म्हणून भोसले कुटुंबीयांचे वार्षिक उत्पन्न १० लाखापर्यंत पोहोचले आहे. त्यांचा शेवगा श्रीरामपूरच्या बाजारपेठेत तर डाळिंब स्थानिक बाजारपेठेत पाठवली जातात. सिंचन सुविधेमुळे ही पिके घेणे शक्य झाल्याचे संतोष भोसले सांगतात. या वर्षी उन्हाळी कांद्यातून मोठा फायदा होईल, असा त्यांना विश्वास आहे.

अहमदनगर जिल्ह्यात शेतीसिंचनासाठी लागणारी पाण्याची बँक अधिक प्रबळ होत आहे. 'मागेल त्याला शेततळे' योजनेतून जिल्ह्यात ९ हजार ५११ शेततळी पूर्ण झाली. त्या माध्यमातून १७ हजार ९७६ टीसीएम पाणी साठवण क्षमता निर्माण झाली आहे. या पाणीसाठ्यातून ३५ हजार ९५२ हेक्टर क्षेत्राला संरक्षित सिंचन करण्याची सोय झाली आहे.

**– गणेश फुंदे,**
माहिती सहायक, उप माहिती कार्यालय, शिर्डी जि. अहमदनगर.

**कोल्हापूर जिल्हा**

तमदलगे येथील शेतकरी श्रीकांत पाटील यांनी जलयुक्त शिवार अभियान आणि कोरडवाहू शेती अभियानातून शेततळे आणि ठिबक सिंचन योजनेद्वारे फोंड्या माळरानावर हिरवीगार पिके घेऊन इतरांपुढे आदर्श निर्माण केला आहे.

तमदलगेमध्ये त्यांची वडिलोपार्जित तीन एकर शेती होती. पण संपूर्ण कोरडवाहू क्षेत्र असल्याने त्यामध्ये कुसळाशिवाय काहीच उगवत नव्हते. पावसाळ्यात काही प्रमाणात खरीप ज्वारी घेतली जायची; पण अपुऱ्या आणि अनियमित पावसामुळे हातचे पीकही डोळ्यासमोर होरपळून जायचे. ही अवस्था पिढ्यान्पिढ्या चालत आल्याने रोजीरोटीसाठी रोजगाराशिवाय अन्य पर्याय नव्हता.

मात्र शासनाच्या कोरडवाहू शेती अभियानातून अनेक शेततळी आणि शेतीपूरक औजारे घेऊन फोंड्या माळरानातही उन्हाळी, पावसाळी आणि रब्बी हंगामात पिके घेण्यास सुरुवात केली. श्रीकांत रामगोंडा पाटील यांनी आपल्या तीन एकर शेतात १५ x १५ x ३ मीटर आकाराचे शेततळे, कोरडवाहू शेती अभियानातून २०१५ मध्ये घेतले. यासाठी एक लाख रुपये खर्च आला. पण शासनाच्या अनुदान योजनेमुळे ४५ हजार रुपयाचे अनुदान त्यांना मिळाले. या शेततळ्यात वडिलोपार्जित विहिरीतील पाण्याची साठवणूक करून ते ठिबक



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88



**एक डोळा पद्धतीचे ऊस बियाणे तयार करण्याचा श्रीकांत पाटील यांचा नवा शेतीउद्योग.**

सिंचनाद्वारे पिकास देण्याची योजना प्रत्यक्षपणे राबवली. त्यामुळे ओसाड माळरानातही हिरवीगार पिके डोलू लागली.

कोरडवाहू शेती अभियानातून श्री. पाटील यांनी घेतलेल्या शेततळ्यामध्ये साडेचार लाख लीटर पाणी साठविले जात असून, पिकांच्या आवश्यकतेनुसार ठिबक सिंचनाद्वारे पिकास पाणी दिले जाते. वडिलोपार्जित विहीर होती, पण आजूबाजूला पाणी नसल्यामुळे विहिरीमधून पाण्याच्या पाझरामुळे पाणीसाठा होत नव्हता. केवळ १० ते २० गुंठे क्षेत्र भिजत होते. मात्र हेच पाणी वेळोवेळी शेततळ्यामध्ये साठवल्याने तीन एकर क्षेत्र ओलिताखाली आणने श्री. पाटील यांना शक्य झाले. आज या पाण्यावर ऊस, सोयाबीन, झेंडू तसेच भाजीपाल्याची पिके घेतली जात आहेत. शेततळ्यामुळे ओसाड माळरानावरही बागायती पिके डोलू लागली आहेत. सभोवतालचा परिसर ओसाड माळरान आणि रखरखीत दिसत असतानाही श्रीकांत पाटील यांच्या तीन एकर क्षेत्रावर शासन योजनांमुळे हिरवाई बहरली.

पाण्याचा शाश्वत पुरवठा होऊ लागल्याने श्रीकांत पाटील यांनी आपल्या शेतामध्ये आधुनिक कृषितंत्राचा अवलंब करून एक डोळा पद्धतीचे ऊस बेणे तयार करण्याचा नवा शेतीउद्योग सुरू केला. पत्नी माणिकबाई, मुलगा भरत आणि सागर यांच्या मदतीने त्यांनी ट्रे मधील ऊसाची रोपे तयार करण्यास सुरुवात केली. परिसरातील शेतकऱ्यांकडून त्यांच्या ऊसरोपांना मागणी वाढली. सध्या श्री. पाटील दरमहा सुमारे ४० हजाराहून अधिक ऊस रोपे तयार करतात. एक रोप दोन रुपयाला विक्री करतात. यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळू लागले आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर.**

## नंदुरबार जिल्हा

नंदुरबार जिल्ह्यातील होळ गावातील देवाजी पाटील हे कोरडवाहू शेती करणारे शेतकरी आहेत. बागायतीसाठी सिंचन सुविधेची गरज होती. कृषी विभागाने तत्काळ देवाजी पाटील यांना 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत शेततळ्याच्या अस्तरीकरणासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत लाभ मिळवून दिला. १५ x १५ x ३ व २० x १५ x ३ मीटर आकाराच्या शेततळ्याच्या खोदकामासाठी २३ हजार व कागदासाठी २४ असे ४७ हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले. देवाजी पाटील यांनी वैयक्तिक २८ हजार रुपये खर्च केला. आजच्या परिस्थितीत देवाजी पाटील व त्यांचा मुलगा ट्रॅक्टरच्या साहाय्याने आधुनिक सिंचन शेती करत आहेत.

होळ गाव १३७८ लोकवस्तीचे गाव असून, गावात ४०० ते ४५० घरे आहेत. या प्रत्येक घरातील वाया जाणारे पाणी एकत्र करून त्याचा उपयोग करण्यासाठी देवाजींनी गावाजवळ असलेल्या स्वत:च्या विहिरीजवळ १० x १५ फूट आकाराचा शोषखड्डा खोदला. गावातील नाल्यातून वाहणारे सांडपाणी या शोषखड्ड्यात टाकले. शोष खड्ड्यातून तीन इंच पाइप विहिरीत टाकून विहिरीचे पुनर्भरण केले.

हे पाणी एक किलोमीटर अंतरावरील स्वत:च्या शेतातील शेततळ्यात जलवाहिनीद्वारे सोडले. दररोज तीन तास पाणी या विहिरीमधून शेततळ्यात टाकले जाते. शेततळे उंचावर असल्यामुळे शेततळ्यातून पाणी थेट विहिरीत वीज पंपाचा वापर न करता टाकले जाते. त्यामुळे वीजेचीही बचत होते.

विहिरीतून वीज पंपाच्या साहाय्याने ठिबक सिंचनची व्यवस्थादेखील करण्यात आली आहे. ठिबक सिंचनाद्वारे पपई, कांदे, गवार व कपाशीची लागवड करण्यात आली आहे. या वर्षी पीक बहारदार असल्याचे देवाजी पाटील यांनी सांगितले. या वर्षी खर्च वजा जाता किमान ६ ते ७ लाखांचे उत्पन्न अपेक्षित असल्याचे ते सांगतात.



**देवाजी पाटील आपल्या पपई शेतीसोबत.**

देवाजी पाटील यांचा २०१३ मध्ये पक्षघाताने एक पाय अधू झाला असूनही त्यांनी बागाईत शेती करण्यासाठी कुटुंबाला प्रोत्साहन दिले आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार.**



'उन्नत शेती समृद्ध शेतकरी' अभियानामध्ये संगीता सांगळे यांना मिळालेल्या ट्रॅक्टरचे प्रशिक्षण घेऊन त्या त्याचा शेतीच्या कामासाठी वापर करतात.

# उन्नत शेती, तंत्रकुशल शेतकरी

**कृषी विभागामार्फत उन्नत शेती-समृद्ध शेतकरी अभियान राबवण्यात येत आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर घटत असलेली जमीन धारणा, बैलांची कमी झालेली संख्या, शेती कामासाठी मजुरांची घटलेली संख्या व मजुरीचे वाढते दर, पेरणीसाठी मिळणारा कमी कालावधी, पिके आणि फळबागांमध्ये असलेली विविधता यामुळे कृषी यांत्रिकीकरणास मोठ्या प्रमाणात चालना देण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत प्रमुख पिकांची प्रत्यक्षात प्राप्त होणारी उत्पादकता व या पिकांच्या आनुवंशिक उत्पादन क्षमतेतील तफावत कमी केली जाते. शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाच्या रकमेपेक्षा अधिक आर्थिक उत्पन्न प्राप्त करून दिले जाते. पीक विमा योजनेत अधिकाधिक शेतकऱ्यांना सहभागी करून घेत नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांच्या होणाऱ्या नुकसानीपासून संरक्षित केले जाते.**

नाशिक जिल्हा

शेतीसाठी सिंचनाची सुविधा झाली की, शेती चांगली फुलवता येते हे जरी खरे असले तरी त्यासोबत नवे तंत्रज्ञान आत्मसात केल्यास शेतीतून समृद्धी साधता येते हे सत्यगावच्या संगीता सांगळे यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

संगीताताईंचे शिक्षण बारावीपर्यंतचे, मात्र कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन संगिताताईंनी त्यांचे पती वाल्मिक सांगळे यांच्या सहकार्याने पीकपद्धतीत बदल घडवून आणला. त्याच्याकडे ५ एकर शेती आहे. इतर ७ एकर कुटुंबातील अन्य सदस्यांच्या नावावर आहे. मात्र सर्व शेतीकामाचे नियोजन त्या स्वत: करतात.

शेताच्या बाजूने गोदावरी डावा कालवा जात असल्याने गावात पाण्याची उपलब्धता चांगली आहे. मात्र दोन वर्षापूर्वीपर्यंत शेतात मका, सोयाबीन अशी पारंपरिक पिके घेतली जात होती. कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली एकात्मिक फलोत्पादन कार्यक्रमांतर्गत प्रथमच पेरू आणि डाळिंबाची लागवड करण्यात आली. आंतरपीक म्हणून शेवगा आणि लाल भोपळादेखील लावण्यात आला. वाल्मिक सांगळे यांनी याच कार्यक्रमांतर्गत पॉली हाऊस उभारले. त्यात काकडी आणि सिमला मिरचीचे पीक घेतले.

शेती विस्तारत असताना संगीताताईंनी नवे तंत्रज्ञान समजावून घेतले. शेतात सूक्ष्म सिंचन योजनेंतर्गत ठिबक सिंचनाची सुविधा करून घेतली. त्यासाठी त्यांना ८० हजाराचे अनुदान मिळाले. कुटुंबाच्या इतर शेतीसाठीदेखील एक लाख ६६ हजाराचे अनुदान कृषी विभागामार्फत मिळाले. बागायती शेती फुलत असताना मजूर मिळवणे



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88

आणि त्यांच्याकडून एवढ्या मोठ्या क्षेत्रात काम करून घेणे कठीण होते.

'उन्नत शेती समृद्ध शेतकरी' अभियानामध्ये संगीताताईंनी १ हॉर्सपॉवरचे ट्रॅक्टर खरेदी केले. त्यासाठी त्यांना एक लाख रुपयांचे अनुदान मिळाले. त्यांनी ट्रॅक्टर चालवणे शिकून घेतले. ट्रॅक्टरद्वारे विविध प्रकारची फवारणी, मशागत आदी कामेही त्या स्वत: करू लागल्या. त्यामुळे मजुरीचा खर्च वाचण्याबरोबर शेताची कामे वेगाने होऊ लागली आणि उत्पादनातही वाढ झाली.

सध्या त्यांच्या शेतात ऊस, पेरू, डाळिंब, शेवगा, लाल भोपळा, द्राक्षे आदी पिके घेतली जातात. पतीच्या खांद्याला खांदा लावून काम करताना त्यांनी शेतीचे प्रत्येक काम आत्मसात केले आहे.

संगीता सांगळे सकाळी नऊ वाजेपर्यंत घरची कामे आवरून शेतात कामाला उभ्या राहतात. मुले शाळेत गेल्यावर त्यांचा वावर शेतात दिसतो. सायंकाळपर्यंत कामे आटोपल्यावर परत घरची कामे करण्यासाठी त्या तयार असतात. आवड निर्माण झाल्याने थकवा वाटत नाही, असे त्या आवर्जून सांगतात. 'आत्मा' योजनेंतर्गत चार गायी त्यांच्याकडे असून मजूर न आल्यास दूध काढणे, पिकांची लागवड, मशागत, विक्री, हिशेब लिहिणे आदी कामे त्या खुबीने करतात.

निफाड तालुक्यात डोंगरगाच्या बजरंग पातळे यांनी कला शाखेचा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. मात्र शेतीची आवड असल्याने वडिलोपार्जित जमिनीवर त्यांनी शेती करण्यास सुरुवात केली. कांदे, सोयाबीन अशी पारंपरिक पिके ते घेतात. वाढलेले मजुरीचे दर आणि मजुरांची उपलब्धता कमी असल्याने शेती करताना अनेक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागे. त्यामुळे 'उन्नत शेती समृद्ध शेतकरी' अभियानाची माहिती मिळताच त्यांनी ट्रॅक्टर खरेदीसाठी अर्ज केला.


बजरंग पातळे

कृषी विभागाच्या ड्रॉमध्ये त्यांचा क्रमांक आल्याने त्यांना एक लाखाचे अनुदान मंजूर झाले. त्यांनी स्टेट बँकेकडून कर्ज काढत ४ लाख २४ हजाराचे २५ एचपी क्षमतेचे ट्रॅक्टर घेतले. ट्रॅक्टर आल्याने शेतीच्या कामांची गती वाढली. पूर्वी मजुरीवर एका हंगामात २० हजार याप्रमाणे तीन हंगामासाठी ६० हजार खर्च होत असे. शिवाय मजूर खोल मशागत करीत नसल्याने प्रत्येक बाबींवर लक्ष द्यावे लागे. ट्रॅक्टरमुळे ती अडचण दूर होऊन खर्चदेखील वाचला आहे. जमिनीची चांगली मशागत होत असल्याने उत्पादनात फरक दिसून आला आहे.

श्री. पातळे इतरांनादेखील भाड्याने ट्रॅक्टर देतात. डिझेलचा खर्च निघून त्यातून अधिकचे उत्पन्नही मिळते. ट्रॅक्टरमुळे शेतीकामाची गती वाढली आहे. शेतमालाला भाव असताना बाजरात तातडीने माल पोहोचविणे शक्य होत आहे. इतरांवर अवलंबून रहाणे कमी झाल्याने शेतीचे नियोजनही सोपे झाले आहे.

कृषी विभागाने त्यांना सोयाबीनचे बियाणे कृषी योजनेतून उपलब्ध करून दिले आहे. ट्रॅक्टरने शेती करताना त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान अभियानाचे यश अधोरेखित करते तसे कष्टाने आणि तंत्रज्ञानाच्या उपयोगाद्वारे फायद्याची शेती करता येते हेदेखील स्पष्ट होते.

**– डॉ. किरण मोघे**

जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक.

**जळगाव जिल्हा**

जळगाव जिल्ह्यातील नंदगाव या छोट्या खेड्यातील सुमनबाई गुलाबराव पाटील यांनी राष्ट्रीय कृषी विकास योजना २०१७–१८ मध्ये 'उन्नत शेती–समृद्ध शेतकरी' अभियानाच्या माध्यमातून ट्रॅक्टर घेतला आणि मुलाच्या मदतीने शेतीचा विस्तार सुरू केला आहे. त्यांच्याकडे वडिलोपार्जित १४ ते १५ बिघे शेतजमीन. ११ वर्षांपूर्वी तरुण मुलाचा आणि सात वर्षांपूर्वी पती आणि गावाचे माजी पोलीस पाटील गुलाबराव पाटील यांच्या मृत्यूनंतर त्या हिंमत हरल्या नाहीत किंवा महिला म्हणून काय करू असाही प्रश्न उपस्थित केला नाही. या उलट त्यांनी सुरुवातीला निम–बटाईने आणि या वर्षांपासून मुलाच्या सहकार्याने शेतीचा विस्तार सुरू केला आहे. सुमनबाई यांचे मोठे पुत्र जितेंद्र गुलाबराव पाटील यांचे बारावीपर्यंत शिक्षण झाले आहे. ते पैठण (जि. औरंगाबाद) येथे खासगी कंपनीत नोकरीला होते. या वर्षीच्या सुरुवातीला स्वेच्छा निवृत्ती स्वीकारून शेतीत रमले. सध्या त्यांनी शेतात कपाशी, तूर आदी पिकांची लागवड केली आहे. आता कांदा लागवडीची तयारी सुरू केली आहे. श्री. पाटील यांच्याकडे चारचाकी वाहन चालवण्याचा परवाना ही आहे. त्यांनी ट्रॅक्टरचा पुरेपूर वापर करीत शेतीमध्ये सुधारणा करण्यास सुरुवात केली. गिरणा नदी काठावरील अडीच बिघे क्षेत्राचे सपाटीकरण केले. या क्षेत्रात त्यांनी आता केळी लागवडीसाठी तयारी सुरू केली आहे. त्यासाठी शेतात जलवाहिनी टाकून ठिबक सिंचनाची सुविधा निर्माण करण्यात येत आहे. या क्षेत्रात आता केळीचे चार हजारांवर खोड लावले जाणार आहेत. शेतीतील लहान मोठी कामे करण्यासाठी रोटॉवेटर, ट्रेलर, नागर, ट्रॉली, कुट्टी मशीन खरेदी केले आहे. 'उन्नत शेती समृद्ध शेतकरी' अभियानांतर्गत ट्रॅक्टर खरेदी केले. त्यासाठी सुमनबाई पाटील यांना एक लाख २५ हजार रुपयांचे अनुदान मिळाले आहे.

या कामाबरोबरच श्री. पाटील शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुसऱ्याचे शेत नांगरून देणे, ट्रीलर करून देणे, कुट्टी करून देणे आदी कामे करून देतात. या कामांमुळे त्यांना वर्षाकाठी किमान लाख दोन लाख रुपये उत्पन्न मिळत आहे.

**– विलास बोडके,**

जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव.

**व्यक्तिगत लाभाच्या अनेक योजना शासनामार्फत राबवण्यात येतात. त्याचा लाभ घेऊन अनेक शेतकऱ्यांनी आपल्या जीवनात परिवर्तन घडवून आणले आहे. यामुळे त्यांची व त्यांच्या कुटुंबीयांची वाटचाल समृद्धीच्या दिशेने सुरू झाली.**

# समृद्धीची दिशा



**मत्स्यशेतीमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होत आहे.**

## मत्स्यशेती

केंद्र शासनाने शेतकऱ्यांचे उत्पादन २०२२ पर्यंत दुप्पट होईल या दृष्टीने विविध योजनांना बळकटी दिली आहे. त्यातच राज्यात जलयुक्त शिवार सारख्या योजनांमुळे या उद्दिष्टांकडे वाटचाल सुरू झाली आहे. आरंभी प्रयोग म्हणून केला आणि तो यशस्वी झाला असा गडचिरोलीतील धान शेतीत मत्स्यशेतीचा प्रयोग दुपटीहून अधिक उत्पन्न देणारा ठरला आहे.

या सोबत शेतात प्लास्टिक मल्चिंगद्वारे शेतीचाही प्रयोग यशस्वी ठरत आहे. यातूनदेखील शेतकऱ्यांना धानाचे उत्पादन दुपटीने घेणे शक्य झाले आहे. त्याचा आर्थिक फायदा या शेतकऱ्यांना होत आहे.

धानशेतीतच मत्स्यशेतीचा यशस्वी प्रयोग सिरोंचा तालुक्यातील जानमपल्ली गावाचे शेतकरी दीपक दुर्गे यांनी केला. यात माशांना भातशेतीत सोडले जाते. धानातील तणावर आणि कीटकांवर मासे वाढतात आणि मत्स्यविष्ठेतून खत मिळण्यासोबतच किडीपासूनधानाचे रक्षण साध्य होते. त्यात धान आणि मासे असे दुहेरी उत्पादन मिळते.

याबाबत त्यांची भेट घेतली त्या वेळी त्यांनी सांगितले, 'पदवीधर तरुणाला नोकरीत वर्षाचे सव्वाचार लाखापर्यंत पॅकेज मिळते. मात्र, मला एकराला पाच ते सहा लाखांचे उत्पन्न मिळत असून, स्वत: मालक असल्याचा अभिमान आहे. माझ्याकडे असलेल्या तळ्यात मी पूर्वी मत्स्यशेती करायचो. आता शेताच्या चारही बाजूने चर खोदला आहे. मध्यभागी भाताची लागवड करत चारीत मत्स्यशेती करतो. पावसाळ्यात पावसाचे पाणी चारीत जमा होते. हे पाणी आटल्यावर कूपनलिकेमधील पाणी त्यात टाकतो. या पद्धतीच्या शेतामधून मला ३० क्विंटल धान मिळाले असून, १५ क्विंटल भात तयार होईल. आता उन्हाळ्यात पुन्हा भात लावणार आहे. हा भात काढल्यावर पुढच्या खरिपात पुन्हा याच ठिकाणी भात लावून त्याची काढणी झाल्यावर मासे विकणार आहे.

**गडचिरोली जिल्हा**

तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केलेल्या शेतीमुळे भाताचे उत्पादन एकराला आठ क्विंटल वाढत असताना, किलोला ८० रुपये असा भाव मिळाला. उन्हाळ्यातील एवढ्याच भावासाठी तेवढी रक्कम अपेक्षित असून पुढील खरिपातील भात काढल्यावर मासे चार लाखांमध्ये विकले जातील.'

आदिवासीच्या भाताचे मार्केटिंग करण्यासाठी चारकंपन्यांची स्थापना करत नवा 'ब्रॅन्ड' तयार करण्यात आला आहे. याखेरीज गडचिरोली जिल्ह्यात नागली, वरई, सूर्यफूल, तीळ ही पिके नव्याने घेण्यासाठी औषधी वनस्पतीचे उत्पादन शेतात घेण्यास सुरुवात झाली आहे.

मातीची धूप थांबवणे अन्नद्रव्यांचा निचरा कमी करणे, तणाचे



join us 》》 https://t.me/Mpscrockers88



**भातातील मत्स्यशेती.**

नियंत्रण करणे आणि भात उत्पादनाचा कालावधी कमी करणे , ही उद्दिष्टे मल्चिंगच्या माध्यमातून साध्य झाली. गडचिरोली जिल्ह्यात १२० एकरावर हा प्रयोग राबवण्यासाठी १८ लाखांचे अनुदान उपलब्ध झाले. त्यापैकी ४५ एकरांवर प्रयोग यशस्वी झाला. ७८ टक्के जंगल असल्याने वारा, पाणी, जनावरांच्या माध्यमातून वाढणाऱ्या तणाचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात व्हायचा. त्यावर नियंत्रण मिळाले आहे. खर्चामधील बचत ही प्रामुख्याने नांगरणी, चिखलणी, रोपे तयार करणे, तण काढणे यावरील आहे. पावसाळ्यात सूर्यप्रकाश कमी मिळत असल्याने भात उत्पादनाचा कालावधी १२० आठवड्यांचा लागायचा. आता हा कालावधी १०५ आठवड्यांवर आला आहे.

जीवनगट्टा, (ता.एटापल्ली) येथील वंदना गावडे या पारंपरिक पद्धतीने भातशेती करायच्या, पाण्याच्या कमतरतेमुळे त्यांना एकरी सात ते आठ क्विंटल धान उत्पादन मिळायचे. त्यांनी प्लास्टिक मल्चिंग पद्धतीने यंदा भातलागवड केली. उत्पादन दुपटीने वाढले. यंदाच्या हंगामातील भाताची काढणी झाली असून, मळणी व्हायची आहे.

आता हरभरा लागवड करणार आहे. तसेच वेलवर्गीय पीक घेण्याचा मानस आहे. अशा पद्धतीने एकराला आठ हजार रुपये खर्च करत चार पिके घेणार असल्याचे वंदना गावडे यांनी सांगितले.

**– प्रशांत दैठणकर,**
जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली.

नंदुरबार जिल्हा

काकर्दा, ता. धडगांव येथे कृषी विभागाच्या सहकार्याने तयार झालेल्या शेततळ्यात मत्स्यबीज टाकून काकर्दा येथील गोट्या हुण्या पावरा आणि वसंत बिंद्या पाडवी यांनी शेतीबरोबरच रोजगाराचा नवा पर्याय स्थानिक युवकांसमोर ठेवला आहे. या परिसरात गेल्या काही वर्षात शेतीसह इतर पूरक उपक्रमांवर शेतकरी भर देत आहेत. आंबा आणि पेरू बागांनी बहारलेल्या भागात दोन शेतकऱ्यांनी वैयक्तिक शेततळी उभारली होती. यात मत्स्य विभागामार्फत पुरवण्यात आलेले मत्स्यबीज मोठ्या प्रमाणात टाकण्यात आले. या बीजाचे मोठ्या माशांमध्ये रूपांतर झाले असून यातून स्थानिकांना रोजगाराचा नवा मार्ग सापडला आहे. येत्या काही दिवसात माशाची विक्री होणार असल्याने स्थानिकांसोबत परराज्यातील व्यापारी मासे खरेदीसाठी उत्सुक आहेत.

या दोघा शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या राष्ट्रीय एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रमात सहभाग नोंदवला होता. त्यानुसार या शेतकऱ्यांना शेततळ्यासाठी ५ लाख ५६ हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले. यातून काकर्दा गाव शिवारात दोघांनी ४४ बाय ४४ मीटर लांबी आणि रुंदीचे शेततळे करून त्यावर विशिष्ट प्रकारचा ५०० मायक्रॉन प्लास्टिक कागद अंथरला.

शेततळे पाण्याने भरल्यानंतर मत्स्य व्यवसाय करण्यासाठी मध्य प्रदेशातील राजपूर येथून १२ हजार मत्स्यबीज आणून दोन्ही शेतकऱ्यांनी तलावात टाकले होते. गेल्या आठ महिन्यात रोहू, कटला आणि मुगला प्रजातीचे सात किलो वजनापर्यंतचे मासे तयार झाले आहेत. ऐन उन्हाळ्यात इतरत्र माशांची आवक कमी असताना येथून मत्स्योत्पादन होणार असल्याने मागणी वाढली आहे.

काकर्दा येथे फुललेल्या मत्स्यशेतीची माहिती मिळत असल्याने धडगांव ते शहादा दरम्यान प्रवास करणारे नोकरदार येथून मासे खरेदी करतात. काकर्दासारख्या दुर्गम भागामध्ये पूरक उद्योगांसाठी प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांनी शेततळे निर्मितीसाठी पाठपुरावा केल्यावर मत्स्योत्पादनात लाभ मिळेल का याची चाचपणी केली होती. सुरुवातीला त्यात अडथळे आले, परंतु स्थानिकांनी मासे खरेदी करून विक्री करण्याची तयारी दर्शवल्याने समस्या मार्गी लागली आहे. येथील ताज्या माशांची माहिती मध्यप्रदेशातही झाल्याने तेथूनही मासे खरेदीसाठी व्यापारी संपर्क करत आहेत.

**जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार.**

## मृदा आरोग्य पत्रिका

मानवाच्या शरीराप्रमाणे शेतजमिनीच्या आरोग्याचेही महत्त्व आहे. या शेतजमिनीचे आरोग्य 'मृदा आरोग्य पत्रिकेतून' समोर येते. घटती शेती उत्पादकता व सिंचनाचे प्रश्न पाहता जमिनीच्या पोतावर शेतकऱ्यांना पेरणी करता यावी या दृष्टिकोनातून सरकारने मृदा (माती) आरोग्य अभियान सुरू केले. या अभियानाचा लाभ बुलडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी घेतला. बुलडाणा तालुक्यातील अंभोडा येथील गणेश किसन तायडे या शेतकऱ्याने आपल्या शेत जमिनीची मृदा तपासणी करून शेती उत्पनात भरघोस वाढ केली. या उत्पन्नातून त्यांचा आर्थिक स्तर उंचावला आहे.

गणेश तायडे या शेतकऱ्याकडे चार एकर शेती आहे. या शेतीमध्ये ते पारंपरिक पद्धतीने सोयाबीन, तूर, भाजीपाल्याचे उत्पादन घेतात. अधिकचे उत्पन्न मिळावे, या उद्देशाने उपलब्ध असलेल्या महागड्या औषधे, बी–बियाणांचा उपयोग आपल्या शेतीमध्ये करतात. एवढे करूनही मात्र उत्पादन कमी आणि लागवड खर्च जास्त अशी परिस्थिती होती.

त्यामुळे त्यांनी आपल्या शेतातील (मृदा) मातीचे परीक्षण करून घेतले. शेत जमिनीतील भौतिक आणि रासायनिक तपासणी



**मृदा आरोग्य पत्रिकेसोबत गणेश किसन तायडे.**

केल्यानंतर पिकांना उपलब्ध अन्नद्रव्याचे प्रमाण शोधून काढण्यात आले. त्यानुसार आवश्यक असणारे सेंद्रिय खते, जैविक खते आणि रासायनिक खताचा पुरवठा एकात्मिक पद्धतीने जमिनीस दिल्यास जमिनीची पोत सुधारून उत्पादनात वाढ होऊ शकते. याची माहिती मृदा आरोग्य पत्रिकेद्वारे त्यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी नियोजन करून शेती केल्याने त्यांचे शेतमाल उत्पन्न वाढले आहे. मृदा आरोग्य तपासणी अभियानांर्तगत जमिनीची प्रतवारी तपासल्यामुळे शेती फायद्याची होऊ लागली. शेतजमिनीचा पोत सुधारला. उत्पादनात वाढ झाली. मानवी शरीराप्रमाणे शेत जमिनीमधील घटकांचे प्रमाण समजले. काय कमी आहे, किंवा काय जास्त आहे, याची माहिती कळाली. परिणामी त्याप्रमाणे शेतात खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैविक खते टाकून ती कमी भरून काढण्यात आली. तसेच जास्त असल्यास वापर कमी करून ती पुर्ववत करण्यात आली. माती परीक्षण करण्यासंदर्भात त्यांनी इतर शेतकऱ्यांनाही सांगितले.

मृदा (माती) चाचणी करण्यापूर्वी त्यांना शेतातून सोयाबीनच उत्पादन एकरी सात–आठ क्विंटल होत असे. परंतु मृदा तपासणी केल्यानंतर योग्य खताच्या मात्रा दिल्यामुळे त्यांच्या उत्पादनात वाढ होऊन एकरी बारा क्विंटलपर्यंत उत्पन्नात वाढ झाली आहे. माती परीक्षण केल्यानंतर शेतीच्या उत्पन्नात वाढ झाल्याचे त्यांची पत्नी कांताबाई गणेश तायडे यांनीसुद्धा आवर्जून सांगितले. शेतीचे आरोग्य टिकून ठेवण्यासाठी वेळच्या वेळी शेतातील मातीचे आणि पाण्याचे परीक्षण करणे आवश्यक आहे. जमिनीत काही दोष आढळून आल्यास त्यावर उपाय शोधणे हे केवळ माती परीक्षणामुळे समजू शकते याची कल्पना माती परीक्षण अभियानामुळे आपल्याला झाली, असे गणेश तायडे आवर्जून सांगतात. मृदा आरोग्य पत्रिकेनुसार शेतातील जमिनीत असलेल्या घटकांची योग्य पद्धतीने नियोजन करून, खतांच्या मात्रा शेतकऱ्यांनी दिल्यास जमिनीची पोत सुधारते. शेतातील उत्पादनात मोठ्या प्रमाणत वाढ होते आणि योग्य त्या खताच्या मात्रा दिल्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ होते हे माती परीक्षणावरून दिसून येते. सुरुवातीला कशाला करावी लागते मातीची तपासणी असे म्हणणारे त्यांच्या शेतशिवाराचे शेजारी आता स्वत:हून माती परीक्षण करायला लागले आहेत. शासनाच्या माती परिक्षण कार्यक्रमामुळे गणेश तायडे यांनी शेतमालाचे उत्पादन वाढवले आहे. हे यश माती परीक्षणाचे आहे.

■■

## कामगंध सापळा

बुलडाणा जिल्हा

बोंडअळीमुळे शेतकरी संकटात सापडला असताना बुलडाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील किन्ही पवार येथील भगवान तोरमल या शेतकऱ्याने प्रतिकूल परिस्थितीत कापसाची आदर्श शेती करून दाखवली आहे. उत्तम पीक नियोजन आणि बोंडअळीचा बंदोबस्त करून त्याने मागील वर्षी ३० क्विंटलपेक्षा जास्त उत्पादन घेतले. यंदाच्या हंगामात विक्रमी उत्पादन करण्याच्या मार्गासोबत शेतकऱ्यांमध्ये असलेली बोंडअळीची भीती दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. कामगंध सापळ्याचा वापर करून बोंडअळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे.

भगवानने १८ एकर शेतीमध्ये कापूस, सोयाबीन पिकांची लागवड करताना कापसासाठी नवीन पद्धत विकसित केली. मागील वर्षात कापसाचे विक्रमी उत्पादन करायचे, या उद्देशाने दक्षिण–उत्तर लागवड करून कापूस पिकातील



**कामगंध सापळ्याने बोंडअळीचा यशस्वी सामना करून पीकसंरक्षण प्रभावीपणे करणारा भगवान तोरमल.**

अंतर वाढवले. शेणखताचा अधिक वापर करून गरजेनुसार पाणी दिले. कापसाची वाढ जोमाने होत असताना तुडतुडे, शेंदरी आणि



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88

गुलाबी बोंडअळीने हल्ला केला. मात्र, खचून न जाता कृषी तज्ज्ञांशी संपर्क साधून डाऊ ॲग्रो सायन्सच्या तज्ञांचा सल्ला घेतला. कापसाची वाढ जोमाने व्हावी म्हणून शेणखत आणि तीन वेळा पाणी दिले. सोबत तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार कीटकनाशकांची फवारणी केल्याने बोंडअळी, मावा, तुडतुड्याचा नायनाट करण्यासाठी मदत मिळाली. नियोजनबद्ध पाणी, खत आणि फवारणी केल्याने ३० क्विंटलपेक्षा जास्त उत्पादन मिळाले. यंदा कापूस उत्पादनात भरारी घेण्यासाठी नव्या पद्धतीने लागवड केली आहे. यंदा सुरुवातीपासून कापसावर बोंडअळीचा प्रादुर्भाव झाल्याने कृषी तज्ञांच्या सल्ल्यानुसार कामगंध सापळे लावले. पाऊस कमी असल्याने कापसाच्या वाढीसाठी शेणखताची मात्रा, पाणी आणि एकरी १५० मिली कीटकनाशकाची फवारणी केली. त्यानंतर एकरी १८० मिली दुसऱ्या कीटकनाशकाची फवारणी केल्याने बोंडअळीचा प्रादुर्भाव रोखणे सुरू आहे. पारंपरिक शेतीमध्ये योग्य नियोजन आणि तज्ज्ञांच्या सल्ल्याने बोंडअळी आणि नैसर्गिक संकटाला तोंड देत कापसाच्या उत्पादनात वाढ करता येऊ शकते हे त्याने दाखवून दिले आहे.

यंदा मागच्या वर्षीपेक्षा विक्रमी कापूस उत्पादन होईल, असा विश्वास भगवान तोरमल याने व्यक्त केला आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, बुलडाणा.**

## शेत विहीर



**शेत विहिरीसोबत मनोहर अंकुश परब.**

सिंधुदुर्ग जिल्हा

कुडाळ तालुक्यातील बाव या गावातील मनोहर अंकुश परब यांनी. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शेतात विहीर बांधली. त्यातून शेत सिंचनाखाली आणत मळा फुलवला.

१० वी पर्यंत झालेले शिक्षण, घरची शेती फक्त ६७ गुंठे, पाण्याची सोय नाही, पावसाळ्याच्या चार महिन्यात पिकेल तेच उत्पन्न. अशी त्यांची परिस्थिती. घराची जबाबदारी त्यांच्याच खांद्यावर खाणारी तोंड ६, आई, वडील, पत्नी, दोन मुल असा परिवार. मुलांना चांगले शिक्षण देण्याचा ध्यास. आपल्याला शिकायला नाही मिळाले. निदान मुलांनातरी शिकवून काहीतरी बनावाव ही मनोमन इच्छा. पण, हंगामी शेतीतून मिळणारे उत्पन्न तुटपुंज, कसे भागवावे यात आणि कशी स्वप्न पूर्ण करावीत ही विवंचना. त्याच वेळी त्यांना ग्रामपंचायतीच्या माध्यमातून महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून विहीर खोदून मिळत असल्याचे त्यांना समजले. संपूर्ण योजनेची माहिती त्यांनी घेतली. ६७ गुंठे जमीन भिजेल यासाठी विहीर खोदण्याचे निश्चित केले. सर्व कागदपत्रे व पात्रता निकष पूर्ण केले आणि विहिरीसाठी ३ लाख रुपयांचे अनुदान त्यांना मिळाले.

पावसाळ्याच्या चार महिन्यात फक्त भात हेच एक पीक ते घेत होते. त्यामधून त्यांना उदरर्निवाहापुरते उत्पन्न मिळत होते. पण, मुलांचे शिक्षण, त्यांना मोठे करणे या गोष्टी शक्य होताना दिसत नव्हत्या. समोर कोणताही पर्याय दिसत नव्हता. पण, त्यांनी शेतात विहीर खणली आणि त्यांची परिस्थिती बदलण्यास सुरुवात झाली. शेताच्या एका बाजूला त्यांनी योजनेतून १५ मीटर व्यासाची ४५ फूट खोल विहीर खणली. त्याला पाणी चांगले लागले. आता पावसाळी भात पिकासोबतच त्यांनी बारमाही पीक घेण्यास सुरुवात केली. त्यामध्ये भाजीपाला व उन्हाळी पीक यांचा समावेश आहे. शेतात पाणी आल्यामुळे चवळी, मिरची, कुळीथ, उडिद, वाल, मेथी अशा भाज्या पिकवण्यास सुरुवात केली. तसेच शेतामध्ये केळी व नारळाची लागवड केली. ३५ माड आणि ६० केळी लावल्या. त्यामुळे शेतातून रोज उत्पन्न मिळू लागले. पूर्वी फक्त पावसाळी हंगामातील शेतीतून तीस हजार उत्पन्न मिळत होते. आता त्यांना १० ते १५ हजार मासिक उत्पन्न मिळू लागले. खरीप हंगामाच्या पिकाची खात्री नव्हती. त्यामुळे उत्पन्नाचीही खात्री देता येत नव्हती. पण, आता हमखास उत्पन्नाची खात्री मिळाली. रोजच्या बाजारात केळी जातात. नारळाचे उत्पन्न मिळते. विहिरीवर अनुदानातूनच विद्यूत मोटर बसवली आहे. त्यामुळे शेताला पाणीपुरवठा करता येतो.



**शेत विहिरीसोबत सुभाष लक्ष्मण परब.**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील बांव या गावातील सुभाष लक्ष्मण परब यांना ग्रामपंचायतीमध्ये एक दिवस महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून वैयक्तीक सिंचन योजनेखाली विहीर बांधून मिळत असल्याचे समजले. मग त्यांनी आपली शेती सिंचनाखाली आणण्याचा ध्यास घेतला.

शेतामध्ये त्यांनी या योजनेखाली विहीर बांधून घेतली आणि शेतामध्ये वेगवेगळी पिके घेण्यास सुरुवात केली. पूर्वी फक्त पावसाळी भात पीक होते. आता त्यांनी शेतामध्ये भूईमूग, मिरची, चवळी, वाल, गवार, लालमाठ, मुळा, वांगी ही पिके घेण्यास सुरुवात केली. सोबतच त्यांनी २५ केळी व ४० माड लावले. त्यामुळे त्यांना उत्पन्नाचा खात्रीशीर मार्ग मिळाला. एकट्या केळीतूनच त्यांना महिन्याला तीन ते चार हजाराचे उत्पन्न मिळते. तसेच वार्षिक उत्पन्नामध्ये ५० हजार रुपयांपर्यंत वाढ झाली.

या एका विहिरीमुळे त्यांचे आयुष्य बदलून गेले. शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांनी शेतात मिरचीची लागवड केली. त्याचा चांगला फायदा झाल्याचे श्री परब यांनी सांगितले. याशिवाय भविष्यात शेतात काजू, आंबा लागवडीचे उद्दिष्ट आहे. सुपारी लावण्याचा त्यांचा विचार आहे. त्यानंतर मसाला पिकांची लागवड करणार असल्याचे श्री. परब म्हणाले. घरी गाय व दोन बैल आहेत. त्यांच्या चाऱ्यासाठी शेतात मका हे आंतरपीक घेतात. त्यामुळे वैरण विकत आणावी लागत नाही आणि दुधाचा धंदा चांगला फायद्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

पावसाळी शेतीमध्ये अत्यल्प उत्पन्न मिळत होते. पण, आता आर्थिक परिस्थिती बदलली आहे. रोज पैसा घरात येतो. आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. कष्टाची तयारी असल्यामुळे शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करणे व नवनवीन पिके घेणे हा उद्देश श्री. परब यांनी बोलून दाखवला. आपली शेती ही एक आदर्श शेती असावी यासाठीही प्रयत्नशील असल्याचे श्री. परब आवर्जून सांगतात.

श्री. परब हे एक प्रगतिशील शेतकरी आहेत. त्यांनी घरामध्ये बायोगॅस बसवला आहे. घरामध्येच कुक्कुटपालनाचा व्यवसायही ते करतात. शेतीला पूरक असा जोडधंदा म्हणून ते दुग्ध व्यवसायही करतात. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून विहीर बांधण्यासाठी लाभार्थ्याची किमान ६० गुंठे जमीन असणे गरजेचे आहे. ३ लाख अर्थात १०० टक्के अनुदानावर ही योजना राबवली जाते. १५ मीटर रुंद आणि ४५ फूट खोल विहीर बांधून दिली जाते.

**– हेमंतकुमार चव्हाण,**
माहिती सहाय्यक, जिल्हा माहिती कार्यालय, सिंधुदुर्ग.



प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तानाजी वाघ यांचे टुमदार घर.

# सुंदर अपुले घर...

नाशिक जिल्हा

प्रधानमंत्री आवास योजना अनेक बेघर आणि गरजू नागरिकांसाठी दिलासा देणारी ठरली आहे. त्र्यंबकेश्वर तालुक्यात खंबाळे येथील तानाजी वाघ यांचे सुंदर आणि टुमदार घर या योजनेमुळे उभे राहिले. घरामुळे पावसापासून संरक्षण होण्याबरोबरच नातेवाईकही येऊ लागल्याचे समाधान त्यांना मिळाले आहे.

श्री. वाघ हे सातपूर औद्योगिक क्षेत्रात कंत्राटी तत्त्वावर नोकरी करून उदरनिर्वाह चालवतात. काम नसेल त्या दिवशी घरीच राहून पुढच्या दिवसाच्या कामाची वाट पाहणे एवढेच त्यांच्या हातात होते. हलाखीच्या स्थितीमुळे मातीचे आणि गळक्या छताच्या जुन्या घरातच ते आपल्या पत्नी आणि चार मुलांसह राहत होते.

घरास शौचालयाची बिकट अवस्था असल्याने कुटुंबातील सदस्यांना बाहेर उघड्यावर जावे लागते याची खंत त्यांना होती. मात्र उत्पन्न मर्यादित असल्याने चांगल्या घराचे स्वप्न पाहणेच केवळ त्यांच्या हातात होते. हे स्वप्न पूर्ण होणार नाही असे वाटत असताना ग्रामपंचायतीत त्यांना घरकूल योजनेची माहिती मिळाली.

घरकुलाला मंजुरी मिळाल्यानंतर नवे घर उभारण्याच्या उमेदीने तानाजी यांनी मजुरीवर जाणे बंद करून, या कामात स्वत:ला कुटुंबातील सदस्यांसह जुंपून घेतले. त्यांना घरकुलासाठी एक लाख २० हजार रुपयांचे अनुदान मिळाले. मजुरांकडून काम करून घेण्यापेक्षा स्वत: केल्याने बचत होण्याबरोबरच मनासारखे घर उभारल्याचे समाधान त्यांना मिळाले. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत त्यांना १८ हजार रुपये मजुरीपोटी मिळाले.

घर उभारले जात असताना प्रत्येक टप्प्यावर निश्चित प्रमाणात अनुदान त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आले. तानाजी यांनी नातेवाइकांकडून काही रक्कम उसनी घेत दोन स्वतंत्र खोल्या बांधल्या. मुलांच्या भविष्याचा विचार करून त्यांनी घरबांधणीचे नियोजन केले. मजुरीच्या वाचलेल्या पैशातून शौचालयाचे चांगले बांधकाम करून घेतले.

आज सिमेंटचे आणि चांगले छत असलेल्या घराकडे पाहताना एरवी गंभीर राहणाऱ्या तानाजी यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलते. ते मोकळेपणाने शासनाला धन्यवाद देतात. घराची चिंता दूर झाल्याने मुलांना त्रास सहन करावा लागणार नाही याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसते. घरकूल योजनेत नाशिक जिल्हा राज्यात अग्रेसर आहे तर देशात ३८ व्या क्रमांकावर आहे. जिल्हा परिषदेमार्फत मोहीमस्तरावर घरकुलांची कामे पूर्ण करण्यात येत आहे. त्यासाठी ५ हजार गवंड्यांचे प्रशिक्षणही घेण्यात येत आहे. खंबाळे गावात तानाजीसारख्या अन्य ३० कुटुंबांनादेखील घरकूल योजनेमुळे हक्काचे घर मिळाले आहे.



join us » » https://t.me/Mpscrockers88



**चणकापूर येथील सुक्राबाई पवार यांना पंतप्रधान आवास योजनेंतर्गत मिळालेले घरकूल.**

## योजनांना गती

कळवण तालुका आदिवासी बहुल क्षेत्र आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या अनेक आदिवासी बांधवांना कच्च्या घरात रहावे लागते. अशा नागरिकांना हक्काचे पक्के घर उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी घरकूल योजना अशा विविध योजना राबवल्या आहेत.

तालुक्यातील अधिकाधिक नागरिकांना योजनेचा लाभ व्हावा यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी आठवडे बाजाराच्या ठिकाणी जाऊन नागरिकांच्या बैठका घेतल्या. त्यांना योजनांची सविस्तर माहिती दिली. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. लाभार्थी नोंदणी प्रक्रिया आणि जिओ टॅगिंगची प्रक्रिया वेगाने करण्यात आली.

घर बांधताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करण्यात आला. प्रमुख अडचण वाळूच्या उपलब्धतेची होती. घर बांधणीसाठी आवश्यक वाळूचे प्रमाण आणि लाभार्थीची यादी उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आली. वाळू उपलब्धतेसाठी त्यांचे आणि तहसीलदारांचे चांगले सहकार्य लाभले. गवंडी प्रशिक्षण देण्यात येऊन घरांचा दर्जा चांगला राहील याकडे लक्ष देण्यात आले.

घरबांधणीच्या प्रत्येक टप्प्यावर कर्मचाऱ्यांमार्फत पाहणी करून नियमानुसार दिले जाणारे अनुदान तत्काळ लाभार्थ्याच्या बँक खात्यात वर्ग करण्याची व्यवस्था करण्यात आल्याने घरबांधणीचा वेग वाढला. पुढच्या टप्प्याचे बांधकाम थांबू नये यासाठी दुकानदाराकडून बांधकाम साहित्य उपलब्ध करून देताना रकमेची हमी पंचायत समितीने घेतली. साहित्याची निवड व दरनिश्चितीचे पूर्ण स्वातंत्र्य लाभार्थ्याला देण्यात आले.



सुक्राबाई पवार, चणकापूर– आधी पडक्या घरात राहत असल्याने चिंता वाटायची. आता हक्काचे चांगल घर मिळाले आहे. शासनाने अनुदान दिल्यानेच हे शक्य झाले. शासनाला धन्यवाद द्यावेच लागेल. नाहीतर माझे घराचे स्वप्न पुर्ण झालेच नसते. आज घरात सर्व सुविधा आहेत.

लाभार्थी दारिद्र्यरेषेखालील असल्याने घरबांधणीच्या कामासाठी त्यांना मनरेगा अंतर्गत २० हजार रुपयापर्यंतची मजुरी देण्यात आली. त्यामुळे त्यांना घरबांधणीकडे लक्ष देण्याबरोबरच, त्याच ठिकाणी रोजगार उपलब्ध झाला. काही ठिकाणी लाभार्थ्यांनी कष्टाने मिळवलेला थोडा आणखी पैसा टाकून घरकूल चांगल्या प्रकारे सजवले.

कळवण तालुक्याने कामगिरीच्या बाबतीत देण्यात येणाऱ्या गुणांपैकी ९७.३१ टक्के गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. एकूण ६ हजार ६९१ लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली असून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत गेल्या तीन वर्षात २ हजार ७८१ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. त्यापैकी २ हजार ७७९ लाभार्थ्यांना अनुदानाचा पहिला हप्ता देण्यात आला असून २ हजार ३९ घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे.

शबरी घरकूल योजनेंतर्गतदेखील २०१६–१७ मध्ये ३१४ घरकूल पूर्ण झाले. रमाई आवास योजनेत यावर्षी ४४ लाभार्थ्यांना घर मिळाले, तर २०१७–१८ मध्ये ७१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली. घरकूल बांधण्यासाठी शासनातर्फे एक लाख ३० हजाराचे अनुदान देण्यात येत आहे.

मुख्यमंत्री महोदयांचे प्रत्येकाला घरकूल देण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जिल्हा सज्ज झाला आहे. जिल्ह्याचा प्रथम क्रमांक कायम ठेवत आणखी ३० हजार घरकुलांची मागणी करण्यात आली आहे. मंजुरी मिळाल्यास पुढील काही महिन्यात अधिकाधिक नागरिकांना त्यांचे हक्काचे घर उपलब्ध करून दिले जाईल. तालुकानिहाय पूर्ण घरकुलांची संख्या– बागलाण २३५७, चांदवड ७३७, देवळा ६४४, दिंडोरी २०४४, इगतपुरी १०१०, कळवण २०३९, मालेगाव २३९०, नाशिक ५४४, निफाड १२५७, पेठ १४३७, सिन्नर २०१०, त्र्यंबकेश्वर १५०७ आणि येवला ११०३. ग्रामीण आदिवासी भागात घरकूल योजनेमुळे पक्की घरे उभी राहत आहेत.

नागरिकांच्या अनेक समस्या त्यामुळे दूर झाल्या असून पावसाळ्यात त्याचा विशेष फायदा झाला. कामगिरीत सातत्य ठेवत जास्तीत जास्त लाभार्थ्यांना घरकूल मिळवून देण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत प्रयत्न करण्यात येत आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक.**

वर्धा जिल्हा

दादाराव महादेव चव्हाण हे मौजे डिगडोह येथील रहिवासी असून, त्यांच्या परिवारात पत्नी, मुलगा, सून व २ नातवंडे असे ६ सदस्य आहेत. दादाराव यांची आर्थिक परिस्थिती तशी बेताचीच. परिवाराचा उदरनिर्वाह हा अल्पशा कोरडवाहू शेती व मोलमजुरीवर अवलंबून राहण्यासाठी मोडकळीस आलेले कच्चे मातीचे घर. घराचे छप्पर व भिंती पावसाळ्यात गळतात. त्या पडण्याच्या भीतीपोटी जीव मुठीत घेऊन राहणे हे नित्याचेच. सर्वसामान्य माणसाप्रमाणे दादराव व त्यांच्या कुटुंबाचेही तेच स्वप्न... आपलेही इतरांसारखे टुमदार पक्के घर असावे. परंतु ते स्वप्न सत्यात उतरण्यासाठी मोठ्या पैशाची गरज होती. त्यामुळे ते स्वप्न अशक्य असल्याचे त्यांना वाटू लागले होते.


दादाराव चव्हाण त्यांच्या घरासोबत

जीवनाच्या काळोखातही एक प्रकाशाचा किरण सापडावा, असे घडले... २०१६ मध्ये जाहीर झालेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या 'ब' यादीमध्ये दादाराव चव्हाण यांचे नाव समाविष्ट झाल्याने त्यांच्या मनातील घर आकार घेऊ लागले.

श्री. चव्हाण यांना या योजनेंतर्गत घरकुलासाठी प्रथम हप्ता ३०,०००/– रुपये मंजूर होऊन तो त्यांच्या वैयक्तिक बँक खात्यात जमा झाला. परंतु श्री. चव्हाण जेव्हा ही रक्कम बँकेतून काढण्यासाठी गेले तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, हे खाते जनधन योजनेचे असल्यामुळे त्यांना दर आठवडा फक्त २००० रु. काढता येतील. त्यामुळे घरच्या बांधकामासाठी लागणारे साहित्य खरेदी करणे अवघड झाल्याने घरकुल बांधकाम हे एप्रिल २०१६ ते मे २०१७ पर्यंत बंद अवस्थेत राहिले.

एप्रिल २०१७ मध्ये गावात महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान सुरू होऊन, मुख्यमंत्री ग्राम परिवर्तक गावात दाखल झाले. त्या वेळी गावातील विविध शासकीय योजनांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये दादाराव यांच्या प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलासंबंधी माहिती मिळाली. त्यानंतर त्यांना भेटून त्यांची अडचण समजून घेऊन त्यांना घरकुलाचे काम सुरू करण्यास सांगण्यात आले. बँकेशी सतत पाठपुरावा करून त्यांना प्रथम हप्त्याची रक्कम मिळवून दिली. त्यामुळे संबंधित घरकुलाचे काम सुरू झाले. परंतु पुन्हा पुढील हप्ता मागील जनधनच्याच खात्यात जमा न होण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेच्या संकेतस्थळावर श्री.चव्हाण यांचा मागील खाते क्रमांक नष्ट करून नवीन खाते क्रमांक नोंदवणे गरजेचे होते. त्यासाठी तालुका प्रधानमंत्री आवास योजना अधिकारी याच्याशी संपर्क साधून योजनेच्या राज्य व्यवस्थापन कक्ष, मुंबई येथून मुख्यमंत्री ग्राम परिवर्तक व तालुका प्रधानमंत्री आवास योजना अधिकारी यांनी सतत पाठपुरावा करून तो बदलून घेतला व त्यानंतर श्री. चव्हाण यांचे पुढील सर्व हप्ते वेळेवर नवीन बँक खात्यात जमा झाले. त्यांचे घरकुलाचे स्वप्न मुख्यमंत्री ग्राम परिवर्तक व महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन मिशन, ग्रामपंचायत व तालुका/जिल्हा प्रधानमंत्री आवास योजना अधिकारी यांच्या एकत्रित प्रयत्नांनी साकार झाले.

**कुणाल भास्कर भामरे,**
(मुख्यमंत्री ग्राम परिवर्तक)
ग्रामपंचायत: डिगडोह, जि. वर्धा.

## प्रत्येक घरात वीज

नंदुरबार जिल्हा

फेब्रुवारी २०१८ नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील रोषमाळ खूर्द, खर्डी, निमगव्हाण, बिलगाव तसेच अक्कलकुवा तालुक्यातील डनेल, मांडवा, व गमन या आठ गावांमध्ये स्वातंत्र्यनंतर प्रथमच विजेचा पहिला किरण पोहोचला. येथील ग्रामस्थांनी आनंदोत्सव साजरा केला.



विस्तारित ग्रामस्वराज्य अभियानातील 'प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना' या योजनेतूनही सुमारे ८६ हजार कुटुंबांना याचा लाभ मिळणार आहे. थेट वीज वाहिनीतून ६४ हजार तर सौर ऊर्जेचा माध्यमातून २२ हजार घरांमध्ये प्रकाश पोहोचणार आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार.**


join us 》 》 https://t.me/Mpscrockers88

# स्वच्छ इंधन, उत्तम जीवन

नंदुरबार जिल्हा

**'स्वच्छ इंधन, उत्तम जीवन' असा नारा देत केंद्र शासनाने प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत देशातील दारिद्र्यरेषेखालील ५ कोटी महिलांना मोफत घरगुती एल.पी.जी. गॅस उपलब्ध करून दिले आहेत. ग्रामीण भागात पारंपरिक पद्धतीने स्वयंपाक करतांना धुरामुळे डोळ्यांवर व शरीरावर होणारा दुष्परिणाम टाळण्यासाठी ही योजना यशस्वीपणे राबवल्यामुळे, महिलांचे सक्षमीकरण झाले आहे. पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास थांबवण्यात ही योजना यशस्वी ठरली आहे. घरगुती इंधनासाठी दरवर्षी हजारो झाडांची वृक्षतोड होत होती. या योजनेमुळे ग्रामीण भागातील घरापर्यंत एल.पी.जी. सिलेंडर पोहोचल्याने वृक्षतोड थांबली आहे.**

ग्रामीण व निमशहरी भागात स्वयंपाक करण्यासाठी आजही अनेक गावांत चुलींचा वापर केला जातो. ग्रामीण भागात स्त्रिया पारंपरिक चुलीत जळणाऱ्या इंधनामुळे होणाऱ्या प्रदूषणाचा बळी ठरत आहेत. यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी 'स्वच्छ इंधन, बेहतर जीवन' असा नारा देऊन केंद्र सरकारने १ मे, २०१६ रोजी संपूर्ण भारतात प्रधानमंत्री 'उज्ज्वला योजने' चा शुभारंभ केला. या योजनेचा मूळ उद्देश भारतातील दारिद्र्यरेषेखालील सुमारे ५ कोटी महिलांना मोफत घरगुती एलपीजी गॅस जोडण्या देण्यात येतील. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत नंदुरबार जिल्ह्यात आतापर्यंत ५४७ गावांत ५२ हजार १७४ कुटुंबांना उज्ज्वला योजनेंतर्गत एलपीजी गॅस जोडण्या देण्यात आल्या आहेत. यासाठी हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, इंडियन ऑइल कार्पोरेशन लिमिटेड अशा तीन कंपन्यांनी गॅस जोडण्या वितरित केल्या.

गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण भाग चूलविरहित करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. अनेक प्रकारच्या चुलींच्या रचना वापरात आल्या आणि गेल्या. परिस्थिती मात्र, आहे तशीच राहिली. चुलीतील धुरामुळे महिलांना त्रास होतो. त्यामुळे त्या विविध आजारांना बळी पडतात. स्वयंपाक करत असताना घराच्या आतल्या आतच खेळत राहणाऱ्या या धुरामुळे स्त्रिया व त्यांच्या आसपास बागडत असलेल्या लहान बालके रोगग्रस्त होऊ शकतात. जवळच्या जंगलातून व शेतातून गोळा करून आणलेली लाकडे, चिपाड, वाळलेले गवत वा थापवलेल्या शेणाच्या गोवऱ्या इत्यादींचा वापर करून ग्रामीण भागातील स्त्रिया स्वयंपाक करतात. अनेक वेळा इंधन जमा करण्याकरिता महिलांची पायपीटही होते. त्यामुळे चुलीभोवती ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक समस्यांचे जाळे पसरलेले जाणवते. ते दूर करण्यासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आली.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याला एक अर्ज आपल्या जवळच्या एलपीजी वितरण केंद्रावर सादर करावयाचा आहे. एलपीजी केंद्रावर अर्ज नि:शुल्क मिळतो. अथवा ऑनलाइन अर्ज भरता येतो. अर्ज सादर करताना अर्जदाराला आपले संपूर्ण नाव, पत्ता, आधार कार्ड नंबर, जन-धन बँक खात्याचे नंबर देणे बंधनकारक आहे. सोबतच पंचायत अधिकारी, नगरपालिका यांनी प्रमाणित केलेले बीपीएल प्रमाणपत्र, बीपीएल रेशन कार्ड, पासपोर्ट आकाराचा फोटो असणे आवश्यक आहे. योजनेंतर्गत भरलेले अर्ज एसईसीसी २०११ या डाटासोबत जोडून तपासण्यात येतात. त्या आधारावर लाभार्थी या योजनेचा लाभ घेण्याकरिता पात्र किंवा अपात्र ठरवण्यात येतात. अर्जदाराचे वय १८ वर्षे पूर्ण असावे. दारिद्र्यरेषेखालील महिलांनी अर्ज करणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना योजनेंतर्गत गॅस कनेक्शन खरेदी करण्याकरिता १६०० रुपयांचे आर्थिक सहकार्य करण्यात येते.




नंदुरबार येथे उज्ज्वला योजनेंतर्गत लाभार्थ्यांना गॅस वाटप करताना खासदार हिना गावित.

गरिबांच्या घरात ही योजना पोहोचवण्याकरिता येत्या तीन वर्षात ८ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेला एलपीजी सबसिडीमधून जमा झालेल्या रकमेतून गती दिली जाणार आहे. केंद्र सरकाने २०१५ मध्ये सुरू केलेल्या 'गिव्ह–इट–अप' अभियानांतर्गत आतापर्यंत १.१३ कोटी नागरिकांनी एलपीजी सबसीडीचा लाभ घेण्यास नकार दिला असून ते बाजारमूल्यानुसार गॅस सिलेंडर खरेदी करतात. या अभियानाला नागरिकांनी दिलेला भरघोस प्रतिसाद आणि त्या माध्यमातून बँक खात्यात जमा झालेली रक्कम प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेला यश मिळवून देणारी आहे.

**– जगन्नाथ पाटील,**
प्र. जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार.

## आजारांपासून मुक्ती

लातूर जिल्हा

गरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अनुसूचित जाती व जमातीमधील सामान्य कुटुंबातील महिलांना गॅस घेण्याची क्षमता नव्हती, पण उज्ज्वला गॅस योजनेमुळे स्वयंपाक करताना धुराच्या त्रासाने फुप्फुस, श्वसन व डोळ्यांच्या आजारांपासून मुक्ती मिळाली,अशी प्रतिक्रिया सोजराबाई शिंदे (रा. शिवपूर ता. शिरुर अनंतपाळ) तसेच उर्मिला राजेंद्र कोरे (रा. थेरगाव ता. शिरुर अनंतपाळ) या ग्रामीण भागातील महिलांनी व्यक्त केल्या. लातूर जिल्ह्यात या योजनेमध्ये ८८ हजार ९३३ लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे. या योजनेंतर्गत गरीब कुटुंबातील महिलेच्या नावाने गॅसजोडणी (कनेक्शन) १०० रुपयात दिले जाते.

उज्ज्वला गॅस जोडणीअंतर्गत सध्या चाकूर तालुक्यातील अलगरवाडी, लातूर तालुक्यामधील ताडकी, खाडगाव, सारसा, अहमदपूर मधील वैरागड, कोळवाडी, गिलेवाडी, नांदूरा बुजुर्ग, उदगीर केरोसीनची मागणी होत नाही. सध्या जवळपास ७५ टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. गॅस जोडणीदारास गॅस वापर करण्यासाठी देखील प्रवृत्त केले जात आहे.

**– मीरा ढास,** सहायक संचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, लातूर



बुलडाणा शासकीय रुग्णालयात डायलिसिसची मोफत सुविधा.

# आधुनिक देवदूत

**बुलडाणा जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये डायलिसिसची सुविधा मोफत उपलब्ध झाली आहे. ही सेवा रुग्णांना आर्थिक दिलासा देणारी ठरली आहे.**

बुलडाणा जिल्हा

मनुष्याच्या शरीरात दोन किडनी असतात. या दोन्ही किडनी निकामी झाल्यानंतर जीवन जगण्यासाठी किडनी प्रत्यारोपण किंवा डायलिसिस उपचार घेणे हेच पर्याय शिल्लक राहतात. हे दोन्ही उपाय अत्यंत खर्चीक आहेत. त्यामध्ये किडनी प्रत्यारोपण हा अत्यंत खर्चिक उपचार असल्यामुळे सर्वसाधारण कुटुंबातील रुग्ण डायलिसिसचा पर्याय निवडतात. खासगी रुग्णालयांमध्ये एका डायलिसिसच्या उपचारासाठी कमीत कमी ३ ते ४ हजार रुपये खर्च येतो. एका आठवड्यात दोन वेळेस आणि महिनाभरात किमान आठ वेळेस किडनी रूग्णांना डायलिसिस करावे लागते. यासाठी किमान १० ते १२ हजार रुपये खर्च येत असतो. साधारण आर्थिक उत्पन्न असलेल्या कुटुंबाला हा खर्च झेपणारा नसतो. मात्र रुग्णांना उपचारही आवश्यक असल्याने रुग्णालयाचे देयक भरता भरता कुटुंबीयांची आर्थिक परिथिती बिकट बनते. या सर्व परिस्थितीला तोंड देण्यासाठी शासनाने डायलिसिस उपचार कार्यक्रम हाती घेतला आहे. यामुळे डायलिसिसवरील रुग्णांना कमी खर्चातील उपचाराची नवसंजीवनी मिळाली आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालयात किडणी रुग्णांना डायलिसिस उपचार करण्यासाठी शासनातर्फे पाच डायलिसिस मशीन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या पाच मशीनवर दररोज दोन सत्रामध्ये काम चालते. एका रुग्णाला डायलिसिस करण्यासाठी किमान चार तास वेळ लागतो. अशा प्रकारे पाच मशीनवर दिवसाकाठी दहा रुग्ण डायलिसिसचा उपचार घेत आहेत. याशिवाय खामगाव येथील सामान्य रुग्णालय व मलकापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस मशीन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात अशा प्रकारे एकूण १५ डायलिसिस मशीन उपलब्ध आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत ३ हजार ८१४ डायलिसिस रिसायकल सेवा रुग्णांना देण्यात आली आहे. डायलिसिस सेवेसाठी जिल्ह्यात जवळपास १८६ रुग्ण प्रतीक्षा यादीत आहेत. बुलडाणा जिल्ह्यातील पूर्णा नदीच्या खोऱ्यातील काही भाग खारपाण पट्ट्यामध्ये येतो. या भागात किडनीच्या आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे जिल्ह्यात डायलिसिस उपचार पद्धतीचा लाभ मोठ्या प्रमाणावर किडनी रुग्णांना मिळू शकतो.

**– निलेश तायडे,** माहिती सहायक, बुलडाणा.



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88




महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत तातडीने माहिती देणारे आरोग्य मित्र

# मिळाले नवजीवन

**सर्वसामान्य आणि आर्थिक दुर्बल घटकांसाठी महात्मा जोतीबा फुले जन आरोग्य योजना जीवनदायी ठरली आहे. या योजनेचा लाभ घेऊन मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलच्या सुविधा सर्वसामान्य रुग्णांना मिळत असल्याने रुग्णांचे जीवन आरोग्यदायी होत आहे. या योजनेमध्ये ९७१ अतिगंभीर आणि अतिविशिष्ट उपचार पद्धतीचा तर १२१ पाठपुरावा पद्धतींच्या उपचारांचा समावेश आहे. कागदपत्रांची पूर्तता केल्यास पूर्णपणे मोफत उपचार होतात.**

महात्मा जोतीबा फुले जन आरोग्य योजनेचे लाभार्थी हे पिवळे, केशरी, अंत्योदय व अन्नपूर्णा शिधापत्रिकाधारक कुटुंबे आहेत. १४ दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमध्ये पांढऱ्या शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबांनाही योजनेचा लाभ मिळतो. लाभार्थ्यांपर्यंत तो पोहोचवण्यासाठी लातूर जिल्ह्यात विविध ठिकाणी आरोग्य शिबिरांचे आयोजने करण्यात येत आहेत. यासाठी लातूर जिल्ह्यातील १३ नामांकित रुग्णालयांना योजनेंतर्गत संलग्न करण्यात आले आहे.



महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये अत्याधुनिक उपचारांचा मोफत लाभ दिला जातो.

योजनेच्या सुरुवातीपासून म्हणजेच २१ नोव्हेंबर २०१३ ते ३१ जुलै २०१८ या कालावधीत लातूर जिल्ह्यातील ३६ हजार ७६६ रुग्णांनी लाभ घेतला आहे. त्यासाठी ७८ कोटी दोन लाख ५८ हजार ४२७ रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. चालू आर्थिक वर्षात अर्थात १ एप्रिल ते ३१ जुलै २०१८ या कालावधीत लातूर जिल्ह्यातील तीन हजार ७९८ रुग्णांनी लाभ घेतला आहे. त्यासाठी नऊ कोटी २४ लाख ३९ हजार ९३० रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. आतापर्यंत जिल्ह्यातील जवळपास ३७ हजार रुग्णांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

### योजनेमध्ये समाविष्ट जिल्ह्यातील रुग्णालये

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, राजस्थान शाळा जवळ, लातूर २) यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय, विश्वनाथपूरम, अंबेजोगाई रोड, लातूर ३) विवेकानंद रुग्णालय, सिग्नल कॅम्प, विद्यानगर, लातूर.४) अल्फा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, अंबेजोगाई रोड, लातूर,५) लाइफकेअर हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, कावळखेड रोड, उदगीर ६) सह्याद्री सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, राजीव गांधी चौका जवळ, लातूर,७) देशपांडे हॉस्पिटल, टिळक नगर, नानानाणी पार्क जवळ, लातूर ८) येलाले हॉस्पिटल, मुक्ताई मंगलकार्यालया मागे, अंबेजोगाई रोड लातूर,९) कृष्णा हॉस्पिटल, अंबेजोगाई रोड लातूर,१०) लातूर कॅन्सर हॉस्पिटल, देशपांडे कॉलनी, नंदी स्टॉप, औसारोड, लातूर, ११) आयकॉन डायालिसीस सेंटर, जुने कलेक्टर ऑफिस समोर, शिवाजी चौक, लातूर. १२) सदासुख हॉस्पिटल, सावेवाडी, लातूर.१३) चांडक हॉस्पिटल, लातूर रोड, मुरुड.

लातूर जिल्हा

या योजनेसंबंधी कोणत्याही अडचणींसाठी रुग्णालयात असलेल्या योजनेच्या हेल्प डेस्कवर जाऊन 'आरोग्य मित्र' या योजनेच्या अधिकृत व्यक्तिला भेटावे. अधिक महितीसाठी त्यांच्या मार्फत योजनेच्या जिल्हा समन्वयकास संपर्क साधावा, अथवा टोल फ्री क्रमांक: १५५३८८ अथवा १८००२३३२२०० यावर संपर्क साधावा.

## बाशीद कुरेशींना नवसंजीवनी !

लातूर शहरातील भोई गल्ली भागात राहणारे श्री. बाशीद गुलाम कुरेशी हे ५५ वर्षाचे सर्वसामान्य नागरिक आहेत. याच भागात ते मागील ३५-४० वर्षांपासून हॉटेल चालवतात.

ऑगस्ट २०१७ मध्ये बाशीद कुरेशी व त्यांच्या कुटुंबीयांवर एक संकट कोसळले. श्री. कुरेशी यांच्या छातीत अचानकपणे खूप दु:खू लागल्याने त्यांना लातूर शहरातील अल्फा सुपर स्पेशालिस्टी रुग्णालयात दाखल करावे लागले. रुग्णालयात श्री. कुरेशी यांच्या विविध तपासण्या केल्या असता तेथील वैद्यकीय तज्ज्ञांनी त्यांची एन्जोओग्राफी करण्याचे ठरवले.

परंतु श्री. कुरेशी यांची हॉटेल व्यवसायातील मिळकत बेताचीच असल्याने व एन्जोओग्राफी व त्यानंतर बायपास सर्जरीचा होणारा अडीच ते तीन लाखाचा खर्च त्यांच्या कुटुंबीयांसाठी खूप मोठा व

अशक्य असा होता. श्री.कुरेशी यांचे कुटुंबीय त्यांच्या प्रकृतीबाबत व बायपास सर्जरीसाठी जमवायच्या पैशाबाबत चिंताग्रस्त असतानाच त्यांच्यासमोर अल्फा हॉस्पिटलमधील आरोग्य मित्र येऊन उभा ठाकला. श्री. कुरेशी यांच्या कुटुंबीयांना महात्मा फुले जन आरोग्य या शासकीय योजनेची माहिती देऊन; त्यांना एक प्रकारचा आधार दिला. त्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर मोफत उपचार व तेही फक्त शिधापत्रिका व एका ओळखपत्रावर मिळणार असल्याने समाधान आले.

अल्फा रुग्णालयातील वैद्यकीय तज्ज्ञांच्या सल्ल्याप्रमाणे श्री.कुरेशी यांची प्रथम एन्जोओग्राफी करण्यात आली. त्यानंतर आठच दिवसांनी त्यांची बायपास सर्जरी करण्यात आली. या दोन्ही सर्जरी व त्यासाठी आवश्यक औषधोपचार, तपासण्या आदी मोफत करण्यात आल्या. रुग्णालयातील त्यांच्या २० दिवसांतील मुक्कामात त्यांना दर्जेदार जेवणही विनामूल्य पुरवण्यात आले. बायपास सर्जरीनंतर श्री.कुरेशी यांना अतिदक्षता विभागात तीन-चार दिवस ठेवण्यात आले होते. तो खर्च मोफत करण्यात येऊन तेथे सर्व दर्जेदार आरोग्य सुविधा मोफत देण्यात आल्या. २० दिवसानंतर श्री. कुरेशी यांची पुनर्तपासणी करून अल्फा रुग्णालयातील वैद्यकीय तज्ज्ञांनी त्यांना डिस्चार्ज दिला. त्यानंतर पुढील १० दिवसाचे औषध विनामूल्य देण्यात आले. रुग्णालय ते भोई गल्लीतील घरी जाण्याचे भाडेही या योजनेंतर्गत रुग्णालयाने रोखीने दिले. श्री. कुरेशी यांची बायपास सर्जरी होऊन एक वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. जन आरोग्य योजनेमुळे श्री. कुरेशी व त्यांच्या कुटुंबीयांवर अचानकपणे ओढवलेले संकट दूर होऊन, त्यांच्या जीवनात आरोग्य प्रकाश आला. वयाच्या ५५ वर्षी झालेल्या बायपासनंतरच्या एक वर्षानंतर त्यांची तब्येत अगदी ठणठणीत आहे. या योजनेविषयी श्री. कुरेशी यांना बोलते केले असता ते म्हणाले की, 'शासनाची ही योजना नसती तर माझ्यासारख्या सर्वसामान्य व्यक्तीला खासगी रुग्णालयाचा अडीच ते तीन लाखांचा खर्च पेलवला नसता. या योजनेमुळे मी माझ्या कुटुंबीयांसोबत आनंदी व आरोग्यदायी जीवन जगत असून, ही योजना म्हणजे माझ्यासाठी जीवनदायी ठरली आहे.'



**महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून नवजीवन प्राप्त झालेले बाशीद गुलाम कुरेशी.**

**- सुनील सोनटक्के,**
जिल्हा माहिती अधिकारी, लातूर



**गोंदिया जिल्ह्यातील दिव्यांगांना सायकलींचे मोफत वाटप.**

# दिव्यांग शक्ती

**दिव्यांगत्वावर मात करून सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे जीवन जगणे सुलभ होईल व त्यांचा शैक्षणिक व आर्थिक विकास होईल, या उद्देशाने नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत गोंदिया जिल्ह्यात २ हजार ३१७ दिव्यांग बांधवांना कृत्रिम अवयव व साहित्य वाटप करण्यात आले.**

**गोंदिया जिल्हा**

मागील चार वर्षात केंद्र सरकारने देशभरात ७ हजार शिबिरे घेऊन १० लाख दिव्यांग व्यक्तींना विविध साहित्य वाटप केले. दिव्यांग बांधवाच्या विकासासाठी असलेला विविध योजनेतील निधी शासनाने तीन टक्क्यांवरून पाच टक्के केला. 'झिरो पेंडन्सी'अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना शंभर टक्के प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. गोंदिया जिल्ह्यात शासनाच्या वतीने विशेष मेळाव्याचे आयोजन करून ४०३६७ दिव्यांग व्यक्तींना साहित्य वाटप करण्यात आले. यात २८ मोटराईज्ड ट्रायसिकल, ६५८ ट्रायसिकल, ३४७ फोल्डिंग व्हील चेअर, २० सि.पी. चेअर, ९५४ बैसाखी, ४६३ वाकिंग स्टिक, ११ बेल किट, ९ ब्रेल केन, १०१ स्मार्ट केन, ५०० श्रवण यंत्र, ४४७ एमएसआयडी किट, ३६ रोलेटर, २५ एडीएल किट, १९ डेजी प्लेअर, ३५९ कृत्रिम अंग आदी साहित्याचा समावेश आहे. यासाठी समाजकल्याण विभागाच्या वतीने गोंदिया, अर्जुनी मोरगाव, आमगाव व सडक अर्जुनी या ठिकाणी विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात ६ हजार दिव्यांग बांधवांनी सहभाग घेतला. यातील २३१७ दिव्यांग व्यक्तींना १ कोटी ७२ लाख रुपये किमतीच्या साहित्याचे पहिल्या टप्प्यात वाटप करण्यात आले. या साहित्यात ४ हजारावर उपयोगी वस्तुंचा समावेश आहे. दिव्यांग व अव्यंग्य व्यक्तीने विवाह केल्यास त्यांना राज्य शासनाच्या वतीने ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. अशा ४१ लाभार्थ्यांना लाभाचे धनादेश या मेळाव्यात वाटप करण्यात आले. आंतरजातीय विवाह योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या ५० हजार रुपये अनुदानाचे अनेक लाभार्थ्यांना वाटप करून, त्यांना सक्षम बनवण्याच्या दिशेने शासनाने पाऊल टाकले आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, गोंदिया**



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88



मेळघाटातील आदिवासी मुलांच्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी.

# मेळघाटातील विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी

**धारणीचा एकात्मिक आदिवासी प्रकल्प आणि पुण्याची लिफ्ट फॉर अनलिफ्टमेंट ही स्वयंसेवी संस्था यांनी एकत्रितपणे बिजूधावडीच्या आदिवासी आश्रम शाळेत ऊलगुलान नावाचे वैद्यकीय प्रवेश परीक्षा प्रशिक्षण केंद्र स्थापन केले आहे. येथील विद्यार्थ्यांनी बारावीनंतर होणारी नीट परीक्षा उत्तीर्ण व्हावे आणि वैद्यकशाखेत प्रवेश मिळून ते डॉक्टर व्हावेत, असे या केंद्राचे उद्दिष्ट आहे.**

कुपोषण निर्मूलनासाठी शासनाने मेळघाटातील धारणी व चिखलदरा तालुक्यात उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र अशी यंत्रणा उभारली आहे. मात्र, वैद्यकीय अधिकारी या क्षेत्रात जाण्यास अनुत्सुक असतात, अशी तक्रार होत असते. त्यामुळे मेळघाटच्या लेकरांना डॉक्टर बनवण्याचे ध्येय घेऊन 'ऊलगुलान' येथे वैद्यकीय प्रवेश परीक्षा प्रशिक्षण केंद्र सुरू झाले आहे.

बिजूधावडी हे दुर्गम गाव धारणी मुख्यालयापासून दक्षिण-पूर्व दिशेला सुमारे २० किलोमीटर अंतरावर वसले आहे. राणीगाव, सुसर्दा, टेंबली, टेंब्रुसोडा व बिजूधावडी अशी ही पंचक्रोशी. या परिसरातील मुलांनी वैद्यकशाखेकडे जाऊन डॉक्टर होण्याची संकल्पना तत्कालीन प्रकल्प अधिकारी डॉ. विजय राठोड यांची. ही कल्पना 'लिफ्ट फॉर अनलिफ्टमेंट'च्या सहयोगाने तत्काळ अमलात आणली गेली आणि ही पाच गावे मिळून बिजूधावडी येथे शिक्षकदिनाच्या मुहूर्तावर ५ सप्टेंबर २०१७ रोजी वैद्यकीय प्रवेश परीक्षा शिक्षण केंद्राची आदिवासी आश्रम शाळेत स्थापना झाली.

**अमरावती जिल्हा**

मेळघाटात डॉक्टरांची वानवा ही बाब डॉ. राठोड यांना सतत अस्वस्थ करत होती. त्यामुळे तेथील आरोग्य सुविधांच्या अडचणींविषयी सखोल अभ्यास करून त्यांनी त्यावर हा उपाय शोधला. मेळघाटात आरोग्य सुविधेच्या अभावी बालमृत्यू, मातामृत्यू तसेच कुपोषणाची तक्रार असते. शासनाद्वारे डॉक्टरांची नियुक्ती या क्षेत्रात केल्यावर दोन-तीन वर्षातच येथील डॉक्टर बदली करून घेतात, अशी तक्रार असते. यावर कायमचा उपाय म्हणून जर याच क्षेत्रातील आदिवासी विद्यार्थी डॉक्टर झाले तर ते आपले गाव, परिसर व समाजाच्या आस्थेपोटी आपल्या परिसरातच अधिक सक्षमतेने काम करतील, या भावनेतून हा प्रकल्प आकारास आला.

एमबीबीएस आणि बीडीएसला प्रवेश मिळवण्यासाठी महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा (NEET) उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. सुरुवातीला या केंद्रामध्ये ४५ मुलांनी प्रशिक्षणासाठी पसंती दर्शवून अभ्यासक्रम, प्रशिक्षण घेतले. आणि सद्य:स्थितीत या वर्षी केंद्रात ४० मुले प्रशिक्षण घेत आहेत.

११ वी, १२ वी बोर्डाच्या परीक्षेला बसणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना पुण्याच्या लिफ्ट फॉर अनलिफ्टमेंट या संस्थेच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून विनामूल्य, कुठलेही मानधन न घेता शिकवले जात आहे. या विद्यार्थ्यांमधून किमान १० मुलेतरी डॉक्टर होतील आणि परिसरातील आदिवासी बांधवांची सेवा करतील, अशी भावना आश्रमशाळेचे मुख्याध्यापक पटेल यांनी व्यक्त केली. पुण्याहून वैद्यकशास्त्रातील तज्ज्ञ व अभ्यासक असे ३६ प्रशिक्षक येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी टप्प्याटप्प्याने नियमितपणे येत असतात.

'मेळघाटसारख्या आदिवासीबहुल क्षेत्रात काम करण्याची इच्छा होती. आदिवासी गरजू विद्यार्थ्यांना ज्यांना शहरात जाऊन मोठ्या शुल्काचे कोचिंग क्लासेस लावणे अशक्य आहे अशा विद्यार्थ्यांना डॉक्टर बनण्यासाठीच्या नीट परीक्षेचे प्रशिक्षण देण्याचे माझ्या संस्थेने ठरवले. मलासुद्धा यानिमित्ताने समाजाचे ऋण फेडण्याची संधी मिळाली. मी शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी बिजूधावडी या ठिकाणी येऊन विद्यार्थ्यांना शिकवितो, त्यांच्यातील परीक्षेची भीती घालवून आत्मविश्वास निर्माण करतो जेणेकरून यातले काही विद्यार्थी नीट परीक्षा उत्तीर्ण करून डॉक्टर होतील आणि या क्षेत्रात येऊन गोरगरीब आदिवासी बांधवांना आरोग्याच्या सेवा देतील,' असे प्रशिक्षण केंद्रात शिकवणाऱ्या डॉक्टर अमोल मुंडे यांनी सांगितले. दुसरे प्रशिक्षक डॉ. किरण शेवाळे यांनीही हीच भावना व्यक्त केली. केंद्रात प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तके व शैक्षणिक साहित्य धारणी प्रकल्प कार्यालयाद्वारे पुरवण्यात येतात. प्रशिक्षण घेण्यासाठी आजूबाजूच्या गावावरून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वर्गखोल्या, साहित्य तसेच त्यांच्या जेवणाची, निवासाची, जाण्या-येण्याची सोय, संपूर्ण सुविधा आश्रमशाळेमार्फत केली जाते. यासाठी त्यांना प्रकल्प कार्यालयाकडून निधी पुरवला जातो. बाहेरगावाहून येणाऱ्या तज्ज्ञ मार्गदर्शकांची भोजन, निवासाची सोय स्वयंसेवी संस्थेद्वारे करण्यात येते.

**– विजय राऊत,** माहिती सहायक, अमरावती.
संपर्क: ०९९७५४१२८२०



**अनील मालापाती**
(विशाल इंजिनिअरिंगचे मालक)

# मी मालक गॅरेजचा...

**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कर्ज योजनेचा लाभ घेऊन गॅरेजचा मालक झालेल्या अनील मालापातीची प्रेरणादायी यशकथा..**

चंद्रपूर जिल्हा

'कधीकाळी येणाऱ्या गाड्या दुरुस्त करण्यासाठी स्वतःची हक्काची जागा नसल्याचा त्रागा कायम असायचा. हातात हुन्नर आहे. पण जागा नाही. स्वतःचे मोठे गॅरेज नाही. याची कायम खंत राहत होती. अनेकांकडे हातउसने पैसे मागितले. पण १०-२० हजारांच्यावर कोणीही सक्रियपणे मदत करायला तयार नव्हते. अनेक वेळा असं वाटत होतं की आपल्यासाठी सरकारने कोणतीच स्कीम बनवलेली नाही. कोणतीच योजना नाही. एक दिवस एका सुज्ञ ग्राहकांकडे मनातली ही खंत व्यक्त केली. तो ग्राहक माझ्यावर कायम खूश असायचा तो म्हणाला....

'समजा तुला मी दहा लाख रुपये बिनव्याजी दिले तर..? तू नियमित परतफेड करशील काय?' त्यांनी मला प्रश्न विचारला. मी म्हणालो, 'बिनव्याजी दहा लाख रुपये देणार ! मग नक्की नियमित परतफेड करेल.'

ग्राहक म्हणाला, 'होय, बिनव्याजी दहा लाख रुपये देईल. मात्र तुला नियमितपणे कर्जफेड करावी लागेल.' त्याने ही गोष्ट सांगितली. आणि तो निघून गेला. मलाही वाटलं की, ग्राहक आपल्या कामापुरतं बोलतो आहे. यातून काहीच निष्पन्न होणार नाही. मात्र, त्या ग्राहकाने मला दुसऱ्या दिवशी स्वतःच्या गाडीमध्ये बसवून 'अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अर्ज उपलब्ध करणाऱ्या जिल्हा कौशल्य विकास व स्वयंरोजगार केंद्रात नेले. त्या ठिकाणी मला या योजनेबद्दल माहिती सांगितली. ग्राहक स्वतःच्या खिशातून नाही तर महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या 'अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या' योजनेतून मला दहा लाखाचे कर्ज उपलब्ध करून देणार होता.

मला कुठून का होईना गॅरेज निर्मिती होत असल्याचा आनंद होता. नव्या गॅरेजचे स्वप्न पूर्ण होत असल्याचे समाधान होते. प्रामाणिकपणे परतफेड करण्याची तुमची कुवत असल्यास अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ माझ्यासारख्या सुशिक्षित बेरोजगार माणसाला आपला नवा व्यवसाय सुरू करण्यासाठी, सुरू असलेला व्यवसाय वाढवण्यासाठी मदत करायला तयार आहे. चंद्रपूरसारख्या ठिकाणी एका अद्ययावत गॅरेजचा मी आता मालक झाल्याचा मला आनंद आहे.'

**जिल्हा माहिती कार्यालय, चंद्रपूर.**



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88



# कौशल्यातून उन्नती

### कौशल्य प्रशिक्षण योजनेने दिली नवी दिशा..

परभणीच्या साईकॉर्नर भागात राहणाऱ्या रईस सलिम हुसेन या तरुणाने बीकॉम व एम.कॉमचे शिक्षण पूर्ण करूनही त्याला रोजगार मिळत नव्हता. २०१७ मध्ये एम.कॉम पूर्ण होण्यापूर्वी बी.कॉमच्या शिक्षणावर अनेक ठिकाणी नोकरी व रोजगारासाठी प्रयत्न केले परंतु यश हाती येत नव्हते. घरची परिस्थिती खूप हलाखीची होती. वडिलांचा सायकल पंक्चर काढण्याचा लहानसा व्यवसाय होता. रईस मात्र या कामात रस घेत नव्हता. पदवी शिक्षण घेईपर्यंत त्याने चष्म्याच्या दुकानात काम करत आपली आर्थिक बाजू सांभाळली. उच्च शिक्षणासाठी मात्र त्याला आर्थिक भार सोसवेना, म्हणून घराजवळच असलेल्या कौशल्य विकास योजनेचा त्याने लाभ घेतला. त्याअंतर्गत मान्यताप्राप्त ॲस्पायर टेक्निकल इन्स्टिट्यूट या संस्थेमध्ये 'बिझनेस करस्पॉडन्ट'च्या प्रशिक्षण अभ्यासक्रमास प्रवेश घेतला. सहा महिन्यांच्या प्रशिक्षणामुळे संस्थेने त्याला रोजगारासाठी परभणी शहरातलया ॲक्सिस बँकेकडे पाठवले. बँकेने घेतलेल्या मुलाखतीमध्ये तो निवडला गेला. त्याला परभणीतच ॲक्सिस बँकेच्या शाखेत बिझनेस डेव्हलपमेंट एक्झिक्युटिव्ह या पदावर दरमहा १२ हजार रुपयांची नोकरी मिळाली. त्याच्या कौशल्य विकासामुळे आणि कामाच्या दर्जामुळे बँकेने सहा महिन्यातच त्याला पदोन्नती देऊन 'सेल्स ऑफिसर' या पदावर नियुक्ती दिली. आता त्याला दरमहा १५,५००/– रुपये वेतन आणि कामाप्रमाणे इतर भत्ते व मोबदला दिला जात आहे. आपल्या बिकट आर्थिक परिस्थितीतून कुटुंबाला सावरण्यासाठी शासनाने दिलेल्या प्रशिक्षणाच्या जोरावर साधलेली प्रगती त्याला कृपादृष्टीसारखीच वाटते.



रईस सलिम हुसेन

बँकिंग व्यवहारात कुशल ठरत चाललेल्या रईसला इतर बँकांकडूनही चांगल्या ऑफर मिळत असल्या तरी तो आपल्या या कामात समाधानी आहे. आपली आर्थिक सक्षमता वाढवण्यावर भर देत आहे. कौशल्य विकास योजनांच्या माध्यमातून युवक–युवतींनी कौशल्य प्राप्त करून घेऊन रोजगाराची कास धरावी, असा संदेश बेरोजगार मित्रांना त्याने दिला आहे.

परभणी जिल्हा

**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ घेऊन सुरेश शेळके यांनी व्यवसाय भरारी घेतली.**



# दुग्ध भरारी

परभणी शहरापासून सुमारे ८ कि.मी. अंतरावर असलेल्या तरोडा नावाच्या खेड्यातील सुरेश काशिनाथ शेळके या तरुणाची यशोगाथा प्रेरणादायी आहे. आर्थिक परिस्थिती बेताची असताना बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण केलेल्या सुरेशला स्वत:चा व्यवसाय सुरू करून स्वावलंबी होण्याचा व आपल्या कुटुंबाला आधार देण्याचा संकल्प स्वस्थ बसू देत नव्हता. एके दिवशी त्याला एका मित्राकडून अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कर्ज व्याज परतावा योजनेची माहिती मिळाली आणि त्याच्या स्वावलंबी होण्याच्या प्रयत्नांना सुरुवात झाली.

सुरेशने परभणी शहरातील जिल्हा कौशल्य विकास व रोजगार मार्गदर्शन केंद्रातील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कार्यालयास आपल्या बंधूसमवेत भेट देऊन योजनेची संपूर्ण माहिती घेतली आणि महाराष्ट्र ग्रामीण बँकेत जाऊनही चौकशी केली. या दोन्ही संस्थाकडून मिळालेल्या मार्गदर्शनाच्या आधारे त्याने तरोडा गावात दुग्धव्यवसाय करण्यासाठीचा बँकेत प्रस्ताव सादर केला. प्रकल्प अहवाल, सातबारा उतारा, यासह इतर कागदपत्रे परिपूर्णपणे जोडून पाठपुरावा केला. या महामंडळाच्या योजनेचे ऑनलाइन सशर्त प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन प्रस्तावास जोडले. यामुळे त्याला बँकेने दुग्ध व्यवसाय सुरू करण्यासाठी ३ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले. बँकेने दोन टप्प्यात कर्ज दिले. पहिल्यांदा सुरेशने पाच चांगल्या म्हशींची खरेदी



सुरेश काशिनाथ शेळके

केली. जेव्हा त्याला ते दीड लाख रुपये मिळाले त्यानंतर म्हशींचा गोठा, शेड इत्यादी सुविधा निर्माण केल्यावर दीड लाख असे एकूण तीन लाख रुपये कर्ज मिळाले. सुरेशला चार भाऊ असून आईवडील आणि तीन भाऊ मिळून शेती व्यवसाय करत असतात. एक भाऊ शिक्षक म्हणून कामाला आहे. दुग्ध व्यवसायात त्याला तिन्ही भावांची साथ मिळाली असून घरची मेहनत आणि योजनेची साथ मिळाल्याने दुग्ध व्यवसाय जोर धरू लागला आहे. कुटुंबाकडे असलेल्या २० एकर शेतीमध्ये पशूंसाठीचा ताजा चारा उत्पादित केला जात असल्यामुळे व इतर पिकांचे उत्पादनही घेतले जात असल्यामुळे आर्थिक मदत होत गेली.

बँकेने मंजूर केलेल्या ३ लाख रुपये कर्जाच्या १२ टक्के दरमहा व्याजाची परतफेड शासनाच्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून केली जात असून, दरमहा मुद्दलाची रक्कम ८ हजार रुपये सुरेशकडून आणि महामंडळाकडून दरमहा व्याजाची रक्कम कर्ज खात्यावर जमा होत आहे. कर्जाच्या व्याजाची रक्कम सुरेशला भरावी लागत नसल्याने तो पूर्णत: मुद्दल परतफेड करण्यावर भर देत आहे. ३ लाख रुपये कर्जातून उभ्या केलेल्या दुग्ध व्यवसायातून ५ म्हशींपासून सुमारे ५० लीटर दूध दररोज मिळते. हे दूध तो आणि त्याच्या बंधूमार्फत परभणी शहरातील घरोघरी विकून जवळपास दरमहा १० ते १५ हजार रुपयांचा निव्वळ फायदा मिळवत आहे. यामुळे त्या कुटुंबाची प्रगती होत असून आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत आहे.

**- अनिल आलुरकर,**
जिल्हा माहिती अधिकारी, परभणी.



**मुद्रा बँक योजनेचा लाभ घेऊन कोल्हापूरच्या भोसले बंधूंनी सुरू केलेले जेंट्स पार्लर.**

# नवा चेहरा, नवी मुद्रा...

**मुद्रा योजनेचा लाभ घेऊन कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातील निवडे-साळवण येथील अमित आणि किरण भोसले या तरुणांनी परंपरागत केश कर्तनालय व्यवसायाला न्यू लूक दिला आहे.**

कोल्हापूर जिल्हा

उच्चशिक्षित असलेल्या भोसले बंधूंनी वडिलांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या केशकर्तनालयातून व्यवसायाला सुरुवात केली. अमित दामोदर भोसले यांचे एम.ए. तर किरण नामदेव भोसले यांचे बी.ए.पर्यंत शिक्षण झाले आहे. गावातच सुरू असलेल्या केशकर्तनालयात प्रारंभिक शिक्षण घेऊन, अमित यांनी प्रगत शिक्षणासाठी अहमदनगर येथील आंतरराष्ट्रीय हेअर स्टायलिस्ट सागर आवटी ॲकॅडमीत आपले प्रगत (ॲडव्हान्स) शिक्षण पूर्ण केले. आजच्या तरुणाईला हव्या असणाऱ्या हेअर स्टाईल्सचा पूर्ण अभ्यास करून अमित भोसले यांनी गावातील केश कर्तनालयास प्रोफेशनल लूक देण्याचा निर्धार केला अन त्यांच्या मदतील शासनाची मुद्रा बँक योजना धावून आली.

या मुद्रा योजनेतून विनातारण आणि विनाजामीन कर्ज उपलब्ध होत असल्याने, भोसले बंधूंनी नोव्हेंबर २०१७ मध्ये बँक ऑफ इंडियाच्या साळवण शाखेकडे ६ लाख ७० हजाराच्या कर्ज प्रकरणासाठी अर्ज केला. यामध्ये ५ लाखाचे बँक कर्ज तर १ लाख ७० हजाराच्या स्वभांडवलाचा समावेश होता. बँकेच्या प्रचलित पद्धतीनुसार पुढील कार्यवाही होऊन भोसले बंधूंना या योजनेतून कर्ज प्रकरण मंजूर करण्यात आले. एप्रिल २०१८ भोसले बंधूंनी जुन्या पद्धतीच्या केशकर्तनालयाचे अत्याधुनिक पद्धतीने नूतनीकरण केले. या केशकर्तनालयाचे नाव मे. ओम जेंटस पार्लर असे त्यांनी ठेवले. यासाठी ८ x २० फूट आकाराच्या दुकानाचे पीओपीसह अन्य बाबी आकर्षक बनवल्या. ४ अद्ययावत खुर्च्या, आरसे तसेच सर्व आवश्यक साहित्य विकत आणले. या पार्लरला न्यू ल्यूक दिल्याने साळवणसह कोरे, वेतवडे, तिसंगी, गगनबावडा, आमळग अशा गावांतील तरुणांचा ओढा या पार्लरकडे वाढला आहे. तरुणांना हव्या असणाऱ्या हेअर स्टाईलस या पार्लरमध्ये उपलब्ध करून दिल्याने पंचक्रोशीतील तरुणांचे हे पार्लर नवे आकर्षण बनले आहे. या पार्लरच्या माध्यमातून भोसले बंधूंनी ग्राहकांना ब्लिचिंग, फेशिअल, कलरिंग, स्पा, स्टिम, अशा कितीतरी प्रकारच्या अत्याधुनिक पद्धतीच्या सुविधा साळवणमध्ये उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे पूर्वीपेक्षा ५० टक्क्यांनी व्यवसाय वाढला आहे. दररोज जवळपास अडीच ते तीन हजाराचा व्यवसाय होतो.

**जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर.**



join us » » https://t.me/Mpscrockers88

# स्वयंरोजगाराचा आनंद...

प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा लाभ घेऊन प्रगतीकडे वाटचाल करणाऱ्या अनेक लाभार्थ्यांपैकी एक म्हणजे सांगलीच्या सविता अनिल जप्तीवाले. त्यांच्या वर्षानुवर्षांच्या घरगुती, छोट्या प्रमाणात असलेल्या केटरिंग व्यवसायाला दोन वर्षांपूर्वी मुद्रा योजनेचा हातभार लागला. त्यातून त्यांच्या व्यवसायाला गती मिळाली आहे.

याबाबत सविता जप्तीवाले यांनी सांगितले, 'जवळपास २० वर्षे मी छोट्या प्रमाणात विद्यार्थ्यांना मेसचे डबे पुरवले. मात्र, २०१४ साली मला पी.एन.जी. या सराफा दुकानातील १६० जणांना नाश्ता पुरवता का? असे कुणीतरी सुचविले. मी त्यांना भेटले. माझ्या हातच्या पदार्थांची चव त्यांना आवडली. त्यामुळे पी.एन.जी.कडून होकार मिळाला. सकाळचा नाश्ता पुरवण्यासाठी मोठ्या प्रमाणात साधनसामग्री नव्हती. त्यामुळे खूप वेळ खर्ची होत असे. गरज ही शोधाची जननी आहे, असे म्हणतात. त्यामुळे मी आवश्यक गोष्टी घेण्यासाठी पैशाची जुळणी करायचा विचार करत होते. त्यावेळी बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये माहिती घेण्यासाठी गेल्यानंतर तेथील अधिकाऱ्यांनी मला प्रधानमंत्री मुद्रा योजनेची माहिती दिली. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर एक लाख रुपयांचे कर्जही मंजूर केले. या रकमेतून व्यवसायासाठी आवश्यक फूड प्रोसेसर, ग्राईंडर, गॅस शेगड्या, मोठी भांडी घेतली. मोठ्या प्रमाणात पदार्थ बनवताना कांदा चिरणे, भाज्या चिरणे अशा कामांसाठी खूप वेळ जायचा. फूड प्रोसेसरमुळे या वेळेची बचत झाली. शिवाय आज माझ्याकडे ३ महिलाही मदतीसाठी आहेत.' श्रीमती जप्तीवाले यांना या महिलांना रोजगार दिल्याचे समाधान आहे.



सविता अनिल जप्तीवाले

श्रीमती जप्तीवाले पी.एन.जी. सराफा दुकानात पोहे, उपीट, शिरा या नेहमीच्या पदार्थांबरोबरच पावभाजी, कुर्मा पुरी, मिसळ-पाव, भेळ, दाबेली, बटाटे वडे, दही वडे, उडीद वडे, पराठे, इडली असे विविध प्रकारचे पदार्थ पुरवतात.

**– वर्षा पाटोळे,** जिल्हा माहिती अधिकारी, सांगली.

# संकल्प आणि सिद्धी



सिद्धाई महिला बचतगट

सांगली जिल्ह्यातील संजयनगर येथील सिद्धाई महिला बचतगटाने बांबूपासून विविध वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण घेतले. या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर निर्मिती व विक्री करण्यासाठी मुद्रा बँक योजनेतून अर्थसाहाय्य मिळवले. त्यामुळे हा बचतगट आता आकाश कंदील, वॉल पिस, मेकअप बॉक्स, फ्लॉवर पॉट यासारख्या अनेक वस्तू बनवतो. या वस्तू घरीच बनवत असल्यामुळे जागेसाठी भाडे द्यावे लागत नाही. बांबूपासून बनवलेल्या या वस्तू पुणे, मुंबई, मद्रास व दिल्ली या शहरांमध्ये विकल्या जातात. व्यवसायवृद्धीसाठी प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेंतर्गत आणखी कर्ज घेण्याचे या बचतगटाने ठरवले आहे. यामुळे जास्त उत्पादन होऊन बचतगटातील महिलांना जास्तीत जास्त फायदा होईल. स्वतःचा कारखाना उभारण्याचा संकल्पसुद्धा या बचतगटाने केला असल्याचे या बचतगटाच्या प्रमुख दीपज्योती शिवराज काटकर यांनी सांगितले.

गोमटेशनगर कुपवाडच्या गृहलक्ष्मी महिला बचत गटामध्ये २५ ते ३० महिला आहेत. १० ते १२ वर्षांपासून हा बचतगट सुरू आहे. राजगिरा

लाडू, चिक्की, वडी असे पदार्थ बनविण्यात या बचतगटाची खासियत आहे. या बचत गटाच्या माध्यमातून दररोज १० हजार लाडू बनवले जातात. ५ हजार पाकिटे तयार केली जातात. चार ते पाच जिल्ह्यामध्ये हा माल जातो. डीमार्ट, मोठे मॉल यामध्येही या पदार्थांनी जागा मिळवली आहे. याबाबत बचतगट प्रमुख कस्तुरी सुधीर माळी यांनी सांगितले, 'सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आम्ही काम करतो. शाळेमध्येही माल जातो. सध्या आम्ही हँडमशिनद्वारे माल बनवतो. त्यामुळे थोडा थोडा माल बनतो. जास्त माल बनवण्यासाठी यंत्रसामग्रीची आवश्यकता आहे. रोज ३० हजार रुपयांचे लाडू बनवतो. यामधून रोज अडीच ते तीन हजार रुपये लाभ मिळतो. व्यवसाय वाढवण्यासाठी यंत्रसामग्री खरेदी करणार आहोत. यासाठी ७ लाख रुपयांचे कर्ज बँक ऑफ महाराष्ट्रकडून मंजूर झाले आहे. यंत्रसामग्री बसवल्यानंतर आणखी जास्त महिलांना रोजगार मिळेल.'

वानलेसवाडीचा पंचरत्न महिला बचतगट साडी व ड्रेस मटेरियल, शर्ट व पॅन्ट पिस, टॉवेल, टोपी, छत्री, रेनकोट विक्रीचा व्यवसाय करतो. याबाबत बचतगट प्रमुख सुनिता रावत म्हणाल्या, 'आम्ही बँक ऑफ महाराष्ट्रकडून प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेतून ५० हजार रुपयांचे कर्ज घेतले आहे. सुरतवरून कपडे खरेदी केली जाते. त्यातून महिना ४० ते ५० हजार रुपयांचा व्यवसाय होतो. त्यामुळे घरच्या उत्पनात हातभार लागतो. इतर महिलांनाही या व्यवसायातून फायदा होतो. विवाह, वास्तुशांती अशा विविध कार्यक्रमामध्ये आम्ही मागणीप्रमाणे माल पोहोचवतो. व्यवसाय वाढवण्यासाठी व जागा घेण्यासाठी प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेंतर्गत आणखी कर्ज घेणार आहोत.'

सांगली जिल्हा

**जिल्हा माहिती कार्यालय, सांगली.**

# कर्ज मिळाले, व्यवसाय वाढला...

सांगलीच्या स्टेशन रोडवरील राजाराम बिल्डिंगमध्ये न्यू शाम सेल्स कार्पोरेशन या दुकानाचे शफीउल्ला सय्यद मालक आहेत. बारावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे ठरवले. पुढील शिक्षणाचा पर्याय बाजूला ठेवत त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स दुकानात नोकरी केली. चार वर्षांचा अनुभव गाठीशी आल्यानंतर त्यांनी स्वतःचे दुकान सुरू करण्याचे ठरवले. त्यातून भाडेतत्त्वावर त्यांनी स्वतःचे इलेक्ट्रॉनिक्स दुकान सुरू केले.

याबाबत शफीउल्ला सांगतात, 'मी २००६ साली स्वतःचे इलेक्ट्रॉनिक्सचे दुकान सुरू केले. मात्र, त्या वेळी माझ्याकडे कोणतेही भागभांडवल नव्हते. त्यामुळे उधारीवर माल विकत घेणे, त्याची विक्री झाल्यानंतरच पुढील माल भरणे, अशी कसरत सुरू होती. उधारीवर माल घेत असल्याने समोरील दुकानदारही मर्यादित स्वरूपात माल देत असे. त्याचे देणे देऊन दोन पैसे मिळवायचे होते, त्यामुळे गिऱ्हाईकांना मला फारशी सूट



**शफीउल्ला सय्यद**

देता येत नव्हती. घरी आई, वडील, भाऊ, बहीण होते. लग्नानंतर पत्नी व मुलाच्या जन्मानंतर जबाबदारी वाढली.

या परिस्थितीवर मात करण्यासाठी कर्ज घेऊन व्यवसायासाठी भागभांडवल तयार करण्यासाठी शफीउल्ला विचार करत होते. मात्र, बँकांमध्ये तारण ठेवायला त्यांच्याकडे काहीच नव्हते. त्यामुळे अडचणीत भर पडत होती. ही अडचण मुद्रा बँक योजनेने सोडवली. आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर युनियन बँकेने १० लाख रुपयांचे कर्जही दिले. त्यामुळे दुकानात आता ए. सी. फ्रीज, वॉशिंग मशिन, टीव्ही, मायक्रोव्हेव ओव्हन अशा वस्तू ठेवणे शक्य झाले आहे. उधारीवर माल घेत नसल्यामुळे रोखीतून बचतीत वाढ झाली. शेजारच्या इमारतीतील एक गाळाही घेऊन वस्तूंची संख्या वाढवली.'

आता शफीउल्ला सय्यद यांच्या नफ्यात ही वाढ झाली आहे. ते मुलाला चांगल्या शाळेत शिक्षण देऊ शकत आहेत व त्यांचे राहणीमानही उंचावले आहे.

**– संप्रदा बीडकर,**
माहिती अधिकारी, सांगली.



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88



सुनील गुंडे, सचिन ढोणे

# ऊर्जेचे यश

वर्धा जिल्हा

वर्धा जिल्ह्यातील केळझर आणि हमदापूर येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेले सुनील गुंडे आणि सचिन ढोणे हे तरुण उद्योजक विद्युत अभियांत्रिकीची पदविका घेतल्यानंतर पुणे आणि नंतर नागपूर येथे चांगल्या पगाराची नोकरी सुरू असतानाच सुनील गुंडे यांच्या डोक्यात स्वतः चा व्यवसाय करण्याचे मनसुबे सुरू होते. दुसऱ्यांसाठी काम करण्यापेक्षा बुद्धी आणि श्रम स्वतःच्या विकासासाठी वापरल्यास आपण अधिक यशस्वी होऊ शकतो, असा त्यांचा ठाम विश्वास होता. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी नोकरी सोडली. सचिन ढोणे या आपल्या मित्राला सोबत घेऊन एस एस फ्युचर एनर्जी ट्रेडिंग कंपनी २०१५ मध्ये सुरू केली. चांगल्या पगाराची नोकरी सोडल्यामुळे दोघांच्याही घरचे त्यांच्यावर नाराज होते. त्यामुळे घरून आर्थिक पाठिंब्याचा विचारही त्यांनी केला नाही. स्वतः जमवलेले पैसे थोडे-थोडे वापरत त्यांनी काम सुरू केले. मिळेल ते काम स्वीकारले. लहान, मोठे याचा विचार केला नाही.

२०१७ मध्ये केळझर येथील बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये या दोन मित्रांनी प्रधानमंत्री मुद्रा योजनेमधून कर्ज मिळण्यासाठी अर्ज केला. उद्योगाचा व्यवस्थित प्रस्ताव तयार करून दिला. त्यांची बांधिलकी पाहून बँकेने ३ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले. त्यानंतर लगेच वन विभागाचे सौर पथदिवे बसवण्याचे काम त्यांना मिळाले. मिळालेले कर्ज आणि कामामुळे त्यांच्या व्यवसायाला गती मिळाली. त्यानंतर या दोघांनी मागे वळून बघितले नाही.

नॅशनल कोलॅटरल मॅनेजमेंट लिमिटेड या कंपनीचे ४० लाखांचे मोठे काम त्यांना मिळाले. हे काम त्यांनी आंध्रप्रदेश आणि उत्तर प्रदेश मध्ये जाऊन पूर्ण केले.. कामातील तत्परता, त्याविषयीची बांधिलकी, श्रम करण्याची तयारी आणि तत्पर सेवा या व्यावसायिक गुणांमुळे त्यांच्या कंपनीला मोठे काम मिळत गेले. आज त्यांची कंपनी केवळ महाराष्ट्रच नव्हे तर उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, गोवा, मध्य प्रदेश, गुजरात या राज्यातही सोलर पॅनल बसवण्याचे काम करते. डिसेंबर २०१७ मध्ये त्यांनी कंपनीचे ऑफिस वर्धेत सुरू केले, तेव्हा पहिल्यांदा कुटुंबीयांनी त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. आज कंपनीची उलाढाल १ कोटीपर्यंत पोहोचली आहे. शिवाय ३ वर्षातच कंपनीला आय. एस.ओ. मानांकनसुद्धा मिळाले आहे. आज या दोन मित्रांच्या कंपनीत २ विद्युत अभियंते, ५ तांत्रिक साहाय्यक, आणि कार्यक्षेत्रातील मदतनीस असे १० कर्मचारी काम करतात.

**जिल्हा माहिती कार्यालय, वर्धा.**



शंकर खोडके

# स्थैर्य मिळाले...

वाशिम जिल्हा

शंकर खोडके... व्यवसाय केस कापण्याचा. पिढीजात व्यवसाय करणारे आज आपल्या व्यवसायापासून दूर जात असताना शंकरने हा व्यवसाय ऊन, वारा आणि पावसाची तमा न बाळगता सुरूच ठेवला तो वाशिम तालुक्यातील पार्डी टकमोर या आपल्या गावापासून ४ किलोमीटर अंतर असलेल्या तांदळी या गावात. कधी पायीपायी तर कधी सायकलने दररोज व्यवसायासाठी तांदळी गाठावी लागायची. घरी ३ मुले मोठे होत असताना त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न शंकरला पडायचा. आपण स्थिर होऊन हा व्यवसाय केला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात येत असायचा. एकदा गावातील विदर्भ कोकण ग्रामीण बँकेत शंकर गेला असता प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेची माहिती बँकेच्या व्यवस्थापकांनी त्याला दिली. या बँकेने शिशू गटातून सप्टेंबर २०१७ मध्ये २५ हजार रुपये कर्ज उपलब्ध करून दिले. यामधून ग्रामपंचायतीजवळ असलेल्या सरकारी जागेवर; केश कर्तनालय थाटण्यासाठी फर्निचर, खुर्च्या, आरसे, कैच्या, दाढी व कटिंगसाठी लागणारे साहित्य, पावडर, टॉवेल व अन्य साहित्य त्यांनी खरेदी केले. केस कापण्याचा पिढीजात व्यवसाय गावात सुरू करण्यासाठी मुद्रा योजनेचा शंकरला आधार झाला. सध्या शंकरकडे गावातील ग्राहक दाढी, केस कटिंग करण्यासाठी तर येतातच शेजारच्या तांदळी, बिटोडा, जांभरुण, पांडव उमरा, जुनोना येथील ग्राहक सुद्धा येतात. दर शुक्रवारी गावात आठवडे बाजार भरत असल्यामुळे ग्राहकांची दुकानात गर्दी असते. दररोज ३५० ते ४०० रुपये नफा या व्यवसायातून मिळत आहे. हा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेतून घेतलेल्या कर्जाची परतफेड शंकर नियमितपणे करीत आहे.

**जिल्हा माहिती अधिकारी, वाशिम.**

**कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींना विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.**

# आत्मविश्वास मिळाला...



## स्वावलंबी झाले - कीर्तिका वानखेडे

सामान्य गृहिणी असलेल्या पण स्वावलंबी होण्याची जिद्द असलेल्या कीर्तिका वानखेडे सांगतात, 'माझे शिक्षण बारावीपर्यंत झाले असल्याने घर व मुलींची जबाबदारी होती. पतीचे जेमतेम उत्पन्न असल्यामुळे मुलांच्या शाळेचा खर्च, घरखर्च यांचा ताळमेळ घालणे शक्य होत नव्हते. एकदा माहितीपत्रकातून मला शासनाच्या मोफत ब्युटीशिअन कोर्सची माहिती मिळाली. मी मणिलाल नानावटी व्हॅकेशनल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमध्ये त्याविषयी पूर्ण माहिती मिळाली. तेथे मला प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेंतर्गत संस्थेत सुरू होणाऱ्या 'इंटीग्रेटेड कोर्स इन स्किन हेअर ॲण्ड मेकअप या कोर्सविषयी सविस्तर माहिती दिली आणि मला माझ्या रोजगाराची संधी कशी मिळू शकेल, हेही सांगण्यात आले. माझ्या आशा पल्लवित झाल्या. मी घरच्या जबाबदाऱ्या सांभाळून हा कोर्स करण्याचा निश्चय केला. तो करताना शिक्षणामध्ये पडलेल्या जास्त अंतरामुळे व शिकवण्यात येणारे विषय नवीन असल्याने अभ्यास आणि प्रात्यक्षिके करणे अवघड वाटू लागले. त्यामुळे आत्मविश्वास कमी होऊ लागला. आमच्या प्रशिक्षिका सुनिता जावळेकर यांच्या लक्षात ही बाब आली. त्यांनी माझ्यासारख्या गृहिणीवर जास्त लक्ष केंद्रित केले. आम्हाला सोप्या भाषेत प्रात्यक्षिके आत्मविश्वासाने कसे करायचे, ते सांगितले. संस्थेच्या संचालिका शोभा सुपेकर यांनी आम्हाला शिकवण्यात येणाऱ्या ब्युटी थेरपी आत्मविश्वासाने ग्राहकांवर कशा कराव्यात ते सांगितले. या सर्वांचा चांगला परिणाम माझ्यावर झाला. संस्थेने पुण्यातील अनेक नामांकित पार्लरच्या प्रवर्तकांना बोलावून नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या. त्यामधून मला डिव्हाईन पार्लरमध्ये ५ हजार रुपयांची नोकरी मिळाली. प्रशिक्षणामुळे अवघ्या ९ ते १० महिन्यातच स्वावलंबी झाले आणि स्वत:च्या संसाराला काही प्रमाणात आर्थिक हातभार लावू शकले.'

पुणे जिल्हा

## स्वत:ची वेगळी ओळख

याच संस्थेत हर्षदा परेश सुतार यांनी प्रवेश घेतला. येथे त्यांनी 'इंटिग्रेटेड कोर्स इनस्किन, हेअर ॲण्ड मेकअप' हा अभ्यासक्रम केला. त्यामध्ये स्वत:चा व्यवसाय कसा सुरू करावा व समाजात स्वत:ची वेगळी ओळख, कशी निर्माण करावी, याबद्दल मार्गदर्शन मिळाले. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर त्यांना घराजवळील तृप्ती ब्युटी पार्लरमध्ये ६ हजार रुपये पगाराची नोकरी मिळाली. काही दिवसांच्या नोकरीच्या अनुभवानंतर त्या स्वत:च्या पार्लरचा व्यवसाय सुरू करणार आहेत.





**अमृता सुरज काळे** या चंद्रांगण फेज ७, सर्व्हे नं. १५, आंबेगाव पठार येथे राहतात. तेथेच त्यांना मैत्रिणींकडून 'प्रमोद महाजन कौशल्य उद्योजकता विकास अभियान' याविषयी माहिती मिळाली. 'संकल्प एज्युकेशन सोसायटी' या संस्थेमार्फत हे कोर्सेस मोफत घेतले जातात हे समजले. तेथेच ब्युटी पार्लर या कोर्ससाठी त्यांनी नावनोंदणी केली. श्रीमती काळे सांगतात, 'ब्युटी पार्लरचा कोर्स केल्यावर माझा आत्मविश्वास वाढला. मी स्वत:च्या पायावर उभे राहून कुटुंबीयासाठी आर्थिक मदत करू शकेन, असे मनापासून वाटले. प्रशिक्षण आणि त्यातून मिळालेला आत्मविश्वास या बळावर मी माझे स्वत:चे 'सखी ब्युटी पार्लर' सुरू केले आहे. त्यातून पार्लरच्या सुविधा पुरवते. ब्युटी पार्लर या व्यवसायातून महिन्याला ७००० ते ८००० रुपये प्रतिमहिना कमवू शकते.

## नोकरीची संधी

याच संस्थेत इयत्ता दहावीपर्यंत शिक्षण झालेल्या स्नेहल दिलीप रसाळ यांनी इंटिग्रेटेड कोर्स इन स्कीन ॲण्ड हेअर, मेकअपचा अभ्यासक्रम केला. त्यानंतर लगेच यामी ब्युटी पार्लरमध्ये ८,००० रुपये पगाराची नोकरी त्यांना मिळाली.

**- राजेंद्र सरग,**
जिल्हा माहिती अधिकारी, पुणे.
संपर्क: ०९४२३२४५४५६



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88

नांदेड जिल्हा

**उच्च तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी कर्ण क्षीरसागर याला डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनेने मोठा दिलासा दिला.**

# दिलासा मिळाला...

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्यावतीने ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आहेत, अशा विद्यार्थ्यांना शासनाने निश्चित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना मोलाची ठरत आहे. या योजनेत शासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतनमध्ये शासनाने निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता दिला जातो. या योजनेमुळे उच्च शिक्षणातील आर्थिक अडचण दूर झाल्याचा आनंद नांदेडच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये शिकणारा कर्ण क्षीरसागर या विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर दिसून आला.


कर्ण क्षीरसागर

नांदेड तालुक्यातील बोरगाव (तेलंग) या गावातील कर्ण क्षीरसागर हा शासकीय तंत्रनिकेन नांदेड येथे स्थापत्य अभियांत्रिकी पदविकेच्या तिसऱ्या वर्षात शिकणारा सामान्य परिस्थितीतला विद्यार्थी.

वडील संभाजी क्षीरसागर अल्पभूधारक शेतकरी असून आई पार्वतीबाई या गृहिणी आहेत. दोन मोठे भाऊ असून नांदेड येथे एक भाऊ दत्तात्रय हा स्पर्धा परीक्षेची तयारी करतो तर दुसरा जेजेराम हा पेंटिंगचे काम करतो. कर्णने गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत पहिली ते सातवीचे शिक्षण पूर्ण केले. आठवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषद हायस्कूल वाघी येथे घेतले. त्यानंतर आईवडिलांची इच्छा होती की, कर्णने उच्च शिक्षण घ्यावे. त्यानुसार शालेय शिक्षण घेतानाच कर्णने स्थापत्य अभियंता होण्याचे ठरवले. घरच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून अभियंता होण्यासाठी अकरावी, बारावी न करता पदविकेचा मार्ग निवडून; दहावीनंतर आपल्या स्वप्नपूर्तीसाठी नांदेडच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये स्थापत्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. नांदेड शासकीय तंत्रनिकेतनच्या वसतिगृहात राहून तो अभियांत्रिकी पदविकेचे शिक्षण घेत आहे. क्षीरसागरने प्रथम वर्षात असताना शासकीय तंत्रनिकेतनच्या मुख्य सूचना फलकावर डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनेची माहिती वाचली. त्यानंतर या योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन प्रणालीद्वारे अर्ज केला. या योजनेतून क्षीरसागरला २० हजार रुपयांची मदत मिळाली.

– **काशिनाथ आरेवार,** जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड.

# स्वप्न साकार

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण घेण्यासाठी सर्वसामान्य विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरत आहे.**

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे मान्यताप्राप्त व्यावसायिक उच्च शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत आहे. या योजनेच्या लाभामुळे नांदेड जिल्ह्यातील पूजा लोखंडे हिला उच्च शिक्षणासाठी आधार मिळाला.

पूजा लोखंडे ही नांदेड येथील सायन्स महाविद्यालयात एमएस्सी द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. तिला राज्य शासनाकडून एमएस्सी (गणित) प्रथम वर्षाची २०१७-१८ साठी, 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती' अंतर्गत ४,३६० रुपये मिळाले. ही रक्कम थेट तिच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेच्या खात्यात जमा करण्यात आली.

तिच्या घरची परिस्थिती नाजूक आहे. पूजाचे वडील अनिलराव लोखंडे हे यशवंत महाविद्यालयात विनाअनुदानित तत्त्वावर क्रीडा शिक्षक म्हणून कार्यरत होते. परंतु रस्ते अपघातात त्यांचे निधन झाले.


पूजा अनिलराव लोखंडे

त्या वेळेस पूजा तीन वर्षांची होती. आरती ही तिची छोटी बहीण.. वडिलांच्या निधनानंतर या सर्वांची जबाबदारी तिची आई मुक्ता लोखंडे यांच्यावर आली.

पूजाने पहिली ते तिसरीचे शिक्षण नाना पालमकर शाळेत पूर्ण केले. त्यानंतर तिने कमला नेहरू शाळेत चौथी ते दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले. अकरावी व बारावीचे शिक्षण माणिकनगर येथील शिवाजी विद्यालयात पूर्ण केले. घरची परिस्थिती नाजूक असल्यामुळे अभियांत्रिकी शिक्षणाकडे न वळता तिने बीएस्सी सायन्स महाविद्यालयात पूर्ण केले आहे. छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती मिळाल्याने तिचे उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार होत आहे. या शिष्यवृत्तीमुळे परीक्षा शुल्क व शिक्षण साहित्यासाठी आर्थिक मदत होत आहे.

– **विवेक डावरे,** जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड.

**प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान तसेच राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान यांच्या माध्यमातून स्वत:चा व्यवसाय सुरू करून सुचित्रा कुलकर्णी यांनी इतर महिलांना रोजगार मिळवून दिला.**

# संधीचे सोने...

सातारा जिल्हा

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान तसेच राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान यांच्या माध्यमातून सातारा जिल्ह्यामध्ये जुलै २०१८ अखेर १ हजार ४४ उमेदवार प्रशिक्षण घेत आहेत. ४ हजार ४५२ उमेदवारांनी प्रशिक्षण पूर्ण केले असून २ हजार ४९३ उमेदवारांना रोजगार प्राप्त झाला आहे. ८२ उमेदवारांनी स्वयंरोजगाराची कास धरून 'आपली प्रगती आपल्या हाती' या तत्त्वाचा अवलंब करत स्वत:चे व्यवसाय सुरू केले आहेत.

### सुचित्रा कुलकर्णी



सुचित्रा कुलकर्णी उंब्रज (ता. कराड) येथे राहतात. त्यांचे शिक्षण डी.एड.पर्यंत झाले. त्यांनी तीन वर्ष खासगी शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून मोफत काम केले. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, यातून आपल्याला फारशी अर्थप्राप्ती होणार नाही. त्यानंतर त्यांना एक-दोन हजार रुपयांची नोकरी मिळाली, पण म्हणावे तसे पैसे मिळत नव्हते.

याच दरम्यान गावात झालेल्या एका मेळाव्यात प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेची माहिती मिळाली. या माहितीच्या अनुषंगाने त्यांनी गावातील एका टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये कागदपत्रांची पूर्तता करून हॅण्ड एम्ब्रॉयडरी या कोर्सला प्रवेश घेऊन ६ महिन्यांचे प्रशिक्षण घेतले.

या प्रशिक्षणामुळे त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे. त्यांनी स्वत:च्या १० शिलाई मशिन घेतल्या असून अकुशल आणि कुशल अशा मिळून एकूण ४० महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला. या महिलांना लागणारा कच्चा माल त्या बाजारभावापेक्षा कमी दराने उपलब्ध करून देतात. त्यांच्याकडे जवळपास १ लाख ५० हजार रुपयांचे भांडवल आहे. व्यवसाय वाढावा, यासाठी २ लाख ५० हजार रुपये खर्च करून त्यांनी दोन खोल्या बांधल्या. त्यांनी २ हजार महिलांना बॅग, साड्या वर्क, गोधडी शिवणे तसेच टाकाऊपासून टिकावू कसे करायचे याचे प्रशिक्षण दिले. त्यांनी महिलांचा एक गट तयार केला असून गटामार्फत ज्या ठिकाणी मोठे कार्यक्रम असतात. त्या ठिकाणी उत्पादित केलेल्या मालाचे प्रदर्शन लावले जाते. त्यांना महिन्याला २५ ते ३० हजार रुपयांचे उत्पन्न मिळते. इतर महिलांनाही यातून प्रोत्साहन मिळाले आहे. त्यामुळे व्यवसायाभिमुख वातावरण निर्माण होण्यास मदत झाली आहे.

**- संगीता खंदारे,** कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, सातारा.

# मी उद्योजिका

औरंगाबाद जिल्हा

कौशल्य आधारित प्रशिक्षण मिळाले तर प्रगती साध्य करणे अवघड नाही. असे प्रशिक्षण फुलंब्री तालुक्यातील डोंगरगाव शिव येथील रेखा रवींद्र वाहटुळे यांनी घेऊन २०१६ मध्ये गृहउद्योग सुरू केला. यामुळे चार जणांच्या हाताला काम मिळाले असून आर्थिक उन्नती साध्य करण्यात त्यांना यश आले आहे.

डोंगरगाव येथे रेखा यांच्या कुटुंबीयांची दोन एकर शेती आहे. पती रवींद्र बेरोजगार अभियंता आहेत. शेतातून कुटुंबीयाचा उदरनिर्वाह होणे शक्य नव्हते. त्यामुळे प्रथम खुलताबाद येथे राहून रवींद्र यांनी छोटे मोठे काम करणे सुरू केले. त्या वेळी रेखा गृहिणी होत्या. लवकर लग्न झाल्यामुळे बारावीपर्यंतचेच शिक्षण पूर्ण करता आले. पतीला नियमित काम मिळत नसल्याने हे कुटुंब कामाच्या शोधात औरंगाबादेत राहायला आले.

श्रीमती वाहटुळे यांनी ऑक्टोबर २०१६ मध्ये वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या औरंगाबाद कृषी विज्ञान केंद्रातून कौशल्य विकासावर आधारित अन्नप्रक्रिया उद्योगाचे एक महिना प्रशिक्षण घेतले. फळे, भाज्या प्रक्रिया, बेकरी, निर्जलीकरणाचे प्रात्यक्षिक आत्मसात केले. त्या शेवगा पाल्याचा वापर करून पराठा, खांकरा, चटणी असे विविध आरोग्यवर्धक चविष्ट पदार्थ तयार करायला त्या शिकल्या. त्यानंतर त्यांनी नंदनवन कॉलनी व कॅनॉट प्लेस या ठिकाणी दितिजा गृहउद्योग सुरू केला. शेवगा पराठा स्पेशल, व्हेज, नॉन व्हेज, गरम मसाले, धने, हळद, मिरची पावडर, थालीपीठ भाजणी, चहा मसाला, ढोकळा पीठ, नाष्टा, जेवण व विविध पराठे यांची विक्री केली जाते. दीड वर्षांत अडीच लाख रुपये निवळ उत्पन्न मिळाल्याचे त्या सांगतात. २०१६ मध्ये भुवनेश्वर येथे झालेल्या कृषी प्रदर्शनात त्यांनी 'एक भारत श्रेष्ठ भारत' पुरस्कार पटकावला.



**रेखा वाहटुळे**

**- संतोष देशमुख,** प्रतिनिधी, दै. दिव्य मराठी, औरंगाबाद.



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88

**राज्यात ग्रामीण सामाजिक परिवर्तन अभियान राबवले जात आहे. रायगड जिल्ह्यात २२ ग्रामपंचायतींमधल्या ५५ गावांमध्ये या अभियानाची अंमलबजावणी सुरू आहे. राज्यात या अभियानातील सर्वाधिक गावे रायगड जिल्ह्यात आहेत.**

रायगड जिल्हा

मुख्यमंत्री ग्रामीण सामाजिक परिवर्तन अभियानांतर्गत रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातल्या दुर्गम डोंगराळ भागात १२ वाड्यांनी बनलेली ग्रामपंचायत महागाव ही ग्रामपंचायत. लोकवस्ती १८०० जणांची. महागाव परिसरात केवळ शेती हाच एकमेव व्यवसाय असल्याने चार महिन्यानंतर लोकांना काम नसते. त्यामुळे बरेच जण मोठ्या शहरांकडे स्थलांतरित होण्याची जणू येथे परंपराच आहे. या गावातील नोडल अधिकारी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र वीज वितरण कंपनी व ग्राम समाज परिवर्तकांनी महिलांचे संघटन करून त्यांचा स्त्री शक्ती नावाचा बचतगट तयार केला. या महिलांना पारंपरिक व्यवसाय देण्यापेक्षा आधुनिक व्यवसाय देण्यासाठी त्यांनी एलईडी बल्ब उत्पादन हा व्यवसाय निवडला. वर्धा येथील शक्ती इलेक्ट्रिकल या संस्थेने या महिलांना प्रशिक्षण देण्याची तयारी दर्शविली. महिलांनी रीतसर प्रशिक्षण घेतले. या महिला त्यात पारंगत झाल्या. वायरला साधी पिनही जोडू न शकणाऱ्या महिला सफाईदारपणे सर्किटचे सॉल्डरिंग, बल्बच्या कॅपचे पंचिंग करतात. सर्किटमध्ये डायोड-कॅपॅसिटर्स जोडतात, ११ महिलांचे हे २२ हात अवघ्या ७ ते ८ मिनिटात एक एलईडी बल्ब तयार करतात. एलईडी बल्ब तयार करण्याच्या प्रक्रियेतला शेवटचा टप्पा टेस्टिंग युनिटच्या बल्ब होल्डरवर तयार झालेला बल्ब प्रकाशतो, तेव्हा त्यासोबत या महिलांचे चेहरेही अनोख्या तेजाने उजळतात.

# स्त्री शक्ती : ऊर्जा शक्ती



एलईडी बल्ब तयार करण्यात कौशल्य मिळवलेल्या महागावच्या महिला.

एलईडी बल्ब उत्पादनाचे युनिट साकारण्यासाठी सुमारे ६५ हजार रुपयांचा खर्च आहे. त्यात एलईडी प्लेट्स, पीसीबी प्लेट, कॅपॅसिटर, कॅप, बॉडी, मास्क पंचिंग मशिन, सोल्डर मशिन, हिटसिंक प्रेसिंग युनिट, टेस्टिंग आणि कंट्रोल युनिट या सोबत इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल टूल बॉक्स यांचा समावेश आहे. या युनिटमधून ३० हजार रुपयांचे बल्ब पहिल्या टप्प्यात तयार केले जातील. त्यासाठी १५ हजार रुपयांचे खेळते भांडवल ठेवण्यात आले आहे. प्रशिक्षण, कच्चा माल पुरवठा ते उत्पादन या अशा टप्प्यासाठी शक्ती इलेक्ट्रिकल वर्धा या संस्थेसोबत ग्रामपंचायतीने करार केला आहे.

पहिल्या टप्प्यात केवळ बल्बचे असेम्ब्लिंग असले तरी दुसऱ्या टप्प्यात पीसीबी प्लेटसुद्धा या महिलाच तयार करतील. या शिवाय सोलर पॅनल व कुलर निर्मितीचे प्रशिक्षणही या महिलांना दिले जाणार आहे, अशी माहिती ग्रामीण सामाजिक परिवर्तक श्री. तिकोणे यांनी दिली. आतापर्यंत या महिलांनी ३१ हजार रुपयांची बल्ब विक्री केली आहे. आता पुढील बॅचसाठी २० हजार रुपयांच्या कच्च्या मालाची ऑर्डरही या महिलांनी दिली आहे.

## कुक्कुटपालनातून शाश्वत रोजगार

दुर्गम भागात असणाऱ्या काकळ (ता. माणगाव) या गावात रोजगारासाठी स्थलांतराची समस्या हेरून येथील गावकऱ्यांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने परसातील कुक्कुटपालन आणि त्याला शेळीपालन व पशुपालनाची जोड दिल्याने गावकऱ्यांना घरच्या घरी रोजगार उपलब्ध झाला आहे.

३८ लाभार्थ्यांना शेतीपूरक शाश्वत रोजगार उपलब्ध झाला आहे. या शेतकऱ्यांना कर्जत येथे एकात्मिक पशुसंवर्धन पद्धतीद्वारे होत असलेले गीर गायीचे संगोपन, संकरित/देशी शेळी पालन, ससे पालन, बदक पालन, संकरित गाई व म्हशी यांचे पालन, दूध विक्री व्यवस्था, कडकनाथ, गिरीराज, वनराज या कोंबड्यांच्या संगोपनाचे प्रात्यक्षिक, चारा वैरण व्यवस्थापन, अझोला आणि हायड्रोफोनिक्स या सर्व पशुसंवर्धन आणि संगोपनाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष माहिती देण्यात आली.

गावातील शेतकऱ्यांचे तत्काळ शाश्वत उत्पन्न वाढविणे आवश्यक होते. त्यासाठी कमी खर्चात, कमी जागेत आणि घरच्या घरी करता येणारा कुक्कुटपालन हा व्यवसाय निवडण्यात आला. 'आत्मा' प्रकल्पाद्वारे या शेतकऱ्यांना ५० गिरिराज व वनराज या सुधारित जातीच्या संमिश्रित पिल्लांचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर अर्धस्वयंचलित खाद्य व पाण्याची भांडी तसेच ६ आठवड्यांपर्यंत पिलांच्या उत्कृष्ट वाढीसाठी नामांकित कंपनीचे ५० किलो खाद्यवाटप करण्यात आले. हे शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर देण्यात आले. थेट त्यांच्या खात्यात अनुदान वितरित करण्यात आले.

सध्या येथील ४० लाभार्थ्यांपैकी ३८ शेतकऱ्यांचे ५० पैकी प्रत्येकी ४२ ते ४८ पक्षी जिवंत असून काही पक्षी विक्रीस तयार झाले आहेत. ५० टक्के मादी पक्षी हे मे अखेर अंडी उत्पादन देण्यास तयार होतील. अंडी विक्रीतून त्यांना आर्थिक उत्पन्न उपलब्ध होण्यास सुरुवात झाली आहे.

## कडू कारले, गोड कहाणी

कडू कारल्यांमुळे एखाद्या गावात परिवर्तन घडू शकते. त्यातून त्यांचे जीवनमान उंचावून रोजगारासाठी स्थलांतरासारखे सामाजिक प्रश्न निकाली निघू शकतात. माणगाव तालुक्यातील मुठवलीतर्फे तळे या ग्रामपंचायतीत मुठवलीतर्फे तळे, निवी, उमरोली दिवाळी ही गावे येतात. मुठवली व निवी या गावाजवळून वर्षभर नदी वाहते. या नदीच्या पाण्यावर वनराई बंधारे घालून गेल्या पाच ते सहा वर्षांपासून पंधरा ते वीस एकर क्षेत्रावर कारले व भाजीपाला लागवड केली जात आहे. या गावात लहू डोलताडे हे परिवर्तक तर आत्मा प्रकल्प संचालक



श्री. बोराडे हे नोडल अधिकारी आहेत. कृषी विभाग पंचायत समिती, स्वदेश फाऊंडेशनमार्फत शेतकऱ्यांना डिझेल इंजिन, पाईप, मंडपासाठी जाळी देण्यात आली व महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. तसेच शेतकरी संकरीत कारले पिकाची लागवड करत आहेत. कारले पिकास चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी या पिकाकडे वळले आहेत. या वर्षी (२०१७-१८ मध्ये) ६४ शेतकऱ्यांनी ८२ एकर क्षेत्रावर अमनश्री व अभिषेक या संकरित कारले वाणाची लागवड केली होती व त्याचे उत्पादनही एकरी ५-६ टन असे चांगल्या प्रकारे मिळाले. खर्च वजा जाता एकरी १ लाख रुपयांपर्यंत निव्वळ नफा मिळाला. या गावात उत्पादित होणारी कार्ली निर्यातक्षम दर्जाच्या आहेत. त्यामुळे व्यापारी हा माल प्रत्यक्ष शेतावर येऊन खरेदी करत आहेत. महाराष्ट्र स्पर्धाक्षम प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांनी पॅक हाऊस तसेच भाजीपाल्याचे उत्पादन शहरी मार्केटपर्यंत नेण्यासाठी, सरकारी विक्रीसाठीची व्हॅन या प्रकल्पांतर्गत मंजूर असून आत्मायोजनेंतर्गत १३ लाख ५० हजार एवढे अनुदान मंजूर आहे. ही व्हॅन या शेतकऱ्यांना मिळाल्यास ते थेट लांबच्या बाजारात आपला माल नेऊन अधिक फायदा मिळवू शकतील.

पुढील टप्प्यात 'उन्नत शेती समृद्ध शेतकरी' अभियानांतर्गत १०० एकर क्षेत्राचा समावेश करून, या गावामध्ये गट शेती उपक्रम राबवण्याचा मानस या अभियानाच्या निमित्ताने व्यक्त होत आहे. त्यासाठी सर्व शेतकऱ्यांची तयारी असून पुढील वर्षासाठी ३० नवीन लाभार्थी कारले लागवड करण्यास उत्सुक आहेत. ग्राम सामाजिक परीवर्तन अभियानांतर्गत पुणे येथे आधुनिक तंत्रज्ञान व त्याचा वापर पाहण्यासाठी किसान प्रदर्शनासाठी शेतकऱ्यांची सहल आयोजित केली होती. याचा त्यांना फायदा झाला. आता शेतकरी दुबार पीक पद्धतीकडे वळत असून त्यामुळे या भागातून रोजगारासाठी स्थलांतरित होणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले आहे.

**- डॉ. मिलिंद मधुकर दुसाने,**
प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी, रायगड.



join us 》》 https://t.me/Mpscrockers88

**महाराष्ट्रात २०१५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम कायदा लागू करण्यात आला, बघता बघता गती, पारदर्शिता व ठरावीक कालावधीमध्ये नागरिकांना हमखास सेवा देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या कायद्याने प्रशासकीय चेहरामोहरा बदलून टाकला.**

# हमी सेवेची, हमी समाधानाची



**सेवा हमी कायद्याबद्दल नागरिकांशी चर्चा करताना लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त स्वाधीन क्षत्रिय.**

ग्रामीण भागातल्या नागरिकांना ऑनलाइन सेवा काय कळणार, असे म्हणत विरोध झालेल्या या सुविधांनी आता चांद्यापासून बांद्यापर्यंत आपले नेटवर्क घट्ट केले आहे. २०१५ मध्ये महाराष्ट्राचे मुख्य सचिव असताना स्वाधीन क्षत्रिय यांनी या कायद्याच्या मसुद्यापासून तर अंमलबजावणीपर्यंत लक्ष घातले होते.

श्री. क्षत्रिय सध्या राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त आहेत. त्यांनी नुकतीच चंद्रपूर जिल्ह्याला जेव्हा भेट दिली असताना स्वतः जनतेमध्ये जाऊन या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये येत असलेल्या अडचणी जाणून घेतल्या. सेतू केंद्रावरील रांगेमध्ये ते उभे राहिले. कोणतीही ओळख न देता त्यांनी जनतेशी थेट संपर्क साधला. जनतेच्या समस्या जाणून घेतल्यानंतर त्यांनी सेतू केंद्र चालवणाऱ्या महिला विकास मंडळाच्या महिलांशी संपर्क साधला. लोकांना सेवा देताना कोणत्या अडचणी येतात हे त्यांनी जाणून घेतले. यावेळी काही अधिकारीही होते. त्यांनी तहसीलदारांच्या केबिनमध्ये बसून या योजनेची यशकथा ऐकली. कधीकाळी फायलींचे गठ्ठे घेऊन रात्रभर स्वाक्षरी करणाऱ्या तहसीलदाराला आता एका क्लिकने हजारो आदेशांवर क्षणात डिजिटल स्वाक्षरी करताना होणारा आनंद अनुभवता आला. रहिवासी दाखल्यांसाठी पायपीट करणाऱ्या नागरिकाला पंधरा मिनिटांत कोणत्याही मध्यस्थाशिवाय मिळणारे प्रमाणपत्र व चेहऱ्यावर खुललेला आनंद त्यांना बघायला मिळाला. एका छोट्या ग्रामपंचायतीमध्ये नागरिकांना तत्काळ मिळणाऱ्या सुविधा पाहायला मिळाल्यात. चंद्रपूरसारख्या

चंद्रपूर जिल्हा

भागात ऑनलाइन सेवा आणि त्यासंदर्भात लोकांमध्ये झालेली जनजागृती याबाबत प्रत्यक्ष दृश्य परिणामाचे ते साक्षीदार झाले. या वेळी दुर्गम भागात इंटरनेट सेवा गतिशील करण्याची मागणी त्यांच्यापुढे आली. महाराष्ट्रात आगामी काळात या कायद्यातंर्गत ५०० सेवांची सुरुवात होत आहे. जिवती तालुक्यासारख्या दुर्गम भागात नागरिकांना आता या ऑनलाइन सेवेचा लाभ मिळत आहे.

– **प्रवीण टाके,** जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर. संपर्क: ०९७०२८५८७७७

## सौरऊर्जेने पाणी

कोल्हापूर जिल्हा

सौरऊर्जेवर आधारित दुहेरी पंप लघू नळ पाणी पुरवठा योजना कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक वाड्या–वस्त्यांमध्ये सुरू झाल्या आहेत, त्यामध्ये करवीर तालुक्यातील ऐतिहासिक आणि पौराणिक वारसा जोपासणाऱ्या बीड – तळेकर वस्तीवरील लोकांना या योजनेतून नळाद्वारे पाणी मिळू लागले आहे.

बीड – तळेकर वस्ती ही तशी जेमतेम १५ घरांचीच वस्ती. नळपाणी पुरवठा योजनेत समावेश नसल्याने ती पाण्यापासून वंचित होती. ऐन उन्हाळ्यात या वस्तीतील विंधन विहिरीचा हातपंपाद्वारे पाणी उपसा बंद व्हायचा, मग दीड किलोमीटरवर असलेल्या भोगावती नदीतून पाणी आणताना तळेकर कुटुंबातील महिलांची दमछाक व्हायची. महिला वर्गाचा सारा वेळ पाणी आणण्यात जायचा. त्यामुळे शेतीच्या कामावर परिणाम होऊन शेती उत्पन्न कमी व्हायचे.



सौर ऊर्जेवरील विंधन विहीर, कोल्हापूर

पण शासनाच्या भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणेने विकसित केलेल्या सौरऊर्जे वर आधारित दुहेरी पंप योजना दोन वर्षापूर्वी तळेकर वस्तीमधील विंधन विहिरीवर ४ लाख ८४ हजार रुपये खर्चून कार्यान्वित केली, त्यामुळे वस्तीवरील सर्व कुटुंबांना नळाद्वारे कायमस्वरूपी पाणी उपलब्ध होऊ लागल्याने महिलांचे श्रम व कष्ट वाचले. या वस्तीतील मुक्ताबाई तळेकर, लता तळेकर आदी महिलांनी, 'या योजनेमुळे ऐन उन्हाळ्यात दीड किलोमीटरहून आणाव्या लागणाऱ्या पाण्याचा फार मोठा त्रास बंद झाला असून, तो वेळ आता शेतीकामाला येत आहे. या योजनेमुळे घरातच नळाने पाणी मिळाल्याने आम्ही समाधानी असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या योजनेद्वारे २४ x ७ शाश्वत पाणीपुरवठा केला जातो, हातपंप आणि सौरऊर्जेवर आधारित पाणबुडी पंपाची एकाच विंधन विहिरीवर उभारणी केली जाते, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने विकसित केलेल्या स्पेशल वॉटर चेंबरचा वापर केला जातो. सौरपंपासाठी बॅटरीची आवश्यकता नाही, विजेची गरज नसून पाच हजार लीटर्सच्या पाण्याच्या टाकीतून घरोघरी नळाद्वारे तसेच सार्वजनिक नळाद्वारे वस्तीजवळ पाणीपुरवठा होतो.

**जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर.**



# व्यवसाय कौशल्य

**लातूर जिल्हा**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या कर्जाचा लाभ घेऊन लातूर जिल्ह्यातील १) विलास श्रीरंग पवार, (शंभुराजे गोट फार्म, पेठ ता. जि. लातूर) यांना इंडियन बँक, लातूर यांच्याकडून शेळीपालन व्यवसायासाठी दहा लाख रुपये कर्ज मंजूर झाले. २) नवनाथ गुरमे, (श्रेया पापड उद्योग, महाळंग्रीवाडी ता.चाकूर) यांना एचडीएफसी बँकेकडून २ लाख ५८ हजार रुपये मंजूर झाले. ३) सौ.महानंदा प्रल्हाद पाटील, (तोंडार ता.उदगीर) यांना महिला उद्योगीकरणांतर्गत शेळीपालन व्यवसायासाठी जनता सहकारी बँक पुणे यांच्याकडून तीन लाख रुपये मंजूर झाले. ४) दयानंद मगर, (मु.पो. रामेगाव ता. लातूर) यांना मिनी टॅक्ट्रसाठी आयसीआयसी बॅकेकडून दोन लाख ५० हजार परतावा मंजूर झाले. त्यामुळे या लाभार्थ्यांना स्वत:चा व्यवसाय सुरू करता आला.




**दयानंद विष्णू मगर**

दयानंद विष्णू मगर यांचे शिक्षण बी.ए.पर्यंत झाले आहे. शेती नऊ एकर आहे. शेतीपूरक व्यवसायाशी निगडित असणारे मिनी ट्रॅक्टर वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेतून त्याला महामंडळ व आयसीआयसीआय बँकेच्या सौजन्याने दोन लाख ५० हजार रुपयांचे कर्ज मिळाले. त्यातून त्याने ट्रॅक्टर विकत घेतला. या शेतीविषयक ट्रॅक्टरने तो स्वत:च्या शेतात काम करतोच शिवाय सरी, बोध, उसातील अंतर्गत मशागतीची कामे, फळबाग, मोगडा, पेरणी, पाळी आणि फवारणी अशी अनेकविध कामे मिळत आहेत. त्यामुळे त्याची आर्थिक उन्नतीकडे भरभराट होत आहे. बँकेचा पहिला हप्ता त्याने फेडला आहे.

विलास पवार हा बी.ए.ची पदवी पूर्ण करून व्यवसायाच्या शोधात असतानाच लातूर येथे कृषी महोत्सव पाहण्याची संधी त्याला मिळाली. त्या महोत्सवात कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, लातूर यांच्या कार्यालयामार्फत अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचा स्टॉल लावण्यात आला होता. याच ठिकाणी श्री. पवार याने शेळीपालन व्यवसाय करण्याचे निश्चित केले. कर्जाची फाईल तयार केली. महामंडळाच्या सहकार्याने इंडियन बँकेकडून टप्प्याटप्प्याने १० लाख कर्ज मंजूर झाले. शेळीचे संगोपन करण्यासाठी त्याच्याकडे स्वत:ची शेड आहे. त्याने रेणापूर, लातूर, पानचिंचोली, औसा येथून उस्मानाबादी शेळ्या व बोकड खरेदी केले. सद्य:स्थितीत ५० शेळ्या आहेत. हा व्यवसाय शेतीपूरक असल्यामुळे या व्यवसायातून चांगलीच आवक वाढली आहे. पवार याला बँकेचे कर्ज व परताव्याची रक्कम फेडणे शक्य होत आहे.

सौ. महानंदा प्रल्हाद पाटील, (गायत्री शेळीपालन, तोंडार, ता.उदगीर, जि. लातूर) यांचे शिक्षण बारावीपर्यंत झाले आहे. त्या त्यांच्या पतीसह कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, लातूर यांच्या कार्यालयात व्यवसायासाठी काही कर्ज मिळेल का, याची विचारणा करण्यासाठी गेल्या होत्या. त्यांना शेळीपालन हा व्यवसाय सुरू करण्यासाठी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गतची माहिती मिळाली. त्यांनी महामंडळ व बँकेकडे तीन लाख रुपयांची मागणी केली. जनता सहकारी बँक, पुणे



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88



महानंदा प्रल्हाद पाटील

यांच्याकडून कर्ज मिळाले. त्यांनी सुरुवातीस नऊ उस्मानाबादी शेळी व एक अफ्रिकन बोकड आणले. आता त्यांच्याकडे २६ शेळ्या व बोकड झाले आहेत. बाजारपेठ जवळच असल्यामुळे शेळ्यांची विक्रीही लवकर होईल, असा त्यांना विश्वास आहे.

### पापड उद्योगाला गती

नवनाथ गुरमे (महाळंग्री वाडी, ता. चाकूर) याने महामंडळाच्या सहकार्याने एचडीएफसी बँकेकडून दोन लाख ५८ हजारांचे कर्ज मिळवले. या पैशांतून पापड तयार करण्याची मशीन घेतल्याने पापड तयार करण्याच्या कामाला गती मिळाली आहे. विशेष म्हणजे या उद्योगासाठी बाजारपेठ शोधावी लागत नाही.

– **अशोक रामलिंग माळगे,** विभागीय माहिती कार्यालय, लातूर.

## कर्ज मिळाले, रोजगार मिळाला...

उस्मानाबादचा श्रीनिवास पाखरे हा उच्चशिक्षित तरुण.. शिक्षण एम.ए.बीएड. काही वर्षे खासगी शिक्षण संस्थेत मानधन तत्त्वावर शिक्षक म्हणून नोकरी करत असलेला. त्याला तुटपुंज्या मानधनावर



**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजनेचा लाभ घेऊन दुग्ध व्यवसाय करणारे श्रीनिवास पाखरे.**

काम करणे दिवसेंदिवस अवघड होत होते. घरी आई–वडील, पत्नी. शेती अवघी अडीच एकर.. तीही कोरडवाहू. त्यातून उत्पन्नाची आशा जवळपास नाहीच.

मात्र परिस्थितीने खचणार नाही, मी लढणार या जिद्दीने या तरुणाने मी व्यवसाय करणारच असा विचार सुरू केला. नेमका कोणता व्यवसाय करायचा, ते भांडवल कुठून मिळवायचे, येथून सुरुवात होती आणि शेवटी दुग्ध व्यवसाय करण्याचे निश्चित झाले.

उस्मानाबाद जिल्हा

उस्मानाबादमध्ये दुग्ध व्यवसाय करण्यास उत्तम संधी आहे. या व्यवसायासाठी भौगोलिक परिस्थितीही पूरक आहे. त्याचा नीट अभ्यास करून आपल्या व्यवसायासाठी लाभ घ्यायचा, असा निश्चय श्रीनिवास यांनी केला. जिल्हा उद्योग केंद्रात जाऊन या व्यवसायाची माहिती घेतली. त्यानंतर कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राला भेट दिली. त्या ठिकाणी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ आणि त्यांच्याकडून मिळणाऱ्या लाभांची माहिती श्रीनिवासला मिळाली. व्यवसाय सुरू करण्यासाठी जवळपास दोन–अडीच लाख रुपये भांडवलाची गरज होती. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून भाऊसाहेब बिराजदार नागरी सहकारी बँकेशी समन्वय साधण्यात आला. सर्व सोपस्कार पार पाडून श्रीनिवासला अडीच लाख रुपये कर्ज मंजूर झाले. तो जोमाने कामाला लागला. सकाळी सहा ते रात्री दहा ही कामाची वेळ निश्चित झाली. रोज जवळपास शंभर लीटर दुधाची खरेदी–विक्री होऊ लागली. त्यातून श्रीनिवासला महिन्याकाठी २० ते २५ हजार रुपयांची आवकही होऊ लागली. आज श्रीनिवास आणि त्याचे कुटुंबीय या व्यवसायामुळे स्थिरस्थावर झाले आहेत.

– **मनोज शिवाजी सानप,**
जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.

**शेतकरी आणि ग्राहक यांच्यात कोणताही मध्यस्थ नसावा, शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा आणि ग्राहकांना ताजा भाजीपाला मिळावा यासाठी संत शिरोमणी श्रीसावता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियान सुरू करण्यात आले. या उपक्रमास शेतकरी आणि ग्राहक यांच्याकडून सर्वत्र अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला आहे. सोलापुरात पाच ठिकाणी असे आठवडे बाजार सुरू आहेत.**

# थेट विक्री, भरघोस नफा

शेतकऱ्यांच्या मालाला थेट बाजारपेठ मिळावी आणि ग्राहकांनाही कमी किमतीत चांगला शेतमाल मिळावा यासाठी कृषी पणन मंडळातर्फे राज्यात ठिकठिकाणी संत शिरोमणी श्रीसावता माळी शेतकरी आठवडे बाजार सुरू करण्यात आले. कमी भाव आणि ताजा माल यामुळे या बाजारांना शहरातील ग्राहकांचा चांगलाच प्रतिसाद मिळाला आहे. या उपक्रमात सोलापूर शहरात पाच आठवडे बाजार सुरू करण्यात आले. पाचही ठिकाणी भरणाऱ्या या आठवडे बाजारामुळे शेतकऱ्यांना थेट पैसे मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समृद्धी येत आहे. सध्या राज्यात १३३ शेतकरी आठवडे बाजार आहेत. या शेतकरी आठवडे बाजारात एकूण १००० ते १५०० मेट्रिक टन शेतमालाची विक्री होते. या माध्यमातून प्रतिआठवडा पाच ते सहा कोटी रुपयांची उलाढाल होते.

आठवडे बाजाराच्या नियोजनाच्या कामकाजासाठी राज्यभरात २० शेतकरी कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. ग्राहकांशी कसे वागावे, शेतमालाची विक्री कशा पद्धतीने करावी, भावाची माहिती कशा पद्धतीने द्यावी याबाबतची माहिती देण्यात येते. यासाठी नागपूर, पुणे, औरंगाबाद, अमरावती येथे प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आली आहेत.

सोलापुरात गेल्या वर्षीच्या जानेवारी महिन्यात पहिला शेतकरी आठवडे बाजार सुरू झाला. प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या परिसरात सुरू झालेल्या पहिल्या आठवडे बाजाराला मिळालेला प्रतिसाद पाहता, शहरात आणखी चार ठिकाणी आठवडे बाजार सुरू करण्यात आले. येत्या काही दिवसांत शहरांच्या



**सोलापूरातील शेतकरी आठवडे बाजार.**

प्रत्येक उपनगरात तसेच नगरपालिकांच्या हद्दीत आठवडे बाजार सुरू करण्याचे प्रयत्न पणन विभागाकडून सुरू आहेत.

शहरातील पाचही ठिकाणच्या आठवडे बाजाराचे संपूर्ण नियोजन शेतकरी उत्पादक कंपनीकडून केले जाते. या शेतकरी गटांना आठवडे बाजारासाठी आकर्षक शेड देण्यात आली आहे. यासाठी पणन मंडळाकडून शेतकरी आठवडे बाजाराचे आयोजक, विक्रीसाठी येणारे शेतकरी, शेतकरी गट आणि उत्पादक कंपन्यांची यादी प्रमाणित करणे, आवश्यक त्या यंत्रणांची परवानगी घेणे, आयोजक आणि स्थानिक संस्थांशी समन्वय ठेवणे आदी बाबींची कार्यवाही केली जाते. या बाजारामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात तर वाढ झाली आहे. त्याचबरोबर ग्राहकांनाही चांगला आणि ताजा शेतमाल मिळाला आहे. आठवडे बाजारात होत असलेल्या या उलाढालीमुळे ग्रामीण भागात समृद्धी येऊ लागली आहे.

**सोलापूर जिल्हा**

शेतकरी आठवडे बाजारामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा भाव ठरवण्याचे स्वातंत्र्य मिळू लागले आहे. ही बाब शेतकऱ्यांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाची आहे. याबाबत श्री. गणेश सेंद्रीय शेती उत्पादक गटाचे बाळासाहेब माळी म्हणाले, 'आमच्या गटात शेतकरी सदस्य आहेत. आमचा गट सोलापुरातील दोन आठवडे बाजाराचे संयोजन करतो, यासाठी आम्हाला आवश्यक ते प्रशिक्षण मिळाले आहे. आठवडे बाजारात केल्या जाणाऱ्या विक्रीमुळे योग्य भाव तर मिळतोच त्याचबरोबर आम्हाला शेतमालाचा भाव ठरवण्याचा अधिकारही मिळतो आहे, ही बाब आमच्यासाठी महत्त्वाची आहे.'

**– रवींद्र राऊत,**
जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर.



join us 》》 https://t.me/Mpscrockers88



पालघर जिल्ह्यात कम्युनिटी वर्कशॉप अंतर्गत महिलांसाठी शिवणकला प्रशिक्षण आणि व्यवसाय उपक्रमास प्राधान्य देण्यात आले. त्यानुसार जव्हार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्यामार्फत कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र पालघर आणि हाऊस ऑफ अनिता डोंगरे यांच्या साहाय्याने ही योजना राबवण्यात येत आहे.

# शिवण्याची कला, जगण्याची कला

पालघर जिल्हा नागरी, सागरी आणि डोंगरी अशा विविधतेने नटलेला आहे. आठ पैकी सहा तालुक्यांचा प्रदेश डोंगराळ आणि आदिवासी वस्तीने व्यापलेला आहे. जिल्ह्याच्या सुमारे ३० लाखांच्या लोकसंख्येपैकी ३७ टक्के लोकसंख्या आदिवासी आहे. मोखाडा, जव्हार, विक्रमगड, तलासरी, डहाणू आणि वाडा तालुक्यात हे प्रमाण अधिक आहे. हा बहुतांश परिसर डोंगराळ आहे. शिवाय यातील जव्हार, मोखाडा या तालुक्यात रोजगारासाठी स्थलांतर, कुपोषण तसेच बेरोजगारीची समस्या मोठी होती. या समस्या सोडविण्यासाठी आदिवासी महिलांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून त्यांचा स्वाभिमान व जीवनमान उंचावणे गरजेचे होते. केवळ शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून या भागातील आदिवासींपर्यंत पोहोचण्याला येणाऱ्या मर्यादा लक्षात घेता, जिल्हा प्रशासनाने खासगी कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या साहाय्याने कम्युनिटी वर्कशॉप योजना राबवण्यास सुरुवात केली.

जिल्ह्यात कम्युनिटी वर्कशॉप अंतर्गत महिलांसाठी उपयुक्त व्यवसाय म्हणून शिवणकला प्रशिक्षण आणि व्यवसाय उपक्रमास प्राधान्य देण्यात आले. त्यानुसार ६ जानेवारी २०१८ रोजी जव्हार येथे या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. त्यासाठी स्थानिक नगर परिषदेने हॉल उपलब्ध करून दिला. तर, पॉवरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, बोईसरने या उपक्रमासाठी ५० शिलाई मशीन्स उपलब्ध करून दिल्या आहेत. या मशीन्सवर हाऊस ऑफ अनिता डोंगरे मार्फत स्थानिक महिलांना प्रशिक्षण आणि रोजगार उपलब्ध करून दिला जात आहे. कातकरी, परित्यक्ता, विधवा, अपंग यांना प्राधान्य देण्यात येत आहे. शिवणकला प्रशिक्षण प्राप्त स्थानिक आदिवासी महिलांना आवश्यक ते प्रगत प्रशिक्षण देऊन त्यांची या उपक्रमासाठी निवड करण्यात येत आहे.

जागेच्या उपलब्धतेनुसार सध्या या प्रशिक्षण आणि रोजगार उपक्रमात ५२ महिलांचा समावेश आहे. त्यासाठी 'स्वयंसिद्धा महिला मंडळ', या बचत गटाच्या महिलांची निवड करण्यात आली आहे. या योजनेपूर्वी या लाभार्थी महिला गृहिणी होत्या. शिवणकला प्रशिक्षण आणि व्यवसाय योजनेमुळे त्यांना स्थानिक पातळीवर मोफत प्रशिक्षण व रोजगार उपलब्ध झाल्याने संसाराला आर्थिक हातभार लागला आहे.

पालघर जिल्हा

फॅशन डिझायनर अनिता डोंगरे यांच्या कंपनीने डिझाईन केलेल्या कपड्यांचे शिवण करण्याचे काम या महिलांकडे दिले जाते. त्यासाठी कंपनीच्या वतीने शिवणकामात मार्गदर्शन करण्यासाठी ट्रेनरची नियुक्ती करण्यात आली आहे. सुरुवातीच्या काळात लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी १५०० रुपये प्रशिक्षण भत्ता दिला जातो. त्यानंतर दिवसभरात महिलांनी शिवलेल्या कपड्यांच्या प्रमाणात त्यांना रोजगार दिला जातो. त्यांनी शिवलेल्या कपड्यांचे पॅकिंग करून अनिता डोंगरे यांच्यामार्फत देश-विदेशातील मॉल्स व दुकानांमध्ये विक्री केली जाते. या उपक्रमात शिवलेल्या कपड्यांमधून शिल्लक राहिलेले कपड्यांचे तुकडे, शासनाने आदिवासी महिलांसाठी सुरू केलेल्या गोधडी प्रकल्पाला मोफत उपलब्ध करून दिले जातात. कंपनीमार्फत यापूर्वी एक पथदर्शी प्रकल्प जिल्ह्यातील चारोटी येथे सुरू करण्यात आला आहे. तेथे महालक्ष्मी महिला मंडळ बचतगटांच्या ५० महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रशासनाच्या वतीने नुकताच १५ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील धानिवली येथे अन्य एका प्रकल्पाचाही शुभारंभ करण्यात आला आहे.

'कम्युनिटी वर्कशॉप' हा आदिवासी भागातील महिलांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून, त्यांचा स्वाभिमान आणि जीवनमान उंचावण्यासाठीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

**- डॉ. प्रशांत नारनवरे,** जिल्हाधिकारी, पालघर.

**शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर,** प्र. जिल्हा माहिती अधिकारी, पालघर.

**केंद्र शासन ग्रामीण विद्युतकरणासाठी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण ज्योती योजना' व 'प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना' अर्थात सौभाग्य या दोन योजना राबवत आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण ज्योती योजनेतून ग्रामीण विद्युत यंत्रणा अधिक सक्षम केली जाते. सौभाग्य योजनेतून गरिबांना मोफत वीज जोडण्या दिल्या जातात. दारिद्र्यरेषेखालील नसणाऱ्यांना ५०० रुपयांत वीज जोडणी दिली जाते. ५०० रुपयेसुद्धा दहा समान हप्त्यांमध्ये वीजबिलातून घेतले जाते. लाभार्थ्यांना सध्या 'सहज बिजली' मिळत आहे. कोल्हापूर जिल्ह्यात ४,६१८ लाभार्थ्यांना सौभाग्य योजनेतून वीज जोडणी मिळाली आहे.**

# वाड्या उजळल्या...

कोल्हापूर जिल्हा

कोल्हापूर जिल्ह्यात राधानगरी, भुदरगड, गगनबावडा, गडहिंग्लज, चंदगड, शाहुवाडी, पन्हाळा या तालुक्यात जंगलाचे प्रमाण मुबलक असून हे तालुके दुर्गमच आहेत. सह्याद्रीच्या या जंगल दऱ्यांमध्ये असणाऱ्या गावांना तसेच वस्त्यांवर नागरी सुविधा पोहोचवणे आव्हान ठरते. त्यात विजेचे खांब रोवण्यासाठी वनविभागाच्या परवानग्या लागतात. त्या सहजासहजी मिळत नाहीत. मार्च २०१८ पर्यंत कोल्हापूर जिल्ह्यात २९ धनगरवाडे असे होते जिथे आजवर वीज पोहोचली नव्हती. ही बाब जिल्हा नियंत्रण समितीच्या पटलावर आली. त्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून सुमारे ४ कोटी रुपयांचा निधी महावितरणला देण्यात आला. ऊर्जीकरणाचे काम सोपे नव्हते. एका-एका धनगरवाड्यासाठी काही किलोमीटरची वीज वाहिनी टाकायची होते. ज्या पायवाटांवरून धड चालता येत नव्हते. तिथे रोहित्र, विजेचे खांब पोहोचवणे सोपे काम नव्हते.

मात्र महावितरणने हे काम एक आव्हान म्हणून स्वीकारले. पिढ्यान्‌पिढ्या अंधारमय जीवन जगणाऱ्या धनगरवाड्यात वीज पोहोचवण्याचे काम पूर्ण करण्याचा, वीज अधिकारी-कर्मचाऱ्यांनी संकल्प केला. त्यानुसार २०१८ अखेर २९ धनगरवाडे प्रकाशाने उजळून निघाले.

वीज येण्यापूर्वी या गावातील नागरिकांना दैनंदिन कामे, रात्रीचे जेवणसुद्धा सूर्यास्तापूर्वीच करावे लागत. विजेमुळे त्यांच्या घरात आता टीव्ही, मोबाइलही खणखणत आहेत. विजेच्या इतर साधनांचाही वापर करणे त्यांना शक्य झाले आहे. शिवाय अंधारात वन्य श्वापदापासून होणारा धोका टळला असून, कालपर्यंत वस्तीपुरत्या मर्यादित असलेल्या जगाच्या सामाजिक कक्षा रुंदावल्या आहेत.

प्रकाश पोहोचलेल्या या २९ वाड्यावस्त्या आणि धनगरवाड्यांमध्ये शाहुवाडी तालुक्यातील नांदारीचा धनगरवाडा, चंदगड तालुक्यातील इब्राहिमपुर धनगरवाडा, कानूर खुर्द धनगरवाडा, कोंडाळी -बंडराई वस्ती आणि कोंडाळी नागरगाव, भुदरगड तालुक्यातील वासनोळी धनगरवाडा, कोळवण धनगरवाडा, फये पाटीलवाडी सो.वाडा, रमनवाडी धनगरवाडा, सोळांकुर हरीजनवस्ती, हेदवडे धनगरवाडा, फराळे धनगरवाडा, अनफ बु. नवीन वाडी, गिरगांव धनगरवाडा, म्हमदापुर नवीन वस्ती, फये हंड्याचावाडा, बेडिव धनगरवाडा, मेघोली धनगरवाडा, चिकेवाडी, चाफोडी, कारीवडे, मनोपी आणि येरंडपे धनगरवाड्याचा समावेश आहे. राधानगरी तालुक्यातील सावर्डेवाडी, हसणे सावंतवाडी धनगरवाडा, आमजाई वरवडे लिंधाडेवस्ती, भैरीचा धनगरवाडा, खोतवाडी मसरंग आणि पाटीलवस्ती तळाशी या वाड्यावस्त्यांचा समावेश आहे.

**- एस. आर. माने,**
जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर.



कोल्हापूर जिल्ह्यातील धनगरवाड्यांना प्रकाशमान करणारी विद्युत वाहिनी.



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88

**ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांना वृद्धापकाळ चांगल्या तऱ्हेने घालविता यावा, त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, शारीरिक/मानसिक आरोग्य सुस्थितीत राहावे, वृद्धापकाळामध्ये ते आर्थिकदृष्ट्या सक्षम राहावे यासाठी राज्य शासनाने 'ज्येष्ठ नागरिक धोरण' जाहीर केले आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक नियोजन, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांना ताणतणावास तोंड देण्यासाठी सक्षम करणे हे या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# ज्येष्ठांना दिलासा...

ज्येष्ठ नागरिक योजनेंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत निराधार व गंभीर आजार असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना धर्मादाय संस्था/स्वयंसेवी संस्था यांच्याकडून मदत मिळण्यासाठी प्रयत्न केले जाईल. वैद्यकीय महाविद्यालयांशी संबंधित रुग्णालयांमध्ये वृद्धांसाठी ५ टक्के खाटांची सोय केली जाईल. शासनाच्या अखत्यारीतील रुग्णालयांमध्ये त्यांच्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असेल. रुग्णालयांमध्ये 'ज्येष्ठ नागरिक चिकित्सा विभाग' व त्यांच्यासाठी स्वतंत्र स्वागत कक्ष उभारण्यात येईल. मोफत डायलिसिस सेंटरची स्थापना करण्यात येईल. ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी व उपचार शिबिरे कार्यान्वित करण्यात येतील. सर्वेक्षणाद्वारे ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेऊन त्यावर उपचार सुचविले जातात.

### वृद्धाश्रम स्थापन करण्याची सक्ती

या धोरणांतर्गत नगरविकास विभागाकडून नवीन टाऊनशिप किंवा मोठ्या संकुलास परवानगी देताना वृद्धाश्रम स्थापन करणे सक्तीचे करण्यात येईल. विविध निवासी व अनिवासी संकुलात वृद्धाश्रम उभारता यावे याकरिता अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) उपलब्ध करून देण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यात ४ वृद्धाश्रमांसाठी जागा राखून ठेवण्यात येईल. ज्येष्ठ नागरिकांना ज्याप्रमाणे आयकरामध्ये, प्रवासामध्ये व इतर बाबतीत सवलत दिली जाते त्याप्रमाणे महानगरपालिका, नगरपालिकाद्वारे आकारल्या जाणाऱ्या करामध्ये सवलत देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. उद्यानात तसेच पदपथावर ज्येष्ठ नागरिकांसाठी बाकाची व्यवस्था करण्यात येईल, तसेच व्हील चेअर नेण्याची सोय करण्यात येईल.



नव्याने तयार होत असलेल्या सर्व गृहनिर्माणांमध्ये वाणिज्य, व्यापारी व इतर संकुले यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सोयीसुविधांची तरतूद करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे आखून देण्यात येणार आहेत. शासनाच्या इतर गृहनिर्माण योजनांमध्ये वृद्धांना घर/गाळा देताना तळमजल्यावरील घर/गाळा देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

प्रत्येक जिल्ह्यात वृद्धांसाठी शासकीय जमिनी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. आईवडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम २००७ तसेच त्या अंतर्गत २३ जून २०१० च्या अधिसूचनेद्वारे राज्यात लागू केलेल्या नियमांतर्गत ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या पाल्यांकडून निर्वाह खर्च देण्याची तरतूद केली आहे. संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली निर्वाह प्राधिकरण स्थापन करण्यात येईल.

### वृद्धाश्रम संरचनेत सुधारणा

राज्यातील मातोश्री/अनुदानित वृद्धाश्रम यांच्या संरचनेत सुधारणा करण्यात येईल. जिल्हा स्तरावर मातोश्री वृद्धाश्रमासाठी असलेल्या नियंत्रण समितीमध्ये सुधारणा करून, त्या योजनेत वृद्धाश्रम सल्लागार समिती स्थापन करण्यात येईल. या समितीवर ज्येष्ठ नागरिक संघाच्या योग्य प्रतिनिधीचा समावेश करण्यात येईल. वृद्धाश्रमात प्रवेश घेतलेल्या ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा व जीविताची काळजी घेण्याची जबाबदारी ही संबंधित वृद्धाश्रमाच्या व्यवस्थापनाची राहील. यात व्यवस्थापनाकडून कसूर झाल्याचे आढळून आल्यास, त्याबाबत व्यवस्थापनावर कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच वृद्धाश्रमातील कर्मचारी हा आवश्यक प्रशिक्षण धारक असेल याची दक्षता घेण्यात येईल.

ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यासाठी अस्तित्वात कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या संस्थांना प्रोत्साहित करण्यात येईल.

## व्यावसायिक प्रशिक्षण

ज्येष्ठ नागरिकांकरीता व्यावसायिक प्रशिक्षणाचे मार्गदर्शन करण्यात येईल. जेणेकरून त्यांचे वृद्धत्व उत्पादनक्षम व सकारात्मक बनेल. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासनाकडून खासगी क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनेक संस्था व अशासकीय संघटनांशी संपर्क साधण्यात येईल. ज्येष्ठ नागरिकांचा विद्यापीठे, ग्रंथालये, संशोधन आणि सांस्कृतिक केंद्र यांच्याशी संपर्क व सहभाग वाढवण्यात येईल. तसेच ज्येष्ठ नागरिकांचे सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा व इतर क्षेत्रातील ज्ञानाची तरुण पिढीशी देवाणघेवाण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांची जाणीव समाजात होण्यासाठी, विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनचे वृद्धापकाळात वडीलधाऱ्यांच्या जीवनात उद्‌भवणाऱ्या प्रश्नांबद्दल जाणीव करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी शालेय अभ्यासक्रम आखताना याचा विचार करण्यात यावा. जेणेकरून संस्कारक्षम पाल्य वृद्ध पालकांकडे योग्य दृष्टिकोन ठेवतील. ज्येष्ठ नागरिकांचा शिक्षण संस्था व विद्यार्थ्यांशी संपर्क घडवून सुसंवाद साधण्यात येईल. ज्येष्ठ नागरिकांना शिक्षणाच्या, प्रशिक्षणांच्या व माहितीच्या भेदभावविरहित संधी उपलब्ध करून दिल्या जातील. राष्ट्रीय दिवसाच्या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांना विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात येईल. पहिली ते बारावी पर्यंतच्या शालेय तसेच महाविद्यालयीन अभ्यासक्रमात मूल्यशिक्षणाच्या उद्दिष्टांपैकी कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तींविषयी आदरभाव, परस्पर सहकार्य, बंधुभाव, प्रेम इ. पोषकमूल्यांचे पाठ्यपुस्तकातील धड्याद्वारे मूल्यशिक्षण देण्यात येईल.

ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यविषयक कार्यक्रमांना व योजनांना प्रसिद्धी देण्यात येईल. वृद्धांच्या विविध प्रश्नांबद्दल प्रसार माध्यमांद्वारे सामाजिक स्तरावर जाणीव करून देणे, प्रबोधन करणे व त्याद्वारे या प्रश्नांबद्दल जागरूकता व संवेदनशीलता निर्माण होण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. वृद्धांचे आरोग्य, शिक्षण कार्यक्रम सुनिश्चित करणे या प्रयोजनाकरिता मुख्य प्रसार माध्यमे व इतर संदेश मार्ग यांचा वापर करण्याचा व त्यांना बळकटी देण्याचा प्रयत्न केला जाईल.

## स्वतंत्र ज्येष्ठ नागरिक कक्ष

वृद्धांसाठी असणाऱ्या सर्व योजना एकाच छत्राखाली आणून त्या योजनांचा लाभ त्यांना देण्यासाठी स्वतंत्र ज्येष्ठ नागरिक कक्ष निर्माण करण्यात येईल. दर ५ वर्षांनी ज्येष्ठ नागरिक धोरणाचे पुनर्विलोकन करण्यात येईल. वयोवर्धनाचा व ज्येष्ठांच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालये, संशोधन संस्था व सक्षम ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करणाऱ्या बिगर सरकारी संस्था यांच्या मदतीने, ज्येष्ठ नागरिकांसंबंधी व त्यांच्या समस्यासंबंधी माहिती एकत्रित करण्यात येईल. त्याचा ज्येष्ठ नागरिकांचे कल्याणविषयक कार्यक्रम आखण्यासाठी उपयोग होईल. राज्य, खासगी क्षेत्रातील व अशासकीय संघटनांच्या क्षेत्रातील वृद्धाश्रमांना उत्तेजन, साहाय्य व आधार (एकात्मीकृत) दिला जाईल. अशा वृद्धाश्रमांची नोंदणी, मूल्यांकन, संनियंत्रण व त्यांना साहाय्य यासाठी विनियामक सुविधा पुरवण्यात आल्याची खात्री केली जाईल. राज्य शासनाकडून किंवा इतर स्वयंसेवी संस्थांकडून ज्येष्ठ नागरिकांकरिता संस्था चालवण्यात येतात. त्या संस्थांच्या कामकाजाचे परिरक्षण एका त्रयस्थ संस्थेकडून करण्यात येईल. यासाठी विद्यापीठाचा व इतर संस्थेचा उपयोग करण्यात येईल. दरवर्षी ज्येष्ठ नागरिक दिनी ज्येष्ठ नागरिकांच्या स्थितीबाबत वार्षिक अहवाल प्रसिद्ध करेल. ज्यात ज्येष्ठ नागरिकांचे विविध बाबतीत समाधान निर्देशांक प्रसिद्ध करण्यात येईल. राज्य शासन ज्येष्ठ नागरिक कल्याणनिधी स्थापन करेल. त्यांच्या विनियोगासाठी राज्यस्तर, जिल्हास्तर व महानगरपालिका/नगरपालिका स्तरावर समिती गठित करेल. वृद्धाश्रमांमधील वृद्ध रहिवाशांचे, मानसिक व शारीरिक अशा प्रकारचे शोषण होण्यास प्रतिबंध करण्याबाबत कार्यवाही केली जाईल.

## ज्येष्ठ नागरिकांना कायदेविषयक सल्ला

ज्येष्ठ नागरिकांना कायदेविषयक सल्ला व इतर मदत करण्यासाठी विशेष सूचना दिल्या जातील. 'बार असोसिएशन'सारख्या संस्थांनी यामध्ये पुढाकार घेण्यास विनंती करण्यात येईल. जिल्हा/तालुका स्तरावरील ६० वर्षांवरील वृद्ध अर्जदार/प्रतिवादी यांचे दावे प्राधान्य देऊन निकालात काढण्यात येतील. ज्येष्ठ नागरिकांना असलेल्या अधिकाराबाबत जागृती निर्माण करण्याकरिता महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे राज्यातील सर्व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तसेच तालुका विधी सेवा समितीतर्फे, सर्व जिल्हा, तालुका तसेच गाव पातळीवर शिबिरे घेण्यात येतील.

ग्रामीण भागातील निराधार ज्येष्ठ नागरिकांना निवाऱ्याची सोय व्हावी, यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेत प्राधान्य देण्यात येईल. अशासकीय संघटना व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून ज्येष्ठ नागरिकांसाठी एकछत्री सेवा संकल्पनेचा विकास करण्यात येईल. वृद्ध कलावंतांना मानधन देण्याची योजना राबवण्यात येईल.

सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये परिसरातील सर्व ज्येष्ठ नागरिकांच्या वापरासाठी जागा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या उपविधीमध्ये तशी सुधारणा करण्यात येईल. निराधार व निराश्रित ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना अंत्योदय योजनेंतर्गत स्वस्त दराने व प्राधान्याने शिधा देण्यात येईल.

## देखभाल व विरंगुळा केंद्र

वृद्धांच्या ज्ञानाच्या कौशल्याचा वापर शासन, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खासगी संस्थांना आवश्यक असल्यास करून



### पोलिसांची मदत

ज्येष्ठ नागरिकांचा विविध स्तरातून होणारा छळ, पिळवणूक यापासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी पोलीस विभागाकडून विशेष प्रयत्न केले जाणार. प्रत्येक जिल्ह्यांच्या ठिकाणी तसेच पोलीस आयुक्तालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी विनाशुल्क हेल्पलाइन सुरू करणार. याद्वारे आणीबाणीच्या वेळी ज्येष्ठ नागरिकांना तत्काळ आरोग्य सेवा व सुरक्षा विषयक सेवा उपलब्ध केली जाईल. पोलिसांनी ज्येष्ठांची सुरक्षितता व अन्य प्रश्न यामध्ये जाणीवपूर्वक प्रयत्नशील राहण्यासाठी जागरूकता दाखवावी. आईवडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम २०१० च्या प्रकरण ६ मधील नियम २० मध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या जीवितांचे व मालमत्तेचे संरक्षण करण्याबाबत कृती आराखडा विनिर्दिष्ट केला आहे. त्याचप्रमाणे पोलीस ठाण्यात त्यांच्या हद्दीत राहणाऱ्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचे विशेषत: एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची अद्यावत यादी ठेवण्यात येईल. पोलीस ज्येष्ठ नागरिकांवर मैत्रीपूर्ण लक्ष ठेवतील.



पोलीस ठाण्याच्या प्रतिनिधीने सामाजिक कार्यकर्ता अथवा स्वयंसेवक यांच्यासह महिन्यातून किमान एकदा एकाकी व अशक्त ज्येष्ठ नागरिकांना सदिच्छा भेट द्यावी. मुंबईत ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी पोलिसांनी सुरू केलेली मदत वाहिनी क्रमांक १०३ व क्रमांक १०२९ प्रमाणेच राज्यातील सर्व जिल्हा व तालुका स्तरावर अशा प्रकारची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल.

घेण्यासाठी योजना तयार करण्यासाठी संबंधितांना सूचना देण्यात येतील. ज्येष्ठ नागरिकांसाठी दिवसभराच्या काळात देखभाल व विरंगुळा केंद्र स्थापन करण्यात येईल.

### वृद्ध मित्र

आधुनिक वैद्यकीय सुविधांमुळे वाढते आयुर्मान, परिणामी ज्येष्ठ नागरिकांच्या लोकसंख्येत होणारी प्रचंड वाढ यांचे गांभीर्य लक्षात घेऊन, वृद्धापकाळातील अडचणी दूर केल्या जातील. वृद्धांचे जगणे सुसह्य करण्यासाठी शहरांचा वृद्ध मित्र म्हणून विकास करण्याची संकल्पना जागतिक आरोग्य संघटनेने स्वीकारली आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत ही संकल्पना राबवली जाईल, ज्यामध्ये स्वयंसेवी संस्थांमार्फत विरंगुळा केंद्रे व स्मृतीभ्रंश केंद्रे यांची स्थापना केली जाईल. वृद्धांना मोफत अथवा अल्प दराने वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल व त्यांच्यासाठी आसने सुरक्षित ठेवली जातील. आजी-आजोबा उद्यानाची व्यवस्था केली जाईल. त्यात स्वच्छतागृह व इतर सोयीसुविधा पुरविल्या जातील. त्यांच्यासाठी विविध करमणूक व आरोग्यविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. या विरंगुळा केंद्रात फिजीओथेरपी, नेत्रतपासणी, प्रथमोपचार, रक्तदाब व रक्तशर्करा तपासण्याची व्यवस्था व आरोग्य प्रशिक्षण या बाबींचा समावेश असेल. सिनेमागृह, नाट्यगृहांमध्ये सवलतीच्या दरात प्रवेश व त्यांच्यासाठी आसने आरक्षित ठेवली जातील. ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करणे, त्यांच्यासाठी ग्रंथालयाची सुविधा मोफत वा सवलतीच्या दराने उपलब्ध करून देणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात येईल. वृद्धांचे आरोग्य, शिक्षण कार्यक्रम सुनिश्चित करणे या प्रयोजनाकरिता मुख्य प्रसारमाध्यमे व इतर संदेशमार्ग यांचा वापर करण्याचा व त्यांना बळकटी देण्याचा प्रयत्न केला जाईल. ज्या ज्येष्ठ नागरिकांची मुले व नातेवाईक देखभाल करत नसल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना वृद्धाश्रमात राहावे लागते, अशा पाल्यांच्या नावांची यादी जाहीर करून त्या यादीला व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल.



### ज्येष्ठ नागरिकांचे दिवस

- १५ जून-ज्येष्ठ नागरिक छळ प्रतिबंध जागृती दिवस
- २१ सप्टेंबर-जागतिक (स्मृतिभ्रंश) दिवस
- १ ऑक्टोबर-जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस

### लघुउद्योगात प्राधान्य

सक्षम ज्येष्ठ नागरिकांना अर्धवेळ नोकऱ्या मिळविण्यासाठी मदत करण्यासाठी काही लघुउद्योग प्राधान्याने ज्येष्ठ नागरिकांसाठी देण्यात येतील. (उदा. पाकिटे, उदबत्त्या, मेणबत्त्या, पापड बनवणे, इत्यादी) लघुकर्ज मिळवण्यासाठी मदत करण्यात येईल. तसेच बचतगटसुद्धा स्थापन करण्यात येतील. ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक संघ, बिगर सरकारी संघटना व स्वयंसेवी संस्थांना हेल्पलाइनद्वारे कायदेशीर मदत देण्यात येईल.

ज्येष्ठ नागरिकांना ज्याप्रमाणे आयकरामध्ये, प्रवासामध्ये व इतर बाबतीत सवलत देण्यात येते. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत, महानगरपालिका, नगरपालिका देयकरामध्ये, मालमत्ता कर इत्यादी करांमध्ये सूट/सवलत देण्यात येईल. शासनाच्या निवासी संकुलात वृद्धाश्रमासाठी तथा ज्येष्ठ नागरिकांच्या सुविधेसाठी जागा उपलब्ध करून देण्यात येतील.

**– दत्तात्रय कोकरे,** विभागीय संपर्क अधिकारी.



join us 》 》 https://t.me/Mpscrockers88



श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग



श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

# किमान आधारभूत दराने खरेदी

राज्यात खरीप हंगाम २०१८-२०१९ मध्ये विविध जिल्ह्यात 'नाफेड' या संस्थेच्या वतीने मूग, उडीद व सोयाबीन खरेदीची केंद्रे सुरु करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या शेतमालाची केंद्र शासनाच्या आधारभूत दराने खरेदी करण्यात येईल. मूग, उडीद व सोयाबीन यांचे आधारभूत दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तपशील | आधारभूत दर हंगाम २०१८-१९ | नोंदणी कालावधी |
|---|---|---|---|
| १ | मूग | ६९७५/- | २५/०९/२०१८ ते ०९/१०/२०१८ |
| २ | उडीद | ५६००/- | २५/०९/२०१८ ते ०९/१०/२०१८ |
| ३ | सोयाबीन | ३३९९/- | ०१/१०/२०१८ ते ३१/१०/२०१८ |

१) सर्व खरेदी ऑनलाईन पद्धतीने होणार आहे.

२) शेतकऱ्यांनी ज्या तालुक्यात त्यांची जमीन आहे, त्याच तालुक्यातील खरेदी केंद्रावर ऑनलाईन नोंदणी करावी.

३) नोंदणीचा प्रारंभिक कालावधी १५ दिवसांचा असेल. तसेच अपवादात्मक प्रकरणी त्यांनतर आलेल्या शेतकऱ्यांच्या अर्जाची नोंदणी खरेदी सुरु झाल्याच्या पहिल्या १५ दिवसांत करण्यात येईल. तद्नंतर नोंदणी होणार नाही.

४) नोंदणीकरिता आधार कार्डची प्रत व मूग/उडीद/सोयाबीन या पिकांची नोंद असलेला ७/१२ उतारा सादर करावयाचा आहे.

५) शेतकऱ्याचा कार्यरत असलेला मोबाईल क्रमांक खरेदी केंद्रावर द्यावयाचा आहे.

६) नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांना नोंदणीच्या क्रमवारीनुसार माल आणण्यासाठी एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. शेतकऱ्यांनी ज्या केंद्रावर नोंदणी केलेली आहे. त्याच केंद्रावर माल आणावयाचा आहे, एसएमएसशिवाय आणलेला माल परत पाठविण्यात येईल.

७) शेतकऱ्यांनी एफएक्यू दर्जाचा म्हणजेच काडीकचरा नसलेला, चाळणी करुन व सुकवून १२% पेक्षा जास्त आर्द्रता नसलेला शेतमाल आणावा. तसा शेतमाल नसल्यास परत पाठविण्यात येईल.

८) खरेदी संस्था शेतमाल आणल्यानंतर खालील बाबी तपासून खरेदी बाबत निर्णय घेईलः-

अ. शेतकरी नोंदणीकृत आहे किंवा कसे?

ब. एसएमएस दिल्यानंतर माल आणला किंवा कसे?

क. शासनाने निश्चित केलेल्या उत्पादकतेनुसार व खरेदीच्या मर्यादेनुसार माल आणला किंवा कसे?

ड. ७/१२ च्या पिकपेऱ्याची नोंद, खरेदी करावयाच्या पिकाची नोंद आहे किंवा कसे,

ई. गुणवत्ता नियंत्रकाच्या मते माल एफएक्यू दर्जाचा आहे किंवा कसे?

९) इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर मोजणी झाल्यानंतर शेतमालाची वजनासह नोंद करुन काटापट्टी शेतकऱ्यांना देण्यात येईल.

१०) खरेदी केलेल्या मालाची एनईएमएल पोर्टलवर त्याच दिवशी नोंद करण्याचे बंधन सबएजन्ट/खरेदी संस्थेवर राहील.

११) शेतकऱ्यांना शेतमालाची रक्कम त्यांच्या आधार कार्डाशी संलग्न बँक खात्याद्वारेच देण्यात येईल. त्यामुळे बँक खाते आधार कार्डशी संलग्न असल्याची त्यांनी खात्री करावी.

१२) पोर्टलवर नोंदविलेल्या पिकाखालील क्षेत्राची ७/१२ व स्थळ पाहणी करुन महसूल व कृषी विभागाकडून पडताळणी करण्यात येईल.

**या योजनेचा लाभ सर्व शेतकरी बांधवानी घ्यावा**

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह

join us 》 》 https://t.me/Mpscrockers88